नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८
संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

www.dainikmahasagar.in / Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com




* वर्ष १६ * अंक ३०० * * वाशीम * शनिवार, दिनांक २६ एप्रिल २०२५ ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

अग्राग्रलेख

## खरीखरी..

## सावरकर जुनेच, गांधी नवे !

आज सर्वोच्च न्यायालयात स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या बाबतीत राहुल गांधी यांनी जे वारंवार उद्गार काढले होते. त्यावर सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती दीपांकर दत्ता आणि मनमोहन यांनी चांगले ताशेरे ओढलेले आहेत. सर्वोच्च न्यायालय म्हणाले की, महात्मा गांधी यांनी सावरकरांना लिहिलेल्या पत्रात स्वतःचा उल्लेख 'आपला विश्वासू सेवक' असा केलेला होता. सध्याच्या कालखंडात राहुल गांधी हे नवे गांधी आहेत. मध्यंतरी त्यांच्या आज्जी इंदिरा गांधी, तर वडील राजीव गांधी यांनी सावरकरांबद्दल आदर व्यक्त केला होता. आपल्या 'भारत जोडो' यात्रेदरम्यान राहुल गांधी यांनी महाराष्ट्रात तरी स्वातंत्र्यवीर सावरकरांचा मुद्दा उकरू नये. असे आम्ही याच 'खरीखरी स्तंभात हेच खरेखरे' अगदी स्पष्टपणे लिहिले होते. तेव्हा आम्ही म्हटले होते, की सावरकर यांचा पूर्वार्ध प्रखर देशभक्तीपूर्ण होता. त्यांना दुहेरी जन्मठेप झालेली होती. त्यामुळेच जरा काही गोष्टी समजून घेतल्या पाहिजेत. समजा अंदमानच्या कोठडीत मरणयातना सहन केल्यानंतर त्यांनी काही पत्रे लिहिलेली असतील. तर त्याचे भांडवल करून सावरकरांच्या पूर्वार्ध काळात त्यांनी केलेले महनीय कार्य विसरता येणे शक्य नाही. स्वातंत्र्यवीर सावरकर इंग्लंडमध्ये शिकायला गेल्यावर त्यांना प्रखर देशभक्त शामजी कृष्ण वर्मा यांची मदत झाली होती. भारताच्या स्वातंत्र्यासाठी सर्वोच्च देहदंडाची म्हणजे सर्वाधिक शारीरिक यातनांची शिक्षा भोगणारे सावरकरच होते. हे सर्वांनी मान्य केलेच पाहिजे. यामुळे सावरकरांच्या नावाला केवळ महाराष्ट्रातच नव्हे, तर संपूर्ण देशात आदराने उच्चारले जाते. राहुल गांधी यांनी सावरकरांवर बोलणे टाळले पाहिजे. असे आम्ही तेव्हाही लिहिले होते. स्वातंत्र्यवीर सावरकर यांनी आपल्या कविता देशासाठी सर्वस्व अर्पण केल्यानंतर त्या कवितांमधून जे लिहिले होते. ते प्रखर देशभक्तीचे उदाहरण होते. ते आपल्या रचनेत काय काय म्हणाले होते,

" हे काय बंधू असतो जरी सात आम्ही
स्वस्थंडिलीच दिधले असते बळी मी"

याचा सरळ अर्थ असा आहे की, जर आम्ही सात भावंडे असतो. तरी मातृभूमीसाठी मी बलिदान केले असते. सावरकरांनी अंदमानच्या कोठडीत ज्या यातना सहन केल्या. त्या अत्यंत क्रूर पद्धतीच्या शिक्षा आणि यातनांना सामोरे जाणे सामान्य माणसांना अजिबात शक्य नाही. सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायमूर्तींनी अशा प्रकारचे भडकावू विधान करण्याची काय गरज होती? असा अगदी परखड आणि सुस्पष्ट सवाल केला. याउपर यापुढे राहुल गांधी यांनी अशी विधाने केली. तर आम्ही स्वतः त्याची दखल घेऊ. असे न्यायमूर्तींनी विशेष करून म्हटलेले आहे. आजच्या घडीला स्वातंत्र्यासाठी योगदान देणाऱ्या देशभक्तांची यादी तयार केली. तर सावरकरांचे नाव निश्चितच अत्यंत वरच्या स्थानी येईल. सावरकरांचे हिंदुत्वही अत्यंत वेगळे होते. त्यांचे रोखठोक विचार अनेक हिंदुत्ववाद्यांनाही पचतील असे नव्हते. पण स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या उत्तरार्धातील काही वक्तव्यांच्या बद्दल किंवा धर्माबद्दलच्या विधानांवर काही आक्षेप असू शकतात. पण त्यामुळे स्वातंत्र्यवीर सावरकर हे नाव कधीच खाली येऊ शकत नाही. सर्वोच्च न्यायालयाने राहुल गांधी यांच्यावरील कारवाईला स्थगिती दिलेली आहे. मात्र स्थगिती देताना गांधी यांच्या वकीलांना ज्या प्रकारे न्यायालयाने धारेवर धरले. त्यावरून स्वातंत्र्यवीर सावरकरांचे महत्त्व आपोआपच प्रतिपादित होते. राहुल गांधी यांनी वारंवार अशा प्रकारे सावरकर यांचा अपमान करणे. अनेकांना पचेल असे अजिबात वाटत नाही. सावरकर हे नाव भारताच्या स्वातंत्र्य संग्रामलढ्यात निश्चितच गौरवाने उच्चारले जाते. त्यांच्या स्वातंत्र्यपूर्व काळातील काही विधानांचे उल्लेख टाळले. तर स्वातंत्र्यवीर सावरकर त्यांचे महत्त्व आणि त्यांचे महात्म्य सांगण्याची गरजच नाही. आता सर्वोच्च न्यायालयानेच दणका दिल्यामुळे राहुल गांधी या पुढे तरी स्वातंत्र्यवीरांच्या बाबतीत बोलताना योग्य ती खबरदारी बाळगून असा प्रकार पुन्हा होणार नाही. याची खात्रीपूर्वक सावधगिरी घेतील. असा आमचा कयास आहे. परमेश्वर राहुल गांधींना सद्बुद्धी देवो!

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

# पहलगाम हल्ल्याविरोधात काँग्रेसचे निदर्शने

## दहशतवादी काहीही करो, आपण त्यांना हरवू : राहुल गांधी

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. २५ :

पहलगाम हल्ल्याच्या निषेधार्थ, काँग्रेसने शुक्रवारी काँग्रेस मुख्यालयापासून मेणबत्ती मार्च काढला. राहुल गांधीही यात सहभागी झाले होते. दरम्यान, एआयएमआयएमचे प्रमुख असदुद्दीन ओवैसी यांनीही हैदराबादमध्ये मेणबत्ती मार्च काढला.



तत्पूर्वी, काँग्रेस खासदार आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी श्रीनगरमध्ये पहलगाम हल्ल्यात जखमी झालेल्यांची आणि त्यांच्या कुटुंबियांची भेट घेतली. ते म्हणाले की, दहशतवाद्यांनी कितीही प्रयत्न केले तरी आम्ही त्यांचा पराभव करू. तत्पूर्वी, गृहमंत्री अमित शहा यांनी सर्व राज्यांच्या मुख्यमंत्र्यांची बैठक घेतली. त्यांनी मुख्यमंत्र्यांना त्यांच्या संबंधित राज्यातील पाकिस्तानी नागरिकांना ओळखून परत पाठवण्याचे आवाहन केले.

हल्ल्यानंतर ३ दिवसांनी लष्कराने मोठी कारवाई केली. जम्मू-काश्मीरच्या त्राल आणि अनंतनागच्या बिजबेहरा येथे लश्कर ए तय्यबाच्या २ दहशतवाद्यांच्या घरांवर शोध मोहीम राबवण्यात आली. या कारवाईदरम्यान, दोघांच्याही घरात ठेवलेली स्फोटके फुटली. स्फोटात आसिफ शेख आणि आदिल ठोकर यांची घरे पूर्णपणे उद्ध्वस्त झाली.

येथे, बांदीपोरा येथे शोध मोहिमेदरम्यान सुरू झालेल्या चकमकीत सुरक्षा दलांनी एका दहशतवाद्याला ठार मारले आहे. २ सैनिकही जखमी झाले आहेत. २२ एप्रिल रोजी दुपारी पहलगामच्या बैसरन खोऱ्यात दहशतवाद्यांनी पर्यटकांवर गोळीबार केला. या हल्ल्यात २६ पर्यटकांचा मृत्यू झाला होता. तर १० हून अधिक जण जखमी झाले होते.

यापूर्वी, केंद्राने पहलगाम हल्ल्यात सुरक्षेत त्रुटी असल्याचे मान्य केले होते. दुसरीकडे, जलसंपदा मंत्रालयाच्या सचिव देबाश्री मुखर्जी यांनी गुरुवारी रात्री पाकिस्तानला पत्र पाठवून म्हटले आहे की १९६० चा सिंधू पाणी करार स्थगित करण्यात आला आहे. या मुद्द्यावर गृहमंत्री अमित शहा यांच्या निवासस्थानी एक महत्त्वाची बैठक होणार आहे.

### स्फोटात दहशतवाद्यांची घरे कोसळली

काश्मीरमधील बांदीपोरा येथील कुलनार भागात सुरक्षा दल आणि दहशतवाद्यांमध्ये चकमक सुरू आहे. येथे दहशतवादी लपून बसल्याची माहिती आहे. शुक्रवारी सकाळी पाकिस्तानी सैन्याने नियंत्रण रेषेवरील (एलओसी) अनेक भागात गोळीबार केला. भारतीय सैन्याने लगेचच प्रत्युत्तर दिले. लष्करप्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी आज पहलगामच्या बैसरन व्हॅलीला भेट देतील. ते येथे स्थानिक लष्करी तुकड्यांच्या वरिष्ठ कमांडर्सशी संवाद साधतील. सभागृहातील विरोधी पक्षनेते राहुल गांधी देखील पहलगाम दहशतवादी हल्ल्यातील जखमींना भेटण्यासाठी अनंतनाग रुग्णालयात पोहोचतील.

# देवेंद्र फडणवीसापेक्षा एकनाथ शिंदे ठरले सरस

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २५ :



१०० दिवसात चांगली कामगिरी करणाऱ्या विभागाची आकडेवारी समोर

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मंत्रिमंडळात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे अव्वल स्थान असल्याचे पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे. मुख्यमंत्र्यांनी जाहीर केलेल्या शंभर दिवसांच्या आढावा कार्यक्रमात आठ विभागांनी अव्वल कामगिरी केली आहे. यामध्ये मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या दोन विभागांचा समावेश आहे. या आठ विभागातून पहिले तीन विभाग निवडले जाणार आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या मुख्यमंत्री पदाची सूत्रे हाती घेतल्यानंतर शंभर दिवसांचा आढावा कार्यक्रम आयोजित करण्याची घोषणा केली होती.

या लेखा परीक्षणात ५९ विभागांपैकी सर्वात चांगली कामगिरी करणाऱ्या आठ विभागांची निवड करण्यात आली आहे. या आठ विभागातून सर्वात चांगले पहिले तीन विभाग निवडले जाणार आहेत. विशेष म्हणजे या आठ विभागांमध्ये उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेच्या सर्वाधिक विभागाचा समावेश आहे. क्वॉलिटी कौन्सिल ऑफ इंडिया यांच्या वतीने चांगली कामगिरी करणाऱ्या आलेल्या विभागाची आकडेवारीमध्ये शिंदे यांच्या मंत्र्यांचा वरचष्मा असल्याचे दिसून येते.

# लाल संविधान घेऊन फिरणारे राहुल गांधी न्यायालयाचा मान ठेवणार का?

### फडणवीसांची टीका

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २५ :

स्वातंत्र्यवीर सावरकरांवर आक्षेपार्ह टिप्पणी बद्दल सर्वोच्च न्यायालयाने काँग्रेस खासदार आणि विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांना फटकारले आहे. आम्ही कोणालाही स्वातंत्र्य सैनिकांविरुद्ध असे बोलण्याची परवानगी देऊ शकत नसल्याचे न्यायालयाने म्हटले आहे. राहुल गांधी यांनी भविष्यात असे कोणतेही विधान केले तर आम्ही स्वतःहून दखल घेऊन कारवाई करणार असल्याचेही न्यायालयाने म्हटले आहे. यावरुन आता



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राहुल गांधी यांच्यावर टीका केली आहे. हातात लाल संविधान घेऊन फिरणारे राहुल गांधी आता सर्वोच्च न्यायालयाचा मान ठेवणार का? असा प्रश्न फडणवीस यांनी विचारला आहे. या संदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस प्रसारमाध्यमांशी बोलताना म्हणाले की, राहुल गांधी हे आता सर्वोच्च न्यायालयाचा मान ठेवणार का? असा आमचा प्रश्न आहे. देशाच्या स्वातंत्र्यसैनिकांचा मान ठेवायला सर्वोच्च न्यायालयाने राहुल गांधी यांना सांगितले आहे. त्यामुळे मी सर्वोच्च न्यायालयाचे आभार मानतो. सर्वोच्च न्यायालयाने राहुल गांधी यांना जोरदार फटकारले आहे. यासाठी मी न्यायालयाचे आभार व्यक्त करतो.

### बिल्डरची आत्महत्या

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २५ :

नवी मुंबईतील बांधकाम व्यावसायिक तथा मोस्ट वॉंटेड ड्रग सिंडिकेटचे प्रमुख नवीन चिचकरचे वडील गुरू चिचकर यांनी आज आपल्या राहत्या घरी आत्महत्या केली. त्यांनी डोक्यात गोळी घालून स्वतःची जीवनयात्रा संपवली. सूत्रांच्या माहितीनुसार, गुरू चिचकर यांनी स्वतःच्या पिस्तुलातून डोक्यात गोळी झाडून आत्महत्या केली. पोलिसांना त्याच्या मृतदेहाशेजारी एक सुसाइड नोट सापडली आहे. या नोटमध्ये त्यांनी नार्कोटिक्स विभागातील अधिकाऱ्यांच्या जाचाला कंटाळून आत्महत्या केल्याचे नमूद करण्यात आले.

# पोलिसाने अंगणात झोपलेल्या व्यक्तीला चिरडले

■ महासागर प्रतिनिधी, सातारा, दि. २५ :

पोलिसाने रस्त्यालगतच्या घरातील अंगणात झोपलेल्या एका व्यक्तीला कारने चिरडल्याची भयंकर घटना शुक्रवारी पहाटे सातारा जिल्ह्यातील सर्कलवाडी येथे घडली. आरोपी पोलिसाने मद्यधुंद अवस्थेत हे कृत्य केल्याचा आरोप असून, यामुळे मोठा संताप व्यक्त केला जात आहे. यासंबंधीच्या माहितीनुसार, साताऱ्याच्या कोरेगाव तालुक्यातील सर्कलवाडी येथे ही घटना घडली आहे. आरोपी पोलिसांनी आपल्या ताब्यातील कार भरधाव वेगात चालवून आपल्या घराच्या अंगणात झोपलेल्या रमेश लक्ष्मण सपकाळ यांना चिरडले. यात सपकाळ यांचा जागीच मृत्यू झाला. शुक्रवारी पहाटे संपूर्ण गाव साखरझोपेत असताना ही घटना घडली.

या धडकेनंतर संपूर्ण गाव जागे झाले. त्यांनी रमेश सपकाळ यांना सावरण्याचा प्रयत्न केला. पण ही धडक एवढी जोरात होती की त्यांचा जागीच मृत्यू झाला. स्थानिकांच्या मते, आरोपी कारचालक पोलिसाने मद्यप्राशन केले होते. या घटनेनंतर सर्कलवाडीचे ग्रामस्थांनी वाठार पोलिस ठाण्याच्या दिशेने धाव घेतली. त्यानुसार येथे संबंधित पोलिस कर्मचाऱ्यावर गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे.

## २३२ पर्यटक श्रीनगरहून मुंबईत दाखल

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २५ :

पहलगाम येथील हल्ल्यानंतर महाराष्ट्रातील पर्यटकांना सुखरूप आणण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्देशानुसार राज्य सरकारच्या वतीने विशेष विमानांची व्यवस्था करण्यात आली आहे. त्यानुसार आज २३२ पर्यटकांना घेऊन इंडिगो विमान श्रीनगरहून मुंबईत दाखल झाले आहे. यावेळी विमानतळावर भाजप नेते व मंत्री आशिष शेलार उपस्थित होते. दरम्यान, सुमारे ५०० पर्यटक आतापर्यंत महाराष्ट्रात परतले आहेत. गुरुवारी दोन विशेष विमानांनी १८४ पर्यटक मुंबईत पोहोचले होते.

पहलगाम हल्ल्यात २६ लोकांना आपला जीव गमवावा लागला. पुलवामा हल्ल्यानंतर हा सर्वात मोठा अतिरेकी हल्ला असल्याचे बोलले जात आहे. अतिरेक्यांनी नाव आणि धर्म विचारून गोळ्या मारल्याचे बोलले जात आहे. धक्कादायक बाब म्हणजे या अतिरेक्यांनी केवळ पुरुषांनाच मारले आहे. घरातील मुख्य व्यक्तीच्या जाण्याने पीडित कुटुंबांवर दुःखाचे मोठे डोंगर कोसळले आहे. या हल्ल्यात पर्यटकांना वाचवताना जीव गमावलेल्या आदिल शाह यांचे कुटुंबाला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडून ५ लाख रुपये तसेच घर बांधून देण्यात येणार आहे. एकनाथ शिंदे यांनी व्हिडिओ कॉलद्वारे आदिल शाह यांच्या कुटुंबाशी संवाद साधला व मदत जाहीर केली आहे.

### पंजाबमध्ये हाय अलर्ट

■ वृत्तसंस्था, अमृतसर, दि. २५ :

जम्मू आणि काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर पंजाबला लागून असलेल्या पाकिस्तान सीमेवर हाय अलर्ट जारी करण्यात आला आहे. गुप्तचर संस्थांकडून दहशतवादी कारवायांबद्दल माहिती मिळाल्यानंतर सीमा सुरक्षा दलाने सर्वत्र त्यांच्या क्विक रिक्शन टीम सक्रिय केल्या आहेत. या पथकांना ड्रोनच्या साहाय्याने २४ तास गस्त घालण्याचे आणि देखरेख करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. पठाणकोट, गुरुदासपूर, अमृतसर, तरणतारन, फिरोजपूर आणि फाजिल्काच्या सीमेवर कोणत्याही संशयास्पद हालचालींवर त्वरित कारवाई करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

गेल्या काही काळापासून पंजाब सीमेवर पाकिस्तानी ड्रोनद्वारे शस्त्रे, ड्रग्ज आणि स्फोटके टाकण्याच्या घटना घडत आहेत. हे लक्षात घेऊन, दिवसरात्र देखरेख केली जात आहे. अटारी सीमेजवळ बीएसएफने एक चेकपोस्ट उभारला आहे.

# गिरणी कामगारांना मुंबईत घरे उपलब्ध करून देणेबाबत बैठक

## जास्तीत जास्त कामगारांना घर मिळवून देणार : एकनाथ शिंदे

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २५ :

गिरणी कामगारांनी मुंबईसाठी त्याग केला आहे. त्यामुळे या कामगारांना मुंबईत घरे देण्यास आमचे प्राधान्य आहे. जास्तीत जास्त कामगारांना घरे उपलब्ध करून देण्यासाठी एनटीसीसमवेत तातडीने बैठक घेण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज दिले. याशिवाय शेलू आणि वांगणी येथील घरांच्या किंमती कशा कमी करता येतील यासंदर्भात मुख्यमंत्र्यांशी चर्चा करू असे आश्वासन उपमुख्यमंत्री शिंदे यांनी आज गिरणी कामगारांना दिले.



सह्याद्री अतिथीगृह येथे गिरणी कामगारांच्या घरांसदर्भात शिष्टमंडळ उपमुख्यमंत्र्यांना भेटले. त्यावेळी झालेल्या बैठकीत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे बोलत होते. उपमुख्यमंत्र्यांनी घेतलेल्या निर्णयाचे कामगारांनी स्वागत केले. बैठकीस राज्यमंत्री पंकज भोयर, माजी मंत्री रामदास कदम, आमदार कालिदास कोळंबकर, माजी खासदार राहुल शेवाळे, उपमुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव नविन सोना, गृहनिर्माण विभागाच्या अपर मुख्य सचिव वल्सा नायर सिंह, म्हाडाचे उपाध्यक्ष संजीव जयस्वाल, म्हाडाचे मुख्य कार्यकारी अधिकारी मिलिंद बोरीकर यांच्यासह गिरणी कामगार संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री शिंदे यावेळी म्हणाले, गिरणी कामगारांना मुंबईत घर मिळावे ही शासनाची प्रामाणिक भावना आहे. त्यासाठी मुंबईत किती जागा उपलब्ध होऊ शकते यासाठी एनटीसी सोबत बैठक घेण्यात येणार आहे. यासर्व बाबींचा विचार करून गिरणी कामगारांना घरे उपलब्ध करून देत आहोत. मुंबई महानगर प्रदेशात देखील घरे उपलब्ध करून देण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे. आतापर्यंत १५ हजार ८७० घरे गिरणी कामगारांना दिली. आजपर्यंत सुमारे एक लाख गिरणी कामगार पात्र असून त्यांना घरे उपलब्ध करून देण्यात येतील.

## नाशिकमध्ये ६ महिला, तर छत्रपती संभाजीनगरात ५७ पाकिस्तानी नागरिक

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २५ :

महाराष्ट्रात सध्या किमान १७ ते १८ हजार पाकिस्तानी नागरिक दीर्घकालीन व्हिसावर वास्तव्यास आहेत. केंद्र तसेच राज्य सरकारकडून सुस्पष्ट मार्गदर्शक नियमावली आल्यानंतर प्रत्येक नागरिकाची माहिती तपासून त्यांना भारत सोडण्याची नोटीस दिली जाणार आहे, अशी माहिती पोलिस दलातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिली. पहलगाम हल्ल्यानंतर भारत सरकारने आक्रमक पावले उचलत पाकिस्तानी नागरिकांना ४८ तासांत देश सोडून जाण्यास सांगितले आहे. त्यावर वस्तुस्थिती काय आहे. छत्रपती संभाजीनगरात दीर्घकालीन व्हिसावर ५७ नागरिक वास्तव्यास आहे. त्यातील काहीजणी विवाहानंतर अनेक वर्षांपासून शहरात वास्तव्यास आहे.

# नागरिकांच्या 'इज ऑफ लिव्हिंग' साठी मुख्यमंत्र्यांच्या सूचना

* शहरी परिवहन सेवेत आमूलाग्र बदल करावेत
* महानगर वाहतूक प्राधिकरण करण्यात येणार

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २५ :

महानगरांमध्ये वाहतुक कोंडीची समस्या कायमस्वरूपी सोडवण्यासाठी शासन विविध पातळ्यांवर काम करीत आहे. यामध्ये किफायतशीर सहज आणि सुलभरीत्या उपलब्ध होणारी सार्वजनिक वाहतूक व्यवस्था महत्त्वाची भूमिका बजावित आहे. नागरिकांच्या 'इज ऑफ लिव्हिंग'साठी शहरी परिवहन सेवेमध्ये अमुलाग्र बदल आवश्यक आहे. त्यासाठी एकात्मिक महानगर वाहतूक प्राधिकरण (युनिफाईड मेट्रोपॉलिटीन ट्रान्सपोर्ट अथॉरिटी) स्थापन करावे, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज दिले. या प्राधिकरणाचा कायदा करण्यापूर्वी त्यावर जनतेच्या सूचना व हरकती घेऊन अंतिम निर्णय घेण्याचेही त्यांनी सूचित केले.




मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, सध्या वेगवेगळ्या महानगरांमध्ये महापालिका, राज्य परिवहन महामंडळ, रेल्वे, मेट्रो आदी यंत्रणांच्या माध्यमातून परिवहन सेवा कार्यान्वित आहेत. प्रवाशीभिमुख परिवहन सेवेसाठी सुसूत्रीकरण असणे गरजेचे आहे. महानगरांमधील परिवहन सेवेच्या विकास व विस्तारासाठी एकात्मिक महानगर वाहतूक प्राधिकरण स्थापन करणे गरजेचे आहे. या प्राधिकरणाच्या माध्यमातून विविध परिवहन सेवांचे एकच भाडे, शहरांमध्ये सुरू असलेले परिवहन प्रकल्प आदींबाबत समन्वय साधणे सोयीचे होईल.

मुख्यमंत्री म्हणाले, प्राधिकरणाच्या माध्यमातून प्रभावी कामकाजासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी स्वतंत्र पद असावे. सध्या परिवहन सेवांसंदर्भात अस्तित्वात असलेले राज्याचे कायदे, नियम, केंद्र शासनाचे कायदे, विविध नियम यामध्ये अधिक्रमित होणार नाही. याची काळजी या प्राधिकरणाच्या कायद्यामध्ये घ्यावी. शहरात सुरू असलेले परिवहन संदर्भातील प्रकल्प गतीने पूर्ण होण्यासाठी एकच नियामक यंत्रणा असावी. यासाठी हे प्राधिकरण महत्त्वाची भूमिका बजावणार आहे. नागरिकांना सुकर व सहज परिवहन सेवा ' लास्ट माईल कनेक्टिव्हिटी'च्या स्वरूपात उपलब्ध व्हावी, याद्दष्टीने प्राधिकरणाचे काम असेल.

या प्राधिकरणात सर्व महानगरपालिकांचे महापौर, आयुक्त यांचा समावेश असावा. शहरातील परिवहन सेवा सुरळीत व सहज उपलब्ध होण्यासाठी प्राधिकरण नियोजन करेल. परिवहन सेवांची अंमलबजावणी संबंधित महापालिकडेच राहील. केवळ नियोजन, विकासाची बाब प्राधिकरणाकडे असेल. शहरांमध्ये परिवहन सेवेचे विस्तार आणि नियोजन करताना भविष्यात प्राधिकरण शासनाला सल्लागार म्हणूनही काम करेल, असेही मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

सह्याद्री अतिथीगृह येथे एकात्मिक महानगर वाहतूक प्राधिकरणबाबत बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीस उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अप्पर मुख्य सचिव (परिवहन) संजय सेठी, ठाणे महानगरपालिका आयुक्त सौरभ राव, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे महानगर अतिरिक्त आयुक्त अश्विन मुदगल, बेस्टचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीनिवासन आदी उपस्थित होते.



# सत्कार घेताना भाजप नेत्यांना लाज कशी वाटत नाही?

**मुंबई, दि. २५ :** जम्मू-काश्मीरमधीलमहलगाम येथे दहशतवाद्यांनी २६ निष्पाप पर्यटकांची क्रूर हत्या केल्याने संपूर्ण देश शोकसागरात बुडाला आहे. या घटनेने जनमानस हादरले असून, देशभरात तीव्र संतापाचे वातावरण आहे. अशा दुखद प्रसंगी भारतीय जनता पक्षाचे (भाजप) नेते आणि मंत्री सत्कार सोहळे आयोजित करत असल्याने महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे मुख्य प्रवक्ते अतुल लोंढे यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. देश दुखवटा पाळत असताना सत्कार सोहळे करून घेताना भाजप नेत्यांना लाज कशी वाटत नाही? असा संतप्त सवाल त्यांनी उपस्थित केला. मुंबईत पत्रकार परिषदेत बोलताना लोंढे यांनी भाजपच्या असंवेदनशील वर्तनावर जोरदार टीका केली. ते म्हणाले, अमरावती येथे एप्रिल रोजी भाजप नेत्यांचा भव्य नागरी सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला आहे. विधान परिषदेचे सभापती राम शिंदे, मंत्री दत्ता भरणे, आमदार गोपीचंद पडळकर आणि इतर नेत्यांचा हा सोहळा छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात होणार आहे. पहलगाम हल्ल्यात महाराष्ट्रातील सहा पर्यटकांचा मृत्यू झाला आहे. त्यांच्या कुटुंबीयांवर दुखाचा डोंगर कोसळला असून, चितेची राख अजून विझलेली नाही. अशा वेळी भाजप नेते हार-तुरेघेत सत्कार स्वीकारत आहेत. हीच का भाजपाची संस्कृती?

## मराठी भाषिकांचे ढोंगी कैवारी परदेशात फोटोग्राफीत मग्न: संजय निरुपम

**मुंबई, दि. २५ :** जम्मू-काश्मीरमधीलपहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर देशभरात शोकाकुल वातावरण आहे. अशा संवेदनशील परिस्थितीत मराठी भाषिकांचे कैवारी म्हणवणारे ढोंगी राजकारणी कुटुंबासह परदेशात वाइल्डलाइफ फोटोग्राफी आणि पर्यटनात मग्न असल्याची खोचक टीका शिवसेना उपनेते व प्रवक्ते संजय निरुपम यांनी उद्धव बाळासाहेब ठाकरे गटावर (उबाठा) केली. मुंबईत आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना निरुपम यांनी उबाठा गटाने महाराष्ट्रातील पर्यटकांबाबत कोणतीही संवेदना व्यक्त न केल्याचा आरोप केला. तसेच, केंद्र सरकारने बोलवलेल्या सर्वपक्षीय बैठकीकडेही त्यांनी पाठ फिरवल्याचे नमूद केले. निरुपम म्हणाले, महाराष्ट्रातील मराठी पर्यटकांसाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे स्वत: श्रीनगरला धावून गेले, तर दुसरीकडे मराठींचे तथाकथित कैवारी युरोपात कौटुंबिक सहलीचा आनंद लुटत आहेत. त्यांची आवड वाइल्डलाइफ फोटोग्राफी आणि परदेशी खाद्यपदार्थांमध्ये आहे, त्यामुळे त्यांना महाराष्ट्रातील पर्यटकांबाबत संवेदना व्यक्त करण्यास वेळच मिळाला नाही. पहलगाम हल्ल्यातील मृत पर्यटकांना श्रद्धांजली अर्पण करताना त्यांनी केंद्र सरकारच्या कठोर निर्णयांचे स्वागत केले. निरुपम यांनी सांगितले की, काश्मीरमध्ये सध्या महाराष्ट्राचे सुमारे , पर्यटक अडकले आहेत. महायुती सरकारने त्यांना सुरक्षित परत आणण्यासाठी तातडीने पावले उचलली आहेत. शिवसेनेच्या पुढाकाराने स्टार एअरलाइन्स आणि अकासा एअरलाइन्सच्या प्रत्येकी दोन फेऱ्यांद्वारे पर्यटकांना महाराष्ट्रात आणण्यात आले आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी श्रीनगरला भेट देऊन पर्यटकांच्या मनातील भीती दूर करण्याचा प्रयत्न केला आणि त्यांच्या परतीच्या प्रवासाची व्यवस्था केली. मात्र, या दौऱ्यावर टीका करणाऱ्यांची नीच वृत्ती दिसून आल्याचा टोला निरुपम यांनी लगावला. पहलगाम हल्ल्याची जबाबदारी टीआरएफ या दहशतवादी संघटनेने स्वीकारली असून, ही संघटना पाकिस्तानच्या लष्कर-ए-तैयबाशी संलग्न आहे. निरुपम यांनी केंद्र सरकारने पाकिस्तानशी राजनैतिक संबंध तोडणे, सिंधु पाणी करार स्थगित करणे आणि अटारी सीमा बंद करण्याच्या निर्णयांचे कौतुक केले. तथापि, यावर न थांबता केंद्राने पाकिस्तानविरोधात लष्करी कारवाई करावी, पाकव्याप्त काश्मीरमधील दहशतवादी अड्डे उद्धवस्त करावेत आणि दहशतवाद्यांना आसरा देणाऱ्या स्थानिकांवर कठोर कारवाई करावी, अशी आक्रमक मागणी त्यांनी केली. निरुपम यांच्या या टीकेमुळे उबाठा गट आणि शिवसेना (शिंदे गट) यांच्यातील राजकीय संघर्ष पुन्हा तीव्र झाला आहे. पहलगाम हल्ल्यानंतर महाराष्ट्रातील पर्यटकांच्या सुरक्षेसाठी महायुती सरकारने दाखवलेली तत्परता आणि उबाठा गटाच्या नेत्यांची अनुपस्थिती यावरून राजकीय वातावरण तापण्याची शक्यता आहे.

## सोन्याची बिस्किटे चोरणाऱ्या कर्मचाऱ्याला अटक

### एक कोटी ६० लाखांची २० बिस्किटे लंपास




पुणे,दि. २५ : प्रसिद्ध सराफी व्यावसायिकाच्या घराच्या शिफ्टिंगसाठी बोलावलेल्या खासगी कामगाराचे साहित्य ने-आणकरताना तिजोरीतील सोन्याचे बिस्कीट पाहून डोळे गरगरले. त्याने नजर चुकवून एक कोटी६० लाख रुपये किमतीच्या वीस बिस्किटांवर डल्ला मारल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. पोलिसांनी शोधमोहीम राबवून या कामगाराला बेड्या ठोकल्या असून, त्याच्याकडून चोरीची बिस्किटे जप्त करण्याची कारवाई सुरू केली आहे.

## काही भागात आज पाणीपुरवठा बंद राहणार



**महासागर प्रतिनिधी,**
**मुंबई, दि. २५ :** घाटकोपर पश्चिम येथे महानगरपालिका प्रशासनामार्फत पाणीपुरवठाविषयक विविध कामे प्रस्तावित असून ही कामे शनिवारी हाती घेण्याचा निर्णय पालिकेने घेतला आहे. ही कामे शनिवारी सकाळी १० वाजेपासून रविवारी सकाळी १०वाजेपर्यंत सुरू राहणार आहेत. या २४ तासांच्या कालावधीत एन व एल विभागातील काही भागांचा पाणीपुरवठा खंडित करण्यात येणार आहे. नारिकांनी पाण्याचा पुरेसा साठा करून ठेवल्यास पाण्याअभावी होणारी गैरसोय काही प्रमाणात कमी होण्याची शक्यता आहे.

पाणीपुरवठाविषयक नियोजित विविध कामांमध्ये घाटकोपर (पश्चिम) येथे संत तुकाराम पुलाजवळ मिलीमीटर व्यासाच्या मुख्य जलवाहिनीवर १२०० मिलीमीटर व्यासाची झडप बसविणे, घाटकोपर उच्चस्तर जलाशयाच्या इनलेटवर १४०० मिलीमीटर व्यासाची झडप बसविणे, ४ छेद जोडणी (क्रॉस कनेक्शन), १२०० मिलीमीटर ६०० मिलीमीटर, १५०० मिलीमीटर ६०० मिलीमीटर, १५०० मिलीमीटर ३०० मिलीमीटर,१५०० मिलीमीटर तसेच ४०० मिलीमीटर व्यासाच्या दोन जलवाहिन्यांची गळती दुरुस्ती आदीं कामांचा समावेश आहे. संबंधित परिसरातील नागरिकांनी, पाणी काटकसरीने वापरावे, असे आवाहन महापालिकेने केले आहे. भटवाडी, बर्वेनगर, महानगर पालिका वसाहत ए ते के, काजूटेकडी, रामजी नगर, राम जोशी मार्ग, आझाद नगर, अकबरलाला कंपाउंड, पारशीवाडी, सोनिया गांधी नगर, नामदार बाळासाहेब देसाई वसाहत (शनिवारी पाणीपुरवठा बंद राहणार)-आनंदगड शोषण टाकी व उदंचन केंद्रावरून पाणीपुरवठा होणारा विभाग, शंकर मंदिर, राम नगर, हनुमान मंदिर, राहुल नगर, कैलास नगर, संजय गांधी नगर, वर्षा नगर, जय मल्हार नगर, खंडोबा टेकडी, रामनगर शोषण टाकी व उदंचन केंद्रावरुन पाणीपुरवठा होणारा विभाग, डी अँड सी महानगरपालिका वसाहत, रायगड विभाग, विक्रोळी पार्क साईटचा काही भाग, सुभाष नगर, शिवाजी नगर, यशवंत नगर, औद्योगिक वसाहत रस्ता, गावदेवी, पठाण चाळ, अमृतनगर,

इंदिरा नगर १, अमिनाबाई चाळ आणि साईनाथ नगरचा काही भाग, गणेश नगर, सागर पार्क, जगदूशा नगर, मौलाना संकुल, कातोडीपाडा, भीमनगर, इंदिरा नगर २, अल्ताफनगर, गेल्डा नगर, गोळीबार मार्ग, सेवानगर, काही भाग.

# मुलगा अमली पदार्थ तस्करीत अडकल्याने पित्याने केली आत्महत्या

**महासागर प्रतिनिधी,**
**नवी मुंबई, दि. २५ :** नवी मुंबईतील प्रतिष्ठित बांधकाम व्यावसायिक गुरनाथ चिंचकर यांनी स्वतः च्या डोक्यात गोळी झाडून आत्महत्या केल्याची घटना आज (शुक्रवारी ) सकाळी घडली आहे. मुलगा अमली पदार्थ तस्करी रॅकेट मध्ये अडकल्याने त्यांनी नैराश्यपोटी आत्महत्या केली असल्याचल अंदाज पोलिसांनी वर्तवला आहे.गुरनाथ चिंचकर हे किल्ला गावठाण येथे राहत होते. नेहमी प्रमाणे सकाळी सहा वाजण्याच्या सुमारास ते तळमजल्यावर आले. तेथील त्यांच्या कार्यालयात ते बसले व स्वतःच्या बंदूकतून डोक्यात गोळी



झाडून आत्महत्या केली. ही बाब उघडकीस आल्यावर त्यांच्या पुतण्याने एन आर आय पोलिसांनी कळवले. पोलिसांनी घटनास्थळी जाऊन पंचनामा आदी सोपास्कार पार पाडले. या बाबत अधिक माहिती देताना सहाय्यक पोलीस आयुक्त अजयकुमार लांडगे यांनी सांगितले कि, गुरनाथ चिंचकर यांनी आत्महत्या केल्याचे कळताच पोलीस पथक घटनास्थळी आले. गुरनाथ चिंचकर यांनी नऊ एम एमच्या बंदूकतून गोळी झाडाली आहे. आत्महत्या करण्यापूर्वी त्यांनी लिहलेली चिठ्ठी आढळून आली आहे.

त्यांचा मुलगा अमली पदार्थ तस्करी मध्ये अडकला आहे. हेच शल्य त्यांना होते. यातूनच त्यांनी आत्महत्या केली असावी.या प्रकरणी तपास सुरु आहे.



## राज्यात हिवताप चार महिन्यात २ हजार७२६ रुग्ण

**मुंबई :** राज्यामध्ये मागील चार महिन्यांमध्ये हिवतापाचे २ हजार ७२६ रुग्ण सापडले असून एकाही रुग्णाचा मृत्यू झाला नाही, मात्र मागील वर्षी याच चार महिन्यांत हिवतापाचे २ हजार ८६७ रुग्ण सापडले होते आणि चार रुग्णांचा मृत्यू झाला होता, असे सार्वजनिक आरोग्य विभागाकडून स्पष्ट करण्यात आले. गतवर्षीच्या तुलनेत यंदा राज्यामध्ये हिवताचा प्रकोप काही अंशी कमी असल्याचे निदर्शनास आले आहे. राज्याच्या तुलनेत मुंबईत गतवर्षीच्या तुलनेत यंदा हिवतापाच्या रुग्णांच्या संख्येत वाढ झाली आहे.

# अक्षय शिंदे कोठडी मृत्यूप्रकरणी अद्याप गुन्हा का नोंदवला नाही ?

**महासागर प्रतिनिधी,**
**मुंबई, दि. २५ :** बदलापूरस्थित शाळेतील दोन अल्पवयीन मुलींवर लैंगिक अत्याचार प्रकरणातील आरोपी अक्षय शिंदे याच्या कोठडी मृत्यूप्रकरणी स्पष्ट आदेश देऊनही पाच पोलिसांविरुद्ध गुन्हा नोंदवण्यात न आल्यावरून उच्च न्यायालयाने शुक्रवारी राज्य सरकारवर कठोर शब्दांत टीका केली. तसेच, पुढील तपासासाठी विशेष तपास पथकाकडे (एसआयटी) प्रकरणाची कागदपत्रे तातडीने वर्ग करण्याचे आदेश दिले.प्रकरणाचा तपास करणाऱ्या राज्याच्या गुन्हे अन्वेषण विभागाचे (सीआयडी) अधीक्षक (नवी मुंबई) प्रशांत वागूळ यांना अवमानप्रकरणी दोषी धरण्याचा इशारा दिल्यानंतर सीआयडीचे अतिरिक्त पोलीस महानिरीक्षक प्रशांत बुरडे दूरचित्रसंवाद माध्यमाद्वारे न्यायालयात उपस्थित झाले. तसेच, त्यांनी प्रकरणाची कागदपत्रे एसआयटीला सुपूर्द करण्याची हमी न्यायालयाला दिली. त्यानंतर, न्यायमूर्ती रेवती डेरे आणि न्यायमूर्ती नीला गोखले यांच्या खंडपीठाने उपरोक्त आदेश दिले.तत्पूर्वी, पोलिसांनी अद्याप गुन्हा नोंदवलेला नसल्याची खंडपीठाने गंभीर दखल घेतली. तसेच, आदेशाचे पालन झाले नाही हे धक्कादायक असून हे आमच्या आदेशाचे उल्लंघन असल्याचेही न्यायालयाने सुनावले. उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशांचे पालन सरकर कसे करत नाही ?

# विमानतळाला वॉटर टॅक्सी सेवा उपलब्ध करून देण्याचे निर्देश

**महासागर प्रतिनिधी,**
**मुंबई, दि. २५ :** भविष्यातील आव्हाने लक्षात घेता पर्यावरण पूरक आणि समृद्ध शहरांची निर्मिती गरजेची आहे. बहुपर्यायी वाहतूक व्यवस्थेसोबतच रोजगार निर्मितीवर भर, सौर ऊर्जेचा अधिकाधिक वापर करावा. अशा शहरांच्या निर्मितीसाठी सिडकोची भूमिका महत्त्वाची असल्याचे सांगत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गुरुवारी नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला ' मल्टी मॉडेल कनेक्टिव्हिटी' निर्माण करण्याचे निर्देश दिले. या विमानतळाला वॉटर टॅक्सीची सुविधा उपलब्ध करून द्यावी. अशी सुविधा असणारे हे देशातील पहिलेच आंतरराष्ट्रीय विमानतळ ठरणार आहे, असेही फडणवीस यावेळी म्हणाले. फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली आज सह्याद्री अतिथीगृह येथे नवी मुंबईतील सिडकोच्या महत्वपूर्ण प्रकल्पांबाबत बैठक पार पडली. या बैठकीत नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर सामान्य विमान वाहतुकीची व्यवस्था सर्वप्रथम निर्माण करण्याचे सूचित करत फडणवीस म्हणाले, जगभरातून लोक मुंबईमध्ये विमाने आणत असतात. त्यामुळे पार्किंगची चांगली सुविधा या विमानतळावर उपलब्ध असायला पाहिजे. यासोबतच विमान दुरुस्तीची सुविधाही विमानतळावर असावी. विमानतळाला रस्ते, रेल्वे, मेट्रो आणि जलवाहतुक ' कनेक्टिव्हिटी' ची कामे वेळेत पूर्ण करावी. नैना प्रकल्पाची अंमलबजावणी गतीने करण्यात यावी. या प्रकल्पांतर्गत निर्माण करण्यात येणारे रस्त्यांची रुंदी भविष्यातील वाहतुकीचा भार लक्षात घेऊन निर्धारित करण्यात यावी. भविष्यात सुरू होणाऱ्या आणि सद्यस्थितीत सुरू असलेल्या कामांचा कालावधी निश्चित करण्यात यावा. यापुढे पायाभूत सोयी सुविधा निर्मितीच्या कामांबाबत निविदेमध्ये कालावधीची सक्ती करण्यात यावी. आधुनिक तंत्रज्ञान उपलब्ध असताना कुठलेही काम जास्त कालावधीसाठी रेंगाळणे योग्य नाही. त्यामुळे कामांचा कालावधी हा निश्चित करण्यात यावा, अशी सूचना फडणवीस यांनी केली. मेट्रोस्टेशनपासून विमानतळा पर्यंत बहुपर्यायी वाहतूक व्यवस्था निर्माण करण्यात यावी. याबाबत नागरिकांची कुठलीही गैरसोय होणार नाही, याची काळजी घ्यावी. सिडकोच्या माध्यमातून सुरू असलेली कामे विहित कालमर्यादित पूर्ण करावी. घरकुल आणि गृहनिर्माणच्या बाबतीत कामे दर्जेदार करण्यात यावी. याबाबतही कालावधीची मर्यादा ठेवावी. नागरिकांना परवडणाऱ्या किमतीत घरे देण्यासाठी सिडकोने पुढाकार घेत कार्यवाही करावी. नवी मुंबई परिसरात क्रीडा सुविधांचे कामे सुरू आहे. त्यामुळे या भागामध्ये क्रीडा सुविधांचा चांगला विकास होत आहे. खारघर व्हॅली गोल्फ कोर्सचे काम पूर्ण करण्यात यावे, अशा सूचनाही मुख्यमंत्र्यांनी दिल्या. या बैठकीला नगर विकास खात्याच्या राज्यमंत्री माधुरी मिसाळ, सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल, नियोजन विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव राजगोपाल देवरा, वित्त विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव ओ. पी. गुप्ता, सिडकोच्या सह व्यवस्थापकीय संचालक शंतनू गोयल आदींसह संबंधित अधिकारी उपस्थित होते.

## चार्टर्ड अकाऊंटंटलाच गंडा ४७ लाखांची सायबर फसवणूक



**मुंबईः** शेअर बाजारमधील गुंतवणुकीतून चांगला नफा मिळवून देण्याचे आमिष दाखवून मुलुंड (पूर्व) येथील एका वर्षीय चार्टर्ड अकाउंटंटची (सीए) ४७लाख २४ हजार रुपयांची सायबर फसवणूक करण्यात आल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. आरोपीने आर गारा नावाच्या बनावट ट्रेडिंग प्लिकेशनद्वारे ही फसवणूक केली. त्याची जाहिरात व्हॉट्सअॅपवरून करण्यात आल्याचे तक्रारीत म्हटले आहे.याप्रकरणी सायबर पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून बँक व्यवहारांच्या माध्यातून पोलीस तपास करीत आहेत.तक्रारदार सीए कुटुंबासह गेली ३० वर्ष मुलुंड पूर्व येथे राहतात. तक्रारदार आणि त्यांच्या मुलाच्या नावावर राष्ट्रीयकृत बँकेच्या हरिओम नगर शाखेत बचत खाते आहे. ते खाते तक्रारदार व त्यांच्या मुलाच्या मोबाइल क्रमांकाशी जोडलेले आहेत. ४ ऑक्टोबर २०२४ रोजी, व्हॉट्स अॅप पाहत असताना प्रॅक्टिस प्रुव्हज ट्रुथ, आर गारा नावाच्या ग्रुपमध्ये अॅप लिंक आली होती. शेअर मार्केटबाबत इच्छुक असल्याचे तक्रारदाराने त्या लिंकवर क्लिक केले असता ते ग्रुपमध्ये सामील झाले. या ग्रुपमध्ये आणखी८० ते ८५ सदस्य सहभागी होते. त्या ग्रुपवर शेअर बाजारशी संबंधित सल्ले व चर्चा नियमित होत होती.

व्हीआयपी व्हॉट्स ग्रुपचे अॅडमिन अर्जुन हिंदुजा, इशानी मेहता, स्नेहा बन्सल होते. ते स्वतःला एच १८ कस्टमर सर्व्हिस सेंटरचे प्रतिनिधी असल्याचे भासवत होते. अर्जुन हिंदुजा याने स्वतःची ट्रेडिंग शिकवणारा प्रशिक्षक म्हणून ओळख करून दिली, तर इशानी मेहता यांनी शेअर्स विक्री व खरेदीचे मार्गदर्शन करायची. तक्रारदाराने शेअर खरेदी-विक्रीरस असल्यामुळे त्यांना व्हीआयपी ग्रुपमध्ये सामील करण्यात आले. तेथे गुंतवणुकीसंबंधी सल्ले दिले जात होते.

बनावट मोबाइल पइशानी मेहताच्या सूचनेवरून तक्रारदाराने आर गारा हे अॅप डाऊनलोड करून, मोबाइल क्रमांकाने नोंदणी केली. त्यानंतर ग्रुपच्या तथाकथित ग्राहक मदत क्रमांकावरून विविध बँक खात्यांमध्ये पैसे हस्तांतरित करण्यास सांगण्यात आले. अॅपमध्ये बनावट नियमित नफ्याचे आकडे दिसत होते. त्यामुळे तक्रारादाराला विश्वास बसला. त्यांनी ४ ते २४ ऑक्टोबर, २०२४ या कालावधीत ४७ लाख २४ हजार ५०० रुपयांची गुंतवणूक केली. त्यांना नियमित पैसे वाढत असल्याचे दिसत होते.

## आपले सैनिक बदला घेतील हे प्रत्येक भारतीयांच्या....

**पिंपरी- चिंचवडः** जम्मू काश्मीरमधील पहलगाममध्ये दहशतवाद्यांनी केलेल्या भ्याड हल्ल्यात३७ पेक्षा अधिक पर्यटकांना जीव गमवावा लागला. यानंतर अवघ्या देशाभरात संतापाची लाट आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींनीही दहशतवाद्यांना मातीत गाडण्याची धमकी पाकिस्तानला दिली आहे. राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवारांनीदेखील भारतीय सैनिक घडलेल्या घटनेप्रकरणी बदला घेतील, अशी आशा व्यक्त केली आहे. प्रत्येक भारतीयांच्या मनात बदल्याच्या भावना असल्याचं यावेळी अजित पवार यांनी म्हटलं आहे. अजित पवार हे चऱ्होली येथे बोलत होते. यावेळी माण (ऑनलाईन) आणि चऱ्होली ई बस डेपोचे अजित पवारांच्या हस्ते उद्घाटन झालं.जम्मू- काश्मीरच्या पहलगाममध्ये अतिरेक्यांनी पर्यटकांवर अचानक हल्ला केला. अतिरेक्यांच्या अंदाधुंद गोळीबारात देशभरातील २७ पर्यटकांचा मृत्यू झाला आहे. या घटनेनंतर देशभरातील नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे.

# क्रीडा भवनच हवे टाऊन हॉलला कडाडून विरोध

**महासागर प्रतिनिधी,**
**मुंबई, दि. २५ :** मुंबई महापालिका मुख्यालयासमोरील महापालिका क्रीडा भवन जिमखान्याच्या जागेवर काचेचा घुमट असलेला टाऊन हॉल, व्ह्युइंग गॅलरी, कॅफेटेरिया आदी उभारण्यास विविध स्तरातून विरोध होऊ लागला असून आता जनता दल (से) मुंबई पक्ष व मूलभूत अधिकार संघर्ष समितीही (मास) आक्रमक झाली आहे. कोणत्याही परिस्थिती क्रीडा भवनाच्या जागेवर टाऊन हॉल उभारू नये अशी मागणी करण्यात आली आहे.मुंबई महापालिका क्रीडा भवन हा महापालिकेचा एक स्वतंत्र उपक्रम असून त्याची स्वतंत्र घटना व नियमावली आहे. महापालिका आयुक्त हे त्याचे पदसिद्ध अध्यक्ष असून, दोन उपाध्यक्ष तसेच कामगार अधिकारी, लेखापाल, विधी अधिकारी हे सदस्य आहेत. याशिवाय कर्मचारी प्रतिनिधींचा या समितीमध्ये समावेश आहे. क्रीडा भवनाचे १० हजाराहून अधिक



सभासद, अडीच हजार आजीव सभासद असून दर दोन वर्षांनी समितीची निवडणूक होते. मुंबई महापालिका क्रीडा भवन जिमखान्यासाठी १४२६ साली तत्कालीन महापालिका आयुक्तांनी राज्य सरकारकडून जागा मिळवून ती क्रीडा संकुलासाठी उपलब्ध करून दिली होती. पुढील वर्षी याला शंभर वर्षे होत असतानाच क्रीडा भवन जिमखाना गुंडाळण्याचा प्रयत्न महापालिका प्रशासन करीत आहे. क्रीडा भवनाचा अर्थसंकल्प कोट्यावधी रुपयांचा असून लाखो रुपयांच्या ठेवी आहेत. या क्रीडा भवनातर्फे महापालिका मुख्यालयासमोरीलच नव्हे तर शिवाजी पार्क तसेच विविध विभाग कार्यालये, यानगृहे, रुग्णालये, मुद्रणालय आदी मिळून ३१ ठिकाणी क्रीडा केंद्र चालविण्यात येतात. आर्थिक गैरव्यवहारामुळे कार्यकारिणी बरखास्तआर्थिक गैरव्यवहार झाल्यामुळे २०१० च्या सुमारास कार्यकारिणी बरखास्त करून त्याची जबाबदारी ए विभाग व जी उत्तर विभागाच्या सहाय्यक आयुक्तांकडे सोपविण्यात आली होती. दुसरीकडे तपास करून दोषींवर कारवाईही करण्यात आली. त्यानंतर निवडणूक घेऊन कारभार पुन्हा कार्यकारणीकडे सोपविणे आवश्यक होते. दोन वर्षांपूर्वी महापालिकेच्या तत्कालीन अतिरिक्त आयुक्त अश्विनी भिडे यांनी निवडणुका घेऊन कारभार कार्यकारिणीकडे सोपविण्याचे आदेश दिले होते.

मात्र त्यानंतरही निवडणूक घेण्यात आली नाही. आता मात्र क्रीडा भवन कार्यकारणी अस्तित्वात नसताना परस्पर निर्णय घेऊन या जागेचा पुनर्विकास करण्याचा घाट मुंबई महानगरपालिका घालत असल्याचा आरोप मुंबई जनता दलाचे अध्यक्ष प्रभाकर नारकर, कार्याध्यक्ष सलीम भाटी यांनी केला आहे.

## बांधकाम व्यावसायिकाकडील रोकड चोरी



**पुणे :** पैसे पडल्याची बतावणी करुन बांधकाम व्यावसायिकाच्या मोटारीतून एक लाख रुपयांची रोकड असलेली पिशवी चोरुन नेल्याची घटना कोरेगाव पार्क भागात घडली. याबाबत बांधकाम व्यावसायिक नवनाथ काकडे (वय४२ , रा. काकडे मळा, पूनावाला स्टड फार्मजवळ, थेऊर) यांनी कोरेगाव पार्क पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, काकडे बांधकाम व्यावसायिक आहेत. ते मंगळवारी (२३ एप्रिल) ढोले पाटील रस्त्यावरील धर्मादाय आयुक्त कार्यालयात आले होते.काकडे कामानिमित्त कार्यालयात गेले होते. काकडे यांच्या मोटारीवरील चालक संजय जाधव याने मोटार या परिसरातील उडपी रेस्टोरंटजवळ लावली होती. जाधव मोटारीत बसले होते. त्या वेळी एक चोरटा मोबाइलवर बोलत तेथे आला. त्याने मोटारचालक जाधव यांच्याकडे पैसे पडल्याची बतावणी केली.जाधव मोटारीतून खाली उतरले. त्यांचे लक्ष नसल्याची संधी चोरट्यांनी साधली. चोरट्याबरोबर असलेल्या साथीदारांनी मोटीरातील आसनावर ठेवलेली एक लाख रुपयांची रोकड, कपडे, क्रेडीट कार्ड, डेबिट कार्ड, ओळखपत्र असा मुद्देमाल ठेवलेली पिशवी चोरुन नेले. तेथे थांबलेल्या अजय खंडेलवाल यांच्या लक्षात हा प्रकार आला. त्यांनी याबाबतची माहिती मोटारचालक जाधव यांना दिली. पिशवी चोरुन चोरटे पसार झाले. सहायक फौजदार सावंत तपास करत आहेत.

# डोंबिवलीतील फेरफार अदालतमध्ये ४१ प्रकरणे निकाली

**महासागर प्रतिनिधी,**
**डोंबिवली, दि. २५ :** येथील पूर्व भागातील सुनीलनगरमधील बहिणाबाई चौधरी उद्यान जवळील नगरभूमापन कार्यालयात बुधवारी घेण्यात आलेल्या फेरफार अदालतमध्ये जमिनीशी संबंधित फेरफार नोंदीबाबतची ४१ प्रकरणे मार्गी लावण्यात उप अधीक्षक भूमी अभिलेख व नगरभूमापन विभागातील अधिकाऱ्यांना यश आले. कल्याण भूमी अभिलेख विभागातील उप अधीक्षक नितीन साळुंखे यांच्या पुढाकारातून डोंबिवलीत फेरफार अदालतचा कार्यक्रम बुधवारी आयोजित करण्यात आला होता. भूमि अभिलेख उप अधीक्षक साळुंखे आणि नगरभूमापन विभागातील परिक्षण भूमापक यांनी एकत्रितपणे घेतलेल्या या अदालतमध्ये एकूण ४१ नागरिकांची डोंबिवली परिसरातील फेरफारासंदर्भातची प्रकरणे मार्गी लागली. डोंबिवलीमधील नगरभूमापन



परिक्षेत्रातील ठाकुर्ली, चोळे, आयरे, शिवाजीनगर आणि परिसरातील मिळकत पत्रिकेवरील काही नागरिकांचे विविध प्रकारच्या फेरफार नोंदी विषयीचे अनेक प्रश्न काही वर्षांपासून प्रलंबित होते. या नोंदीबाबत काही तांत्रिक अडचणी होत्या. हे नागरिक नियमित भूमि अभिलेख, नगरभूमापन विभागात फेऱ्या मारून आपली प्रकरणे मार्गी लावण्यासाठी प्रयत्न करत होते. अशाप्रकारचे अनेक नागरिक मिळकत पत्रिकेवर फेरफार नोंदीसाठी प्रयत्न करत असल्याचे निदर्शनास आल्यावर उप अधीक्षक भूमि अभिलेख नितीन साळुंखे यांच्या पुढाकाराने नगरभूमापन डोंबिवली यांच्या सहकार्याने हा फेरफार नोंदीचा नागरिकांचा विषय कायमचा एकाच ठिकाणी एक खिडकी पध्दतीसारखा मार्गी लावण्याचा निर्णय घेण्यात आला.हेही वाचाडोंबिवलीत हेदुटणे येथे खिल्लार बैलांच्या सहभागातून दहशतवादी हल्ल्याचा निषेध, बैलगाडा संघटनांचे तीव्र आंदोलनयासाठी बुधवारी डोंबिवलीत फेरफार अदालत घेण्यात आली. या अदालतमध्ये ४१ नागरिकांनी काही महिन्यांपासून रखडलेली मिळकत पत्रिकांवरील फेरफार नोंद, मानीव अभिहस्तांतरण, खरेदी दस्तऐवजाने फेरफार नोंद करणे, बोजा मधील नोंद कमी करणे, धारणाधिकार बदल, दस्तऐवजावरील नावात बदल, मिळकतीवरील मयत व्यक्तिचे नाव कमी करणे अशी प्रकरणे मार्गी लावण्यात आली. एकाच व्यासपीठावर एकाच ठिकाणी धावपळ न करता फेरफार नोंदीचे काम झाल्याने उपस्थित नागरिकांनी समाधान व्यक्त केले.

# इथे आढळतात दुर्मिळ काळे वाघ!

**महासागर प्रतिनिधी,**
**मुंबई, दि. २५ :** ओडिशामधील सिमिलिपाल उद्यानाला अखेर राष्ट्रीय उद्यानाचा दर्जा मिळाला आहे. २४ एप्रिल २०२५ रोजी ओडिशा सरकारने अधिकृत अधिसूचना जारी करून सिमिलिपालला भारतातील १०७वे आणि ओडिशातील दुसरे राष्ट्रीय उद्यान घोषित केले आहे. हे उद्यान८४५.७० . चौरस किलोमीटर क्षेत्रफळावर पसरलेले असून, हे ओडिशातील सर्वात मोठे राष्ट्रीय उद्यान ठरले आहे.मयूरभंज जिल्ह्यातील सिमिलिपाल दक्षिण आणि उत्तर वन विभागांतील ११ रेंजमध्ये हे उद्यान पसरले आहे. सिमिलिपाल हे भारतातील एकमेव ठिकाण आहे जिथे दुर्मिळ काळे वाघ (मेलॅनिस्टिक) आढळतात. येथे ५५ स्तनधारी प्रजाती, ३६१ पक्षी प्रजाती, ६२ सरपटणारे प्राणी आणि २१ उभयचर प्रजातींचा वावर आहे. सिमिलिपाल हे



युनेस्कोच्या बायोस्फिअर रिझर्व्हमध्ये समाविष्ट असून, प्रोजेक्ट टायगर आणि हत्ती राखीव क्षेत्राचा भाग आहे. सिमिलिपालला १४५४ मध्ये राखीव जंगल घोषित करण्यात आले. '४७४ मध्ये वन्यजीव अभयारण्य, १४८० मध्ये राष्ट्रीय उद्यानाचा प्रस्ताव मांडण्यात आला होता. मात्र, कोअर क्षेत्रात मानवी वस्ती असल्यामुळे ही प्रक्रिया अनेक दशकांपासून प्रलंबित होती. सरकारने सहा गावांपैकी पाच गावांचे पुनर्वसन केले असून, बकुआ गावातील ६१ कुटुंबे अद्याप त्या भागात वास्तव्यास आहेत. सिमिलिपाल राष्ट्रीय उद्यान ओडिशाच्या मयूरभंज जिल्ह्यात स्थित आहे. हे उद्यान८४५.७० . चौरस किलोमीटर क्षेत्रफळावर पसरलेले आहे. संपूर्ण सिमिलिपाल बायोस्फिअर रिझर्व्हचे क्षेत्रफळ ४,३७४, चौरस किलोमीटर आहे, ज्यामध्ये कोअर क्षेत्र (८४५ चौरस किलोमीटर), बफर क्षेत्र (२,१२४, चौरस किलोमीटर) आणि ट्रान्झिशन क्षेत्र (१,४००, चौरस किलोमीटर) यांचा समावेश आहे.जैवविविधता आणि पर्यावरणीय वैशिष्ट्ये वनस्पती : सिमिलिपालमध्ये १,०७६, पेक्षा अधिक वनस्पती प्रजाती आढळतात, ज्यात ४४ प्रकारच्या ऑर्किड्सचा समावेश आहे. हे जंगल औषधी आणि सुगंधी वनस्पतींसाठी प्रसिद्ध आहे, ज्यामुळे स्थानिक आदिवासी समाजाला उपजीविकेचा स्रोत मिळतो.

## महाराष्ट्र दिनानिमित्त वाशिममध्ये मुतखडा व मूत्रविकारांवरील मोफत उपचार शिबीर शिव होमिओपॅथिक क्लिनिकचा स्तुत्य उपक्रम

▶ महासागर प्रतिनिधी ▶

**वाशिम**- महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून शिव होमिओपॅथिक क्लिनिकच्या वतीने मुतखडा व संबंधीत मूत्रविकाराच्या गंभीर आजारांवरील मोफत निदान व उपचार शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. हे शिबीर गुरुवार, १ मे महाराष्ट्रदिनी सकाळी ११ ते सायंकाळी ५ या वेळेत महालक्ष्मी पेट्रोलपंप रोडवरील शिव होमिओपॅथिक क्लिनिक येथे आयोजीत करण्यात आले आहे.

या शिबिरात जिल्हयातील नामांकित होमिओपॅथिक तज्ज्ञ डॉ. कपिल प्रकाशराव वानखेडे (एम.डी. होमिओपॅथी) हे रुग्णांची तपासणी करून त्यांना वैयक्तिक मार्गदर्शन व उपचार देतील. मुतखडा व संबंधीत मुत्रविकारासाठी होमिओपॅथिक औषधोपचार प्रभावी ठरू शकतात, हे या शिबिरामधून दाखवून दिले जाणार आहे. शस्त्रक्रियेचा पर्याय टाळून केवळ औषधोपचारांच्या माध्यमातून मुतखड्यांपासून मुक्ती मिळू शकते, असे तज्ज्ञांचे म्हणणे आहे. तसेच वारंवार खडे होण्याची प्रवृत्ती देखील योग्य उपचारांमुळे कमी करता येते. शिबिरामध्ये सहभागी होणा?्या रुग्णांनी आपले जुने वैद्यकीय रिपोर्ट्स, जसे की एक्स-रे, सोनोग्राफी व रक्ततपासणीचे अहवाल सोबत आणावेत. नाव नोंदणी आवश्यक असून त्यासाठी नाममात्र शुल्क १०० रुपये निश्चित करण्यात आले आहे. प्रत्येक रुग्णास तात्काळ १५ दिवसांची औषधोपचार सेवा दिली जाणार आहे. या शिबिरासाठी डॉ. कपिल वानखेडे (मो. ९८२३७९३८६८) आणि संतोष जावळे (मो. ८८०६१६७६५९) यांच्याशी संपर्क साधून नोंदणी करुन रुग्णांनी या सुवर्ण संधीचा लाभ घ्यावा असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# भारतीय गुणवत्ता परिषदेच्या पथकाकडून वाशिम 'झेडपी'चे मूल्यमापन!





▶ महासागर प्रतिनिधी ▶

**वाशिम**- नागरिकांचे दैनंदिन जीवन सुखकर करण्यासाठी राज्य शासनाकडुन '१०० डेज' उपक्रमाची घोषणा केली होती. त्यानुसार जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी वैभव वाघमारे यांनी ॲक्शन प्लॅन आखला होता. त्यानुसार सर्वच विभाग प्रमुखांनी या उपक्रमांमध्ये झोकून दिले होते. त्याचेच फलित म्हणून वाशिम जिल्हा परिषद अमरावती विभागातून अव्वल ठरली. या पार्श्वभूमीवर मूल्यमापन करण्यासाठी भारतीय गुणवत्ता परिषदेचे (क्यूसीआय) पथक बुधवारी जिल्हा परिषदेत दाखल झाले होते. या पथकाने प्रत्येक उपाययोजनेचे मूल्यमापन केले.

मुख्यमंत्री पदाची सूत्रे हाती घेताच देवेंद्र फडणवीस यांनी '१०० डेज' हा उपक्रम राबविण्याची घोषणा केली होती. त्यानुसार कामाला लागण्याचे निर्देश प्रशासनाला देण्यात आले होते. यानंतर विलंब न करता जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी वैभव वाघमारे यांनी सर्व विभाग प्रमुखांची बैठक घेतली. या बैठकीत शंभर दिवसांचा ॲक्शन प्लॅन आखला. त्यानुसार कामकाज सुरू करण्यात आले. अनेक योजनांमध्ये वाशिम जिल्हा परिषद आघाडीवर राहिली. त्यामुळे विभागीय आयुक्तांनी राज्यस्तरावर अंतिम निवडीसाठी वाशिम जिल्हा परिषदेची शिफारस केली होती. याच पार्श्वभूमीवर उपक्रमाचे मूल्यमापन करण्यासाठी भारतीय गुणवत्ता परिषदेचे (क्यूसीआय) अत्कर्ष अग्रवाल यांच्या नेतृत्वातील पथक गुरुवारी दाखल झाले. या पथकाने प्रत्येक उपाययोजनेचा आढावा घेतला. महात्मा फुले सभागृहात झालेल्या आढावा बैठकीत त्यांनी सीईओ वाघमारे यांनी राबविलेल्या उपक्रमाचे कौतुक करुन समाधान व्यक्त केले. त्यामुळे विभागस्तरावर अव्वल ठरलेली वाशिम जिल्हा परिषद राज्यस्तरावर कोणत्या क्रमांकापर्यंत झेपावते हे येणा?्या काही दिवसांत स्पष्ट होईल. यावेळी सीईओ वैभव वाघमारे, जिल्हा ग्रामिण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक किरण गणेश कोवे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सुनिल निकम, लेखा व वित्त अधिकारी दिनकर जाधव, सामान्य प्रशासन विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी प्रफुल्ल भोरखडे, जल जीवन मिशनचे प्रकल्प संचालक श्रीराम कुळकर्णी, ग्रामिण पाणी पुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता अजिंक्य वानखेडे व इतर विभाग प्रमुख उपस्थित उपस्थित होते.

**काय आहे 'क्यूसीआय'**

भारतीय गुणवत्ता परिषद (क्युसीआय) ही एक राष्ट्रीय संस्था आहे. जी भारताच्या गुणवत्ता आणि मानकांमध्ये सुधारणा करण्यासाठी काम करते. या संस्थेचे मुख्य उद्दिष्ट म्हणजे देशातील उद्योग आणि सेवांच्या गुणवत्तेत वाढ करणे तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताच्या उत्पादनांची गुणवत्ता स्थापित करणे आहे.

**सात निकषांवर तपासणीः**

केंद्र शासनाच्या १०० दिवसांच्या कार्यक्रमांतर्गत Quality Council of India (QCI) द्वारे जिल्हा परिषदेची तपासणी करताना खालील प्रमुख निकषांवर आधारित तपासणी करण्यात आली.

१. प्रशासकीय कार्यक्षमताः यामध्ये कार्यालयीन कामकाजाची गती आणि प्रलंबित प्रकरणांचे निराकरण, सात कलमी कृती कार्यक्रमांतर्गत केलेली प्रगती, अभिलेखांचे डिजिटलायझेशन आणि सुसूत्रीकरण यांचा समावेश होतो.

२. नागरिक-केंद्रित सेवाः सनद वितरण यासारख्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी, लोकशाही दिन किंवा ऑनलाइन तक्रार निवारण यंत्रणेद्वारे तक्रारींचे निराकरण, नागरिकांच्या समस्यांवर त्वरित कारवाई आणि सकारात्मक दृष्टिकोनाला प्रोत्साहन.

३. पायाभूत सुविधा आणि गुणवत्ताः शाळांमध्ये CCTV यासारख्या सुविधांची स्थापना आणि देखभाल, स्वच्छता सुविधा (उदा., शौचालये) आणि कार्यालयीन परिसराची स्वच्छता, स्वच्छ भारत मिशन अंतर्गत शौचालय बांधकाम आणि इतर पायाभूत सुविधांचा आढावा.

४. गुणवत्ता मानके आणि प्रमाणनः भारतीय गुणवत्ता परिषदेच्या मानकांनुसार (उदा., ISO ९००१, ISO १४००१) गुणवत्ता व्यवस्थापन प्रणालीचे पालन, शिक्षण, आरोग्य, आणि पर्यावरण संरक्षण यासारख्या क्षेत्रांमध्ये गुणवत्ता मानकांचे पालन.

५. योजनांची अंमलबजावणी आणि नाविन्यः वन डिस्ट्रिक्ट वन प्रोडक्ट (ODOP) किंवा उद्य टॅगिंग यासारख्या केंद्र आणि राज्य सरकारच्या योजनांची अंमलबजावणी, जिल्हा परिषदेद्वारे राबविल्या जाणा?्या नाविन्यपूर्ण उपक्रमांचे मूल्यमापन, उद्योगस्नेही वातावरण निर्माण करणे आणि गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी केलेले प्रयत्न.

६. डेटा आणि अहवाल सादरीकरणः तपासणी अहवाल, प्रगती अहवाल, आणि छायाचित्रांसह (जिओ-टॅगिंगसह) सविस्तर माहिती सादर करणे, कार्यालयीन वेबसाइट अद्ययावत ठेवणे आणि माहितीच्या अधिकार (RTI) कायद्याचे पालन.

७. सहभाग आणि जबाबदारीः सर्व संबंधित शासकीय कार्यालयांचा सक्रिय सहभाग सुनिश्चित करणे, जिल्हा परिषदेतील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची जबाबदारी आणि नियोजन क्षमता.

**लोकाभिमूख आणि पारदर्शक प्रशासनाची दखलः**

सीईआहे वैभव वाघमारे यांनी वाशिम जिल्हा परिषदेची सुत्रे हाती घेताच आपल्या कार्यशैलीचा परिचय दिला. सर्व कर्मचाऱ्यांना वेळेचे कठोर बंधन घालुन त्यांना आपल्या कर्तव्याची जाणीव करुन दिली. ग्रामिण भागात राहणाऱ्या गरीब, शेतकरी आणि वंचित घटकातील लोकांचे जीवनमान उंचविण्यासाठी श्री वाघमारे यांनी कंबर कसुन आणि झोकुन देऊन काम केले. एक कर्तव्यतत्पर, आणि प्रामाणिक अधिकारी म्हणुन जिल्ह्यातील लोकांच्या मनात घर केले आहे. त्यांनी राबविलेल्या उपक्रम विभाग आणि राज्यस्तरावरही उल्लेखनीय ठरले आहेत. त्यामध्ये बोलकी अंगणवाडी आणि शाळा, महिन्याच्या दर तिसऱ्या गुरुवारी तक्रार निवारण दिन, आणि ग्रामविकासाकरीता आखलेला अकरा कलमी कार्यक्रम यांचा समावेश आहे. लोकाभिमूख आणि पारदर्शक प्रशासक म्हणुन त्याचा लौकिक राज्यभर आहे. भारतीय गुणवत्ता परिषदेच्या (क्युसीआय) तपासणी पथकांनी या उपक्रमांची नोंद घेतली.

## विलेपार्लेतील जैन मंदिर पाडल्याच्या निषेधार्थ तहसिलदारांना निवेदन



विले-पार्लेपूर्व मुंबई येथील जैन मंदिर उध्वस्त केलेल्या महानगरपालिका अधिकाऱ्यांचे निलंबन करुन तातडीने जैन मंदिर पुनर्निर्माण करणेबाबत

▶ महासागर प्रतिनिधी ▶

**मालेगांव**- मुंबई महापालिकेने दि. १६ एप्रिल २०२५ रोजी विले पार्ले पूर्व मुंबई येथील अधिकृत दिगंबर जैन मंदिर पाडल्यामुळे देशभर जैन समाजात संतापाची लाट उसळली आहे. मुंबई उच्च न्यायालयाने स्थगिती दिली असतानाही घाईघाईत मुंबई महापालिका प्रशासनाने मंदिर जमीनदोस्त करुन जैन समाजाच्या भावना दुखावल्या आहेत.

मुंबई महापालिकेच्या या जैन मंदिर पाडण्याचा बेकायदेशीर कृत्याचा श्री वृषभनाथ दिगंबर जैन मंदिर ट्रस्ट व सकल दिगंबर जैन समाज मालेगाव (जहाँगीर) यांच्या वतीने निषेध करत आहे. जैन मंदिर पाडणाऱ्या अधिकारी वर्ग व कर्मचाऱ्यांवर तातडीने कायदेशीर कारवाई करण्याची आमची मागणी गांभीर्याने घ्यावी.जैन तिर्थक्षेत्र आणि मंदिरे हि भारतीय संस्कृतीचे भुषण आहे. अल्पसंख्याक जैन समाज हा कायमच देशाच्या विकासासाठी कटीबध्द असुन या समाजाचे राज्याच्या चौफेर विकासासाठी मोठे योगदान आहे. ष

गेली अनेक वर्ष मुंबईत अहिंसक दिगंबर जैन समाज या जैन मंदिरात भक्तीभावाने पूजा अर्चना करुन भारतीय संविधानाने दिलेली धार्मिक उपासना श्रध्देने करत आहे. जैन धर्म आणि समाज हा राष्ट्रीय प्रवाहात राहुन सांप्रदायिक सहिष्णुता पालन करतो. अशा समाजाचे उपासना स्थळ उध्वस्त करणे हे शासनास व महापालिका प्रशासनास शोभनिय व समर्थनीय नाही. यामागे बिल्डर लांबीचा हात आहे. याची शासनाने सखोल चौकशी करुन अधिकृत जैन मंदिर अनाधिकृतपणे उध्वस्त करणाऱ्या संबंधित महापालिका अधिकारी व कर्मचाऱ्यांना तातडीने निलंबित करावे आणि पुर्ववत जैन मंदिर निर्माण कार्य पुर्ण करुन दयावे मालेगांव सकल दिगंबर जैन समाज मोठ्या संख्येने उपस्थिती होती असे निवेदन तहसिलदार मालेगांव यांना देण्यात आले.

## संस्कार विद्या मंदिर मेडशी येथे संस्कार शिष्यवृत्ती परीक्षा २०२५ संपन्न

▶ महासागर प्रतिनिधी ▶

**मेडशी**- या परीक्षेला मालेगाव तालुक्यातून वर्ग सातवीचे ३५ व वर्ग चौथीचे ७२ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाविषयी आवड निर्माण व्हावी या हेतूने संस्कार विद्या मंदिर मेडशी या शाळेने शिष्यवृत्ती परीक्षा घेण्याचे ठरवले. संस्कार शिष्यवृत्ती परीक्षा हे पहिले वर्ष आहे.

या परीक्षेमध्ये पास होणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रथम बक्षीस सात हजार रुपये. द्वितीय बक्षीस पाच हजार रुपये. तसेच ज्या विद्यार्थ्यांनी ५०टक्के च्या वर गुण मिळवले असतील त्या विद्यार्थ्यांना उन्हाळी शिबिरामध्ये मोफत प्रवेश मिळेल.ही परीक्षा ५० गुणांची होती. परीक्षाही ऑफलाइन पद्धतीने होती तसेच परीक्षेसाठी एक तासाचा वेळ ठेवण्यात आला होता.



परीक्षेसाठी मराठी इंग्रजी गणित विज्ञान इतिहास हे विषय ठेवण्यात आले होते. परीक्षाही चांगल्या पद्धतीने संपन्न झाली. या परीक्षेत पास होणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना उन्हाळी शिबिरामध्ये मोफत प्रवेश मिळणार आहे. उन्हाळी शिबिराचे फायदे विद्यार्थ्यांना नवीन गोष्टी शिकायला मिळणार आहेत. विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक कौशल्याचा विकास होईल. विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढेल. विद्यार्थ्यांमध्ये कठीण विषयाबद्दलची भीती कमी होईल.देशी खेळांची मोफत प्रशिक्षण,शास्त्रीय संगीताचे मोफत प्रशिक्षण तसेच वेदिक मॅथेमॅटिक्स व अबॅकस सारख्या विषयाबद्दल माहिती.विद्यार्थ्यांची स्टेज डेरिंग कशी वाढवावी याबद्दल मार्गदर्शन. अशा प्रकारच्या विविध उपक्रम या उन्हाळी शिबिर मध्ये घेण्यात येणार आहेत.

## चिखली रस्त्याचे डांबरीकरण पूर्ण करा अन्यथा गावकऱ्यांसह ठिय्या आंदोलन करणार; सरपंच अढाव व उपसरपंच बर्डे यांचा इशारा

▶ महासागर प्रतिनिधी ▶

**वाशीम**- मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत वाशीम - चिखली खुर्द ते आसोला फाटा ( शेलू बाजार रस्ता ) पर्यंतचे अर्धवट राहिलेले काम डांबरीकरण करून पूर्ण करण्याच्या दृष्टीने येत्या २९ एप्रील पर्यंत कामास प्रत्यक्ष सुरुवात न केल्यास येत्या ३० एप्रिल पासून गावकऱ्यांसह कार्यकारी अभियंता, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना यांच्या कार्यालयात ठिय्या आंदोलन करणार असल्याचे गट ग्राम पंचायत चिखली खुर्द च्या सरपंच संध्या गणेशराव आढाव व उपसरपंच बाळूभाऊ बर्डे, संतोष सुर्वे यांनी ग्रामविकास मंत्री, पालकमंत्री वाशीम, प्रधान सचिव ग्रामविकास विभाग, अधीक्षक व कार्यकारी अभियंता मुख्यमंत्री ग्रामसडक योजना यांना जिल्हाधिकारी यांच्यामार्फत दिलेल्या निवेदन पत्राद्वारे म्हटले आहे.

निवेदनात पुढे म्हटले आहे की, मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत वाशीम - चिखली खुर्द ते आसोला फाटा ( शेलुबाजार रस्ता ) हा अंदाजे ४.८ किमी रस्ता मंजूर करण्यात आला. सर्व तांत्रिक, प्रशासकीय बाबी पूर्ण करून अंदाजे दीड वर्षांपूर्वी रस्त्याच्या कामाला



प्रत्यक्षात सुरुवात करण्यात आली.

त्यानुसार काही दिवसातच स्क्रपिंग करून बिबिएम् चे दोन थर टाकण्यात आले. कच्चा रस्ता तयार झाला. परंतु सिलकोट व त्यावर कार्पेट / डांबर टाकण्याचेच काम शिल्लक आहे. सद्यस्थितीत या रस्त्यावर जागोजागी खड्डे पडले असून रस्ता खूप खराब झालेला आहे. अनेक वाहने खिळखिळी होऊन खराब होत आहेत. शिवाय शारीरिक इजा, मणक्याचे आजार उफाळत असून ज्येष्ठ नागरिकांना, शाळेतील विद्यार्थ्यांना खूप त्रास होत आहे. सबब आता या रस्त्याचे उर्वरित काम होणे अत्यंत आवश्यक बनले आहे.

आम्ही ग्राम पंचायत व सामाजिक संघटना पदाधिकारी म्हणून वेळोवेळी संबंधित कंत्राटदार, अधिकारी यांच्याशी फोनवरून, प्रत्यक्ष भेटून संपर्क केला असता निधी नसल्यामुळे काम बंद असल्याचे सांगण्यात येते. मा. आमदार महोदय हे सुद्धा याबाबतीत संबंधित सर्वांशी दोन वेळा बोलले परंतु कामाला सुरुवात होत नाही आहे. जर हा उन्हाळा निघून गेला तर पुढे सहा ( ६ ) महिने काम करता येणार नाही. पर्यायाने दरम्यानच्या काळात हा रस्ता पूर्वीपेक्षाही खराब होईल.

परिणामी नागरिकांना दळणवळनास फार त्रास होणार आहे. करिता सदर रस्त्याचे जवळपास ३० टक्केच राहिलेले काम पूर्ण करण्याच्या दृष्टीने येत्या २९ एप्रिल पर्यंत सुरुवात करण्यासाठी योग्य ते निर्देश द्यावेत, प्रयत्न करावे अन्यथा दिनांक ३० एप्रिल पासून आम्ही चिखली खुर्द, कामठवाडा, वाघजाळी, सुराळा, आसोला जहाँ., गोंडेगाव येथील महिला, विद्यार्थी, पुरुष दररोज सकाळी १० ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत कार्यकारी अभियंता, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना कार्यालय, वाशीम येथे मागणी पूर्ण होईपर्यंत ठिय्या आंदोलन करू. कायदा व सुव्यवस्थेची स्थिती उद्भवल्यास अथवा काही अनुचित प्रकार घडल्यास संबंधित विभाग जबाबदार राहील.

## २८ एप्रिल रोजी सकाळी शिवचरित्र व्याख्याते डॉ.शिवरत्न शेटे यांचे जाहीर व्याख्यान

▶ महासागर प्रतिनिधी ▶

वाशिम- छत्रपती शिवराय ते महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरां पर्यंतचा प्रवास उलगडणार हिंदवी परिवार वाशिम जिल्ह्याच्यावतीने 'छत्रपती शिवराय ते महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर' या विषयावर भव्य जाहीर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे.

हे व्याख्यान येत्या २८ एप्रिल रोजी सकाळी ८:३० वाजता, वाशिम येथील एच२एम मल्टीप्लेक्स सिनेमा हॉल, पाटणी कमर्शियल कॉम्प्लेक्स येथे होणार आहे. या कार्यक्रमात सोलापूर येथील प्रसिद्ध शिवचरित्र व्याख्याते डॉ. शिवरत्न शेटे मार्गदर्शन करणार आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांपासून सुरू होणाऱ्या समाज परिवर्तनाच्या प्रवासाला महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेली दिशा या व्याख्यानात उलगडण्यात येणार आहे. हा कार्यक्रम हिंदवी परिवार वाशिम जिल्हा यांच्यावतीने आयोजित



करण्यात आला असून अशोकजी हेडा माजी नगराध्यक्ष यांचे विशेष सहकार्य लाभले आहे. कार्यक्रम सर्वांसाठी खुला असून, वेळेच्या अचूकतेसाठी उपस्थित राहणाऱ्यांनी वेळे आधी सभागृहात दाखल होण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे. कामकाजाचा दिवस असल्यामुळे कार्यक्रम वेळेत सुरू होऊन वेळेतच संपवण्यात येईल, असेही आयोजकांनी स्पष्ट केले आहे.

# अहो पोलीस अधीक्षक साहेब मानोरा शहरात खुलेआम चालतो वरली मटका

▶ विनोद तायडे ▶

**वाशीम** - 'सद्रक्षणाय खलनिग्रहणाय' हे ब्रीदवाक्य गाजवणाऱ्या पोलिस विभागाकडून जनतेला संरक्षण मिळण्याऐवजी, गुन्हेगारांना अप्रत्यक्षपणे पाठीशी घालण्याचे प्रकार समोर येत आहेत. मानोरा शहरात मटका आणि इतर अवैध धंदे दिवसाढवळ्या खुलेआम चालू असूनही, स्थानिक पोलीस अधिकारी 'धंदा सुरू नाही' असे म्हणत जनतेच्या डोळ्यात धूळफेक करत आहेत.

शहरातील प्रमुख रस्ते, गल्लीबोळ, पान टपऱ्या, टिन शेड कॅबिन्स आणि अगदी काही अलिशान कॉम्प्लेक्समध्ये देखील मटक्याचा धंदा जोरात सुरू आहे. भाजी बाजार परिसर, बसस्थानकाजवळ, गॅस एजन्सीच्या आसपासची टपऱ्या, बोदडबन, पंचायत समिती परिसर ही ठिकाणे मटक्याची मुख्य केंद्रे बनली आहेत. आश्चर्य म्हणजे, ही ठिकाणं मानोरा पोलिस स्टेशनपासून काही मीटर अंतरावर आहेत. सकाळ- संध्याकाळ मटक्याचा डाव रंगतो दररोज सकाळी आणि संध्याकाळी 'ओपन-क्लोज' आकड्यांवर लाखो रुपयांची उलाढाल होते.

या टपऱ्यांवर 'ओपन-क्लोज'च्या आकड्यांची फलके उघडपणे झळकत असतात. नागरिकांच्या नजरेत हे चित्र दररोज पडते, पण पोलिसांच्या नजरेस ते कधीच येत नाही, हा आश्चर्याचा विषय आहे की, नाकर्तेपणाचा? पोलिसांची यंत्रणा आहे तरी परिणाम शून्य दिसत आहे. मानोरा पोलीस स्टेशन, गुन्हे शाखा, पोलीस उपनिरीक्षक, ठाणेदार आदींची भक्कम यंत्रणा असून देखील









## पोलिसांच्या नाकर्तेपणावर जनतेचा रोष

शहरात मटक्यासारखा अवैध व्यवसाय बिनधास्त सुरू आहे. विशेष म्हणजे, याच पोलिस स्टेशनच्या हाकेच्या अंतरावर मटका टपऱ्या फुलत असताना कारवाई नाही, ही गोष्ट संशयास्पद आहे. हे अंधत्व नैसर्गिक आहे की मुद्दाम घेतलेली भूमिका, हा प्रश्न आता सतत विचारला जातोय. पोलिसांची ही 'सोईस्कर आंधळीपणाची भूमिका' आता शहरवासीयांना संशयाच्या भोवऱ्यात लोटते आहे. विशेष गुन्हे शाखा, उपनिरीक्षक, ठाणेदार आणि पोलीस चौक्यांची यंत्रणा असूनही एकही ठोस कारवाई का होत नाही? दररोज लाखोंची उलाढाल असलेल्या या धंद्यामागे कोणाचे वरदहस्त आहे,.

हे आता जनतेला समजणे फारसे कठीण राहिलेले नाही. 'शहरात मटका सुरू नाही, कुठे असल्यास माहिती द्या, कारवाई करू,' असे सांगणारे पोलीस उपनिरीक्षक अभिजित बारे यांचे वक्तव्य म्हणजे जनतेच्या डोळ्यांत झापड घालण्याचा हास्यास्पद प्रयत्न आहे. कारण, नागरिकच जर माहिती देत असतील तर मग पोलीस यंत्रणेचा उपयोग तरी काय? यंत्रणाच गुन्हेगारांना संरक्षण देतेय का? मटक्याच्या टपऱ्यांवर दिसणारी मोकळीक, पोलिसांच्या अगदी जवळच धंदा बिनधास्त सुरू असणं, आणि यंत्रणेचे 'मौन' - यामुळे आता एक नवा प्रश्न निर्माण झालायः या अवैध धंद्यांना पोलीसच मूक आश्रय देत आहेत का? कारण इतक्या मोठ्या प्रमाणावर चालणाऱ्या गुन्हेगारीवर कारवाई न होणं म्हणजे ती अपरिहार्यपणे शासकीय आणि प्रशासकीय 'संरक्षणा'खालीच फोफावत असावी, असाच संशय निर्माण होतोशहरातील कायदा व सुव्यवस्थेचा खेळ खंडोबा झाल्याचा संताप सामान्य नागरिकां मध्ये आहे. 'जर पोलीसच दुर्लक्ष करत असतील, तर गुन्हेगारांना बळ मिळणार नाही का?' असा सवाल आता प्रत्येकाच्या मनात घर करू लागला आहे.

हा मटका व्यवसाय नेमका कोणाच्या आशीर्वादाने चालतो? पोलिसांच्या नजरेस न पडणाऱ्या या टपऱ्यांची माहिती स्थानिक नागरिक आणि पत्रकार देऊ शकतात, तर पोलीस का गप्प? हे प्रश्न आता पोलिसांच्या नाकर्तेपणावर बोट ठेवत आहेत. अहो एस.पी. साहेब तात्काळ छापे टाकून अवैध धंद्यांचा बंदोबस्त करावा, दोषींवर कठोर कारवाई करावी आणि पोलिसांच्या भूमिकेची चौकशी व्हावी अशी मागणी जोर धरत आहे.




# 'गझवा-ए-हिंद' की 'सनातन राष्ट्र'?

**प्रस्तावना**

भारत आज विकासाच्या, विज्ञान-तंत्रज्ञानाच्या आणि जागतिक सहकार्याच्या दिशेने वाटचाल करत असतानाच, त्याच वेळी एक अंतर्गत धोका दिवसेंदिवस गडद होत आहे तो म्हणजे गझवा-ए-हिंदचा धोका ! 'गझवा-ए-हिंद' म्हणजे भारतात जिहादी राष्ट्र स्थापनेच्या दिशेने उचललेली कट्टरपंथीय पावले ! ही फक्त विचार, कल्पना नाही, तर प्रत्यक्षात अमलात आणण्याचे कट रचले जात आहेत. सध्या मोठ्या प्रमाणात चालू असलेला लव्ह जिहाद, भूमी जिहाद, हलाल जिहाद हे याच गझवा-ए-हिंदचे छोटे रूप आहे. आयसिस (ISIS), अल कायदा, अन्सार-उल-इस्लाम, पीएफआय यांसारख्या संघटना सोशल मीडियाच्या माध्यमातून तरुणांमध्ये विष पेरत आहेत. त्यांचे स्थानिक समर्थन करणारे 'स्लीपर सेल्स' भारतात हळूहळू पाळेमुळे रोवू पाहत आहेत. संयुक्त राष्ट्रांच्या अहवालांनुसार, भारतातील अनेक ठिकाणी, विशेषतः केरळ, कर्नाटक, आंध्र प्रदेश, तेलंगणा, महाराष्ट्र, तामिळनाडू, पश्चिम बंगाल, राजस्थान, बिहार, उत्तर प्रदेश आणि मध्य प्रदेशमध्ये इसिसशी संबंधित आतंकवादी कारवाया उघडकीस आल्या आहेत. शिक्षित तरुणांना लक्ष्य करून त्यांच्या विचारसरणीचा वापर करून त्यांना जिहादच्या मार्गावर नेले जात आहे. यामागे केवळ हिंसाचार नाही, तर भारतात 'खिलाफत' प्रस्थापित करण्याचा दुष्ट हेतू आहे. या पार्श्वभूमीवर हिंदूंनी आत्मपरीक्षण करणे आवश्यक आहे आपण निधर्मी राष्ट्रात सुरक्षित आहोत का? त्यासाठी छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रेरणेने उभ्या राहिलेल्या हिंदवी स्वराज्याच्या पावलांवर पाऊल ठेवून, आता भारताला पुन्हा एकदा सनातन राष्ट्र, हिंदु राष्ट्र, रामराज्य बनवण्यासाठी सज्ज व्हावे लागेल. कारण ही हिंदूंच्या अस्तित्वाची, सनातन संस्कृतीच्या पुनरुत्थानाची लढाई आहे. गझवा-ए-हिंदला सनातन राष्ट्र हेच एकमेव उत्तर आहे, हे हिंदूंच्या मनावर अंकित करावे लागेल.

**आतंकवादाला धर्म असतो याची प्रचिती !**

नुकताच पहलगाममध्ये पर्यटकांवर दहशतवाद्यांनी केलेल्या भ्याड हल्ल्यात २६ जणांचा मृत्यू झाल्याची भीती व्यक्त करण्यात आली आहे. कलम ३७० हटवल्या नंतरही दहशतवादी हल्ले चालूच आहेत. आज पुन्हा काश्मिर मध्ये हिंदु मारले गेले, जात विचारली नाही फक्त हिंदू आहेत का? एवढेच विचारले ! २६ हिंदुनी आपल्या प्राणांचे मोल देऊन आतंकवादाला धर्म असतो हे सिद्ध केले आहे. मुंबईमध्ये १९९२-९३ च्या दंगलीदरम्यान 'राधाबाई चाळ' या घटनेने शहराला हादरवून टाकले होते. ही चाळ मुंबईतील जोगेश्वरी भागात आहे. १९९३ च्या जानेवारी महिन्यात, या चाळीत ६ हिंदू नागरिकांना जिवंत जाळण्यात आले होते. या घटनेमध्ये हल्लेखोरांनी धर्म ओळखूनच हिंदुना लक्ष्य केले होते. अशा अनेक घटना हिंदूंवर विशिष्ट धर्माने केलेल्या अत्याचाराच्या साक्षी आहेत. आज पहलगाममध्ये जे घडलं, तेच मुर्शिदाबादमध्ये घडत आहे; सनातनी क्षेत्रांवर, सण-उत्सवांवर, मंदिरांवर, महिलांवर आणि संपूर्ण हिंदू समाजावर, तसेच संपूर्ण जगभरात अशाच प्रकारे हिंसा आणि नरसंहार चालू आहेत. पहलगाममधील आतंकवादी आक्रमणाचे दायित्व द रेझिस्टन्स फोर्स (टीआरएफ) या आतंकवादी संघटनेने स्वाकारले आहे. वर्ष २०४७ पर्यंत भारताला गझवा-ए-हिंद बनवण्याचे मोठे षड्यंत्र आय.एस.आय. आणि पॉप्युलर फ्रंट ऑफ इंडिया यांनी रचल्याचे राष्ट्रीय अन्वेषण यंत्रणेने उघड केले आहे.

**आतंकवाद्यांना भारतात गझवा-ए-हिंद आणायचे आहे**

इसीस, पीआयएफ आणि अफगाणिस्तानमधील ISIS-K यांनी भारताला गझवा-ए-हिंद बनवण्याचे षड्यंत्र रचले आहे. ISIS-K काश्मीरमध्ये 'स्लीपर सेल्स' म्हणून सक्रिय आहे, तसेच सोशल मीडिया प्रपोगंडाद्वारे भारतातील तरुणांना या संघटनांमध्ये भरती करत आहे. केरळ, पश्चिम बंगाल, कर्नाटक, उत्तर प्रदेश, महाराष्ट्र आणि जम्मू-काश्मीरमध्ये स्थानिक कट्टरवादी गटांशी संबंधित असलेल्या 'स्लीपर सेल्स' चा धोका आहे. यामुळे भारताला या धार्मिक कट्टरतेपासून मुक्त करण्यासाठी सनातन राष्ट्राची स्थापना करणे अनिवार्य आहे.

**इस्लामिक स्टेटची छुपी रणनीती !**

इस्लामिक स्टेट (ISIS) ही आतंकवादी संघटना इराक-सिरीयात अत्यंत क्रूर कृत्यांसाठी कुप्रसिद्ध आहे. १९९० मध्येच काश्मीरमध्ये निझाम-ए-मुस्तफा म्हणजेच इस्लामिक स्टेटची सुरुवात झाली होती. आजही चा धोका कायम आहे २०२४ मध्ये मॉस्कोमध्ये आणि २०२५ मध्ये न्यू ऑर्लिन्समध्ये प्रेरित हल्ले झाले. जरी त्यांचे भौगोलिक नियंत्रण संपले असले तरी, त्यांच्या गुप्त सेल्स, विचारधारा आणि प्रेरणेतून होणारे हल्ले हे जागतिक सुरक्षेसाठी आणि भारतातील सामाजिक शांततेसाठी गंभीर धोका निर्माण करत आहेत. त्यांनी आपली रणनिती बदली आहे थेट युद्धाऐवजी छुपा घात, विचारधारात्मक प्रचार, आणि स्थानिक गटांना प्रेरणा देणं हे आता त्यांच्या कारवायांचे केंद्रबिंदू आहे.

**हिंदू सुरक्षित आहेत का ?**

इसिस व्यतिरिक्त भारतासाठी धोका ठरू शकणाऱ्या लष्कर-ए-तोयबा, जैश-ए-मोहम्मद, हिज्बुल मुजाहिदीन पॉप्युलर फ्रंट ऑफ इंडिया, इंडियन मुजाहिदीन, अल-कायदा इन इंडियन सबकाँटिनंट, स्थानिक इस्लामी कट्टर गट (केरळ, बंगाल, तामिळनाडूतील), स्टुडंट्स इस्लामिक मूव्हमेंट ऑफ इंडिया या ८ प्रमुख दहशतवादी संघटना तसेच रोहिंग्या आणि बांगलादेशी घुसखोरी भारताच्या सुरक्षा आणि कायदा-व्यवस्थेला धोका आहेत. अहिंदूंची वाढती लोकसंख्या ही देश आणि हिंदु धर्म यांसाठी धोक्याची घंटा आहे. या व्यतिरिक्त गेल्या वर्षभरात हिंदूंना आत्मपरीक्षण करायला लावणाऱ्या अनेक घटना घडल्या. मुसलमानबहुल मुर्शिदाबादमध्ये वक्फ सुधारणा कायद्याच्या विरोधात धर्मांधांकडून करण्यात येत असलेल्या आंदोलनाच्या वेळी त्यांच्याकडून मोठ्या प्रमाणात हिंसाचार करण्यात आला. अनेक हिंदूंची घरे, दुकाने लुटण्यात आली आणि त्यांची जाळपोळ करण्यात आली. यामुळे घाबरलेल्या ४०० हून अधिक हिंदूंनी तेथून पलायन केले आहे. बंगालमध्ये झालेल्या हिंसाचारात मुर्शिदाबाद, मालदा, नाडिया, दक्षिण २४ परगणा हे ४ जिल्हे अशांत झालेले आहेत. बंगाल, बिहार, तसेच महाराष्ट्र राज्यांत धर्मांधांनी घडवून आणलेला हिंसाचार आता हळूहळू भारतातील इतर राज्यांमध्येही पसरत आहे. देशातील जिहादी गट, स्लीपर सेल्स आणि त्यांना समर्थन देणारे धर्मांध भारतासाठी मोठे आव्हान आहेत.



: संकलक :
अभय वर्तक,
प्रवक्ता, सनातन संस्था
संपर्क क्र. : ९९८७९ २२२२२

**सनातन राष्ट्रच सर्वांचे रक्षण करू शकते !**

हजारो वर्षांपासून कट्टरपंथीय भगव्या भारताला हिरवे बनवण्याची वाटच पहात आहेत. पूर्वीच्या काळातील जिहादी आक्रमकांनी केवळ भारतातील संपत्ती लुटली नाही, तर या भूमीतून हिंदु धर्म, हिंदु संस्कृती आणि हिंदू यांना नष्ट करून या देशावर हिरवा झेंडा फडकावण्याचे स्वप्न बाळगले. त्या काळी हिंदूंनी गाजवलेल्या पराक्रमामुळे त्यांचे हे स्वप्न कधीच पूर्ण होऊ शकले नाही. आता हेच स्वप्न बाळगून जगभरातील जिहादी, आतंकवादी आणि धर्मांध भारताला अन् हिंदूंना लक्ष्य करत आहेत. पलायन आता आपली, हिंदूंची, प्रवृत्ती बनली आहे कारण आपण हिंदूंनी ठरवून टाकलं आहे की इतिहासापासून काही शिकायचेच नाही. आज देशासमोर असलेले जिहादी आतंकवादाचे इसिससारखे संकट आणि त्यांचे पाठीराखे पहाता, पुढे निधर्मी राष्ट्र कि सनातन राष्ट्र हा प्रश्न निर्माण होणार नाही, तर सनातन राष्ट्र कि इस्लामिक स्टेट असा प्रश्न निर्माण होणार आहे. अशा वेळी निधर्मीवाद्यांना धर्म वा अधर्म यांची बाजू घ्यावीच लागेल. त्यावेळेस केवळ सनातन राष्ट्रच सर्वांचे रक्षण करू शकते. छत्रपती शिवाजी महाराजांनी ५ इस्लामी सत्तांना धूळ चारून हिंदवी स्वराज्य स्थापन केले. आपल्या देशावर धर्मप्रेमी अन् राष्ट्रप्रेमी यांचे राज्य आल्यानेच आपला देव, धर्म, संस्कृती, इतिहास, भाषा, आबालवृद्ध आणि स्त्रिया यांचे खऱ्या अर्थाने रक्षण अन् पालन होते. आपले राज्य झाले, आपल्या हाती सत्ता आली, तरच स्वधर्माचे रक्षण आणि संवर्धन करता येते, हे अनुभवसिद्ध सत्य शिवाजी महाराजांनी ओळखले होते. धर्माचरणी आणि सत्त्वगुणप्रधान लोकप्रतिनिधी अन् त्यांचे सेवक धर्माधिष्ठित म्हणजेच आदर्श, सर्व गुणांनी युक्त अशी आदर्श व्यवस्था निर्माण करू शकतात. हेच धर्माचरणी लोकप्रतिनिधींचे धर्माचरणी प्रजेचे धर्मनिष्ठ सनातन राष्ट्र असेल ! भव्य, व्यापक आणि तेजःपुंज असणाऱ्या सनातन राष्ट्रापुढे 'गझवा-ए-हिंद'चा टिकाव पण लागणार नाही.

**अयोध्येत श्रीरामाच्या मूर्तीच्या प्राणप्रतिष्ठेमुळे रामराज्याचा अर्थात भावी सनातन राष्ट्राचा प्रारंभ !**

पृथ्वीवर शांततामय जीवन जगायचे असेल, तर हिंसाचाराची नव्हे, तर सहिष्णुतेची आवश्यकता आहे. सनातन हिंदु धर्म सहिष्णुतेसारख्या उच्चतम मूल्यांची जोपासना करण्याची शिकवण देतो. त्यामुळे तो जगासाठी कल्याणकारी आहे. हिंदु धर्माधारित राज्यप्रणाली जगभरातील राष्ट्रांनी आचरणात आणल्यास हिंसाचारी प्रवृत्तीचा लोप होईल. भारताचे 'गझवा-ए-हिंद' होण्यापूर्वी हिंदूंनी सनातन राष्ट्र स्थापन करण्यासाठी कटीबद्ध व्हावे ! हिंदूंच्या मनात आणि हृदयात सनातनचा झेंडा रोवणारे सनातन संस्थेचे संस्थापक सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत बाळाजी आठवले हे समाजाला लोककल्याणकारी सनातन राष्ट्राकडे घेऊन जात आहेत. अयोध्येत प्रतिष्ठापित होऊन प्रभु श्रीरामांनी एक प्रकारे आपल्या रामराज्य म्हणजेच सनातन राष्ट्र स्थापनेच्या अभियानाला अधिष्ठानच दिले आहे. अयोध्येत श्रीरामाच्या मूर्तीच्या प्राणप्रतिष्ठेमुळे सूक्ष्मातून रामराज्याचा अर्थात भावी सनातन राष्ट्राचा प्रारंभ झाला आहे.

'गझवा-ए-हिंद'सारख्या विचारांच्या विरोधात आपल्याला धर्माभिमान, एकजूट आणि सनातन मूल्यांची मशाल हाती घ्यावी लागेल. 'गझवा-ए-हिंद'सारख्या विघातक प्रवृत्तींना संपवायचे असेल, तर समाजहित, न्याय आणि धर्मनिष्ठतेवर आधारलेले छत्रपती शिवरायांच्या स्वराज्यसंकल्पनेपासून प्रेरणा घेतलेले सनातन राष्ट्रच निर्माण करावे लागेल. त्यासाठी आपण एकत्र येऊन सनातन राष्ट्राचा शंखनाद करण्यासाठी कटिबद्ध होऊया !

# पहलगाम पासून काही धडा घेणार आहात कां?

काश्मिरचा आतंकवाद ही भारतासाठी नवीन गोष्ट राहिलेली नाही.आपलीच पकड काश्मिर मधील सत्तेवर राहण्यासाठी काही विशिष्ठ कुटूंबातील लोकांकडून हा दहशतवाद जाणीवपूर्वक जोपासला जात होता.यात भारतीय सैनिकांचा बळी जात होता. सैनिकांना स्थानिक लोकांकडून दगडांचा मारा सहन करावा लागत होता.तरीही ते काहीही करू शकत नव्हते.याची चीड सैनिकांमध्ये दिसून येत होती.परंतु केंद्रात सत्ता बदल होताच केंद्राने तेथील सैनिकांना आतंकवाद विरोधात धोरणं ठरवून ते अंमलात आणण्याचे स्वातंत्र्य प्रदान केले.याचा चांगला परिणाम दिसून आला.सैनिकांवरील गोटमारीच्या प्रमाणात घट दिसून आली.काश्मिर मधील लाल चौकात झेंडा वंदन करणे कठीण काम झाले होते.सन २०११ मध्ये

भारतीय राष्ट्रीय काँग्रेस व नॅशनल कॉन्फरन्स यांनी येथे झेंडा वंदन करण्यास परवानगी नाकारली होती. एवढी आतंकवाद्यांची दहशत येथे पसरलेली होती.याचे कारण राज्यावरील

राज्यकर्त्यांची सत्तेवरील पकड कमी झाली होती.दहशतवादाने चरणसिमा गाठली होती.केंद्र सरकार हतबल ठरले होते.पाकिस्तानी सत्ताधाऱ्यांना काश्मिर वर नियंत्रण ठेवणे शक्य झाले होते.केंद्र सरकारच्या चुकीच्या धोरणांमुळे आपल्या सैनिकांना प्राणांस मुकावे लागत होते.भारतीय नागरिकांसाठी काश्मिरचे रस्ते बंद झाले होते.याचा परिणाम काश्मिरच्या पर्यटन व्यवस्थेवर झाला होता.काश्मिरातील सिनेमाचे चित्रीकरण बंद झाले होते.काश्मिरातील पंडीतांना घरदार सोडून इतर ठिकाणी आसरा घ्यावा लागला.आजही यात फरक पडलेला नाही.त्यांना मुळ ठिकाणी आश्रय मिळालेला नाही.संपत्ती मिळणे तर दुरच राहिले.

कलम ३७० अ हटविण्यावरून देशात दोन गट पडले होते.काँग्रेस, नॅशनल कॉन्फरन्स व इतर फुटीरतावादी शक्तींचा याला विरोध झाला.तरीही संख्या बळाच्या आधारावर व कुट नियतीचा वापर करून केंद्र सरकारने नियोजनबद्ध पद्धतीने यावर मात करत ३७० अ हे कलम हटविण्यात आले. आजही यावरून सत्ताधारी आणि विरोधक यांच्यात तानातानी होतांना आढळून येते आहे.यामुळे आपल्या एकजुटीला तडा जातो आहे.भारतीय हे विखुरलेले आहेत असा संदेश सर्वदूर पसरतो आहे.याचाच गैरफायदा फुटिरवादी शक्ती घेतांना आढळून येत आहेत.हा हल्ला त्याचाच परिपाक आहे. हे विसरून कसे चालेल ? काश्मिरच्या परिस्थितीत सुधारणा झाल्याने,भितीचे व दहशतीचे वातावरण कमी झाल्याने नुकताच पर्यटकांनी उश्वास टाकला होता.नव्याने पर्यटनाला चालना मिळाली होती.काश्मिर पर्यटकांनी बहरले होते.तेथील स्थानिकांना रोजगार प्राप्त झाला होता.अशी वातावरण निर्मिती झाली असतांना काश्मिर मधील काही समाजघटकांना आणि आतंकवाद्यांना हे पचनी पडले नसावे.याच कारणाने पध्दतशीरपणे मोठा प्लॅन करून तो आतंकवाद्यांनी अंमलात आणला आहे. याची साधी कुणकुण केंद्र व राज्य सरकार मधील गुप्तहेर खात्याला लागू नये याचे नवल वाटते आहे.राज्य सरकारची पोलिस यंत्रणा गाफील राहिल्याने आणि केंद्राने राज्य सरकारवर पुर्ण विश्वास ठेवल्याने याचाच फायदा आतंकवादी संघटनांनी उचललेला आहे.याची जवाबदारी केंद्र व राज्य सरकारने स्विकारली पाहिजे.जम्मू काश्मिर मधील ओमर अब्दुल्ला सरकार पहलगाम मधील आतंकवादी घटनांवर साधे भाष्य करतांना दिसून येत नाही आहे.घटनेचा जाहिर निषेध करणे तर दुरच राहिले.हे कशाचे लक्षणं आहे ? एखादी पत्रकार परिषद घेऊन पहलगाम घटनेचा जाहीर निषेध करणे जम्मू काश्मिर मधील सत्ताधाऱ्यांकडून जनतेला अपेक्षित होते.परंतु असे घडून आलेले नाही.असे दिसून येते आहे.

जम्मू काश्मीर मधून कलम ३७० अ हटवून तिथे शांतता प्रस्थापित करणे हे केंद्र सरकार पुढे कठीण आवाहन होते.जम्मू काश्मिर मध्ये शांततामय वातावरणाची निर्मिती करून केंद्र सरकारने निवडणुका घेऊन दाखविल्या.तिथे ओमर अब्दुल्ला यांचे नवीन सरकार अस्तित्वात आले.हे पाकिस्तानच्या सत्ताधाऱ्यांच्या व तेथील आतंकवाद्यांच्या पचनी पडलेले नाही. याचीच परिणीती ही पहलगामच्या दहशतवादी हल्यात झालेली दिसून येते आहे.या हल्यात २८ हिंदू, २ मुस्लिम व २ परदेशी पर्यटकांचे जीव गेलेले आहेत. याचा आक्रोश देशभरात पहायला मिळतो आहे.आता केंद्र सरकार ॲक्शन मुडवर आलेले आहे.भारताने याबाबत पाच मोठे कठोर निर्णय घेतलेले आहेत.पाकिस्तानी नागरिकांना व्हिसा मिळणार नाही.सिंधू पाणी कराराला स्थगिती. ४८ तासांमध्ये पाकिस्तानी नागरिकांना भारत सोडण्याचे आदेश. अटारी बॉर्डर बंद करण्यात आली. पाकिस्तानच्या हायकमिशनच्या पाच अधिका-यांना हटवण्यात आले आहे. यानंतर सर्वपक्षीय बैठकीचे आयोजन करून पुढील निर्णय घेण्यात येणार आहेत.

आतंकवादी हल्ला ही भारतीयांसाठी नवीन बाब राहिलेली नाही.यात कुठे थोडासा खंड पडलेला होता.तर परत आतंकवादी गतीविधीने डोके वर काढले आहे.याचा बंदोबस्त करणे गरजेचे आहे.कारण यात भारतीय जवान व खास करून हिंदू नागरिकांचे जीव जात आहेत.ही भारतीयांसाठी अपमानास्पद बाब ठरते आहे.याचा कायमचा बंदोबस्त करण्यासाठी केंद्रातील सत्ताधारी पक्ष, विरोधीपक्ष, जम्मू काश्मीर मधील सत्ताधारी व विरोधी पक्ष व तिनही दलाचे प्रमुख यामध्ये समन्वय व एकवाक्यता होने गरजेचे आहे.आपले राजकीय हेवेदावे बाजूला सारून देशाची अखंडता सुनिश्चित करणे गरजेचे झाले आहे. यावर केंद्र सरकार काय कठोर निर्णय घेते याकडे देशातील नागरिकांचे लक्ष लागले आहे. कारणं विनाकारण जनतेचा व सुरक्षा जवानांचा बळी जाऊन देशाच्या प्रगतीसाठी बाधक ठरेल अश्या कृत्यांना पायबंद घालणे हे केंद्र सरकारचे काम आहे.या हल्ल्याचा मास्टर माईंड कोण आहे हे शोधून काढून त्याला पकडणे कठीण हे जिकिरीचे काम आहे.तसेच आपल्यातील गद्दारांना पणं शोधून काढले पाहिजे.जनता याबाबत आग्रही आहे.पाहू या पुढे काय होते ते.

मिलिंद गड्डमवार,
राजुरा
मो.क्र.९५११२१५२००

# सार्वभौमत्वावर हल्ला!


काश्मीरला विशेष दर्जा देणारे ३७० वे कलम हटवून केंद्र सरकारने काश्मीरचे त्रिभाजन केले. या घटनेला या ऑगस्ट मध्ये सहा वर्ष पूर्ण होतील. ३७० वे कलम हटवल्यानंतर काश्मीरमध्ये अनुचित प्रकार घडू नये यासाठी काश्मीरमध्ये कडेकोट सुरक्षा व्यवस्था ठेवण्यात आली होती. कडेकोट सुरक्षा व्यवस्था असल्याने काश्मीरमध्ये बराच काळ शांतता होती त्यामुळे पर्यटनालाही चालना मिळाली होती. त्यामुळे नंदनवनात पुन्हा शांतता प्रस्थापित झाली असा समज निर्माण झाला होता मात्र या समजाला छेद देणारी घटना काश्मिरात घडली आहे. जम्मू काश्मीरमधील अनंतनाग जिल्ह्यातील पहलगाम येथे पाक पुरस्कृत दहशतवाद्यांनी पर्यटकांवर केलेल्या भ्याड हल्ल्यात २८ पर्यटक ठार झाले. या हल्ल्यात अनेक पर्यटक जखमी झाले. ठार झालेल्या पर्यटकात महाराष्ट्रातील सहा पर्यटकांचा समावेश आहे. या हल्ल्याने देशभर संतापाची लाट उसळली आहे . पहलगाम येथे झालेला हा हल्ला भारताच्या सार्वभौमत्वावर झालेला हल्ला आहे. या हल्ल्याने काश्मीरमध्ये दहशतवाद्यांनी पुन्हा डोके वर काढले असून काश्मीरमध्ये पुन्हा घातपाती कारवाया सुरू झाल्याचे स्पष्ट झाले आहे. या हल्ल्याने सहा वर्षापूर्वी काश्मीरमधीलच पुलवामा येथे झालेल्या हल्ल्याची आठवण झाली. सहा वर्षापूर्वी पाकिस्तानच्या जैश ए मोहंमद या दहशतवादी संघटनेने भारतीय जवानांवर केलेल्या हल्ल्यात ४० हून अधिक जवान शहीद झाले होते. पहलगाम येथे झालेल्या हल्ल्यात दहशतवाद्यांनी पर्यटकांना त्यांचा धर्म विचारुन ठार केले. दहशतवाद्यांनी हिंदू पर्यटकांना जाणीवपूर्वक टार्गेट करून ठार केले. याचाच अर्थ हा टार्गेट कीलींगचा प्रकार आहे. काश्मीरमध्ये टार्गेट किलिंगचा हा पहिलाच प्रकार आहे असे नाही. मागील वर्षी जम्मू काश्मीरच्या दिवसी जिल्ह्यातील कंदा परिसरात वैष्णवदेवीच्या दर्शनासाठी जात असलेल्या भाविकांच्या बसवर दहशतवाद्यांनी भ्याड हल्ला केला होता त्यात १० भाविक मरण पावले तर ३३ हून अधिक भाविक जखमी झाले होते. पहलगाम येथे झालेला हल्ल्याला गेल्या काही दिवसात काश्मीरमध्ये झालेला सर्वात मोठा भीषण हल्ला म्हणता येईल अर्थात काश्मीर खोऱ्यात कडेकोट बंदोबस्त असूनही लहान मोठे हल्ले चालूच होते मात्र या हल्ल्याने काश्मीरमध्ये पुन्हा दहशतवादी मोठ्या प्रमाणात सक्रिय झाल्याचे स्पष्ट झाले आहे. या हल्ल्याने दहशतवाद्यांनी केंद्र सरकारला दाखवून दिले आहे की काश्मीरमध्ये दहशतवाद अजूनही कायम आहे. केंद्र सरकारने हा हल्ला गांभीर्याने घेतला असून या हल्ल्याची चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत. भारताचे पंतप्रधान, गृहमंत्री, संरक्षणमंत्र्यांनी हा हल्ला पाकिस्तान पुरस्कृतच असून या हल्ल्याला जशास तसे उत्तर दिले जाईल असा इशारा दिला आहे. पाकिस्तानने मात्र हे पाप आमचे नाही असे म्हटले आहे. पाकिस्तान काहीही म्हणो मात्र हा हल्ला पाकिस्तान पुरस्कृतच होता हे शाळकरी मुलेही सांगतील. सुंब जळाला तरी पिळ जात नाही ही म्हण पाकिस्तानसाठी तंतोतंत लागू पडते. पाकिस्तान आज अक्षरशः भिके कंगाल झाला आहे. पाकिस्तानी सरकार कटोरा घेऊन जगभर फिरत आहे मात्र त्यांना कोणीही भिक द्यायला तयार नाही . पाकिस्तानमधील जनता अक्षरशः देशोधडीला लागली आहे. एकवेळचे पोटभर अन्न मिळाले तरी पुरेसे अशी त्यांची अवस्था आहे. आपल्या देशातील नागरिकांना खायला मिळत नसताना तेथील सरकार मात्र दहशतवाद्यांना पोसत आहे. पाकिस्तान सरकार आजही दहशतवाद्यांना आर्थिक आणि लष्करी मदत करत आहे. पाकिस्तानच्या सीमावर्ती भागात आजही दहशतवाद्यांचे अड्डे सुरू आहेत. तिथे पाकिस्तानी लष्कर दहशतवादी संघटनांना प्रशिक्षण देत आहे. अनेक दहशतवादी संघटनांची कार्यालये पाकिस्तानात आहेत अशाच एका दहशतवादी संघटनेने हा भ्याड हल्ला केला असण्याची शक्यता आहे. केंद्र सरकारने या भ्याड हल्ल्याची गांभीर्याने दखल घेऊन पाकिस्तानला जशास तसे उत्तर द्यावे. जर भारताने या दहशतवादी हल्ल्याला प्रतिउत्तर दिले नाही तर दहशतवाद्यांची मुजोरी आणखी वाढेल आणि काश्मीरमध्ये पुन्हा दहशतवाद पसरेल. ते होऊ द्यायचे नसेल तर भारतानेही आक्रमक व्हायला हवे. प्रसंगी सर्जिकल स्ट्राईक सारखा पर्याय वापरायलाही हरकत नाही. भारताने पाकिस्तानला जशास तसे उत्तर देतानाच या दहशतवाद्यांना साथ देणाऱ्या फुटिरतावाद्यांचा देखील बंदोबस्त करावा. काश्मीरमधील अनेक फुटीरतावादी नेते दहशतवाद्यांना साथ देतात. स्थानिक फुटीरतावादी लोकांची साथ असल्याशिवाय इतका मोठा हल्ला करणे दहशतवाद्यांना शक्य नाही त्यामुळे दहशतवाद्यांशी दोन हात करताना आणि पाकिस्तानला जशास तसे उत्तर देतानाच केंद्र सरकारने ही फुटिरतावादी कीड देखील मुळापासून उखडून टाकायला हवी. आज जरी हा दहशतवादी हल्ला भारतात झाला असला तरी दहशतवाद ही केवळ भारताचीच समस्या नाही तर ती वैश्विक समस्या आहे. दहशतवाद आज जगातील प्रत्येक देशाचे दार ठोठावत आहे. अमेरिका, इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी जपान, रशिया, ऑस्ट्रेलिया या प्रगत देशांनाही दहशतवादाची झळ बसली आहे म्हणूनच दहशतवादाचा मुकाबला करायचा असेल तर जगातील सर्व देशांना एकत्र यावेच लागेल. पाकिस्तान सारखा देश जो सातत्याने दहशतवादाला प्रोत्साहन देतो, दहशतवाद्यांना मदत करतो अशा देशांवर आंतरराष्ट्रीय समूहाने कारवाई करावी. पाकिस्तान सारख्या दहशतवाद्यांना मदत करणाऱ्या देशांवर आंतरराष्ट्रीय समूहाने आर्थिक निर्बंध आणावेत. प्रसंगी त्या देशांवर बहिष्कार टाकून त्यांची कोंडी करावी. दहशतवाद्यांना मदत करणाऱ्या देशांची कोंडी केल्याशिवाय दहशतवाद संपणार नाही. अमेरिकेसारख्या सुपर पॉवर देशांनी त्यासाठी पुढाकार घ्यायला हवा.



श्याम बसप्पा ठाणेदार
दौंड, जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

# पहलगाममधील दहशतवादी हल्ला अत्यंत दुःखद व धक्कादायक

भारत विकासाचे शिखर गाठत असतांना पाकिस्तान कडुन वारंवार आतंकवादी हल्ले होत असतात.यावर भारतीय सेनेने आपली पकड मजबूत करून शेकडो आतंकवाद्यांचा सफाया केला.ह्या संपूर्ण बाबी पाकिस्तानला रूतायला लागल्या आणि दहशतवाद्यांच्या मार्फत पाकिस्तानने पहलगाममधे हल्ला करून निरपराध २८ लोकांचा बळी घेतला व अनेकांना गंभीरपणे जखमी केले ही बाब भारत कधीच सहन करणार नाही आणि या घटनेचे संपूर्ण जगाने निंदा सुध्दा केली आहे. पहलगामसह जम्मू काश्मीरमध्ये पर्यटकांचा वाढता ओघ पहाता पाकिस्तान आगबबुला झाला आहे.कारण २०२४ मध्ये २ करोड पर्यटकांनी पहलगामसह जम्मू काश्मीरमध्ये आपली हजेरी लावली हे खेळीमेळीचे वातावरण पाकिस्तानला नेहमीच रूतत असते आणि यावर अंकुश लावण्यासाठी पाकिस्तान दहशतवाद्यां मार्फत भ्याड हल्ले करीत असतो.भारत सरकारने आतंकवाद्यांवर आपली पकड मजबूत केल्यानंतर अचानक पहलगाममधे दहशतवादी हल्ला होतो ही अत्यंत दुःखद व गंभीर बाब आहे.यावरून स्पष्ट होते की पहलगामधील दहशतवादी हल्ला हा सुनीयोजित असावा तेव्हाच त्यांनी सुरक्षा घेरा तोडुन २८ निरअपराधांचा बळी घेतला व अनेकांना गंभीररीत्या जखमी केलेत या घटनेला कोणीच माफ करणार नाही.आज भारत आणि पाकिस्तान यांना स्वतंत्र होवून ७८ वर्षे झालीत या ७८ वर्षांत भारत एक पाऊल पुढे जात आहे आणि पाकिस्तान आतंकवादी कारवायांमध्ये जखडून रक्ताच्या लाथोळ्यात गुरफटला असुन हजारो पाऊल मागे येत आहे व त्याचेच प्रायश्चित्त म्हणून आज पाकिस्तान भिकेला लागला असून आतंकवाद्यांचे माहेरघर बनला आहे.त्यामुळे पहलगामधील पर्यटकांवर दहशतवाद्यांनी केलेल्या हल्याचे प्रायश्चित्त पाकिस्तानला अवश्य भोगावे लागेल. कारण पुलवामा हल्ल्यानंतरचा हा सर्वात मोठा आतंकवादी हल्ला आहे आणि याची किंमत पाकिस्तानला मोजावी लागेल हेही तितकेच सत्य आहे.पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याची जबाबदारी लष्करे तय्यबाची उपसंघटना द रेझिस्टन्स फ्रंटने स्वीकारली आहे त्यामुळे आता सिद्ध झाले की पाकिस्तानची भाड्याच्या संघटनेने हे घृणास्पद कृत्य केले आहे त्यामुळे आतंकवाद्यांचा सफाया तर होईलच सोबतच याचा खामियाजा पाकिस्तानला चांगलाच भोगावा लागेल. काही दिवसांपूर्वी पाकिस्तानचे लष्करप्रमुख जनरल असीम मुनीर यांनी पुन्हा काश्मीरचा मुद्दा उपस्थित केला होता.काश्मिर हा पाकिस्तानचा अभिमान असून ते आम्ही कधीच विसरणार नाही,अशी गरळही त्यांनी ओकली होती. त्यामुळे पहलगामधील हल्ला पाकिस्तानी आतंकवाद्यांनी सुनियोजित पद्धतीने केल्याचे स्पष्ट दिसून येते.त्यामुळे आता पाकिस्तानला जशास तसे उत्तर देण्याची गरज आहे.जय हिंद!




लेखक
रमेश कृष्णराव लांजेवार
(स्वतंत्र पत्रकार)
मो.नं.९९२१६९०७७९,
नागपूर.

# भ्रष्टाचाराची कीड

भ्रष्टाचार ही देशाला लागलेली एक महाभयंकर कीड आहे याबाबत कुणाचेही दुमत असू नये. सरकारी कार्यालयांत तो विशेष करून दिसून येतो. आजतागायत अनेक सरकारे आली आणि गेली; मात्र भ्रष्टाचाराचे उच्चाटन करण्यासाठी कोणीही विशेष प्रयत्न केलेले नाहीत. शिपायापासून बड्या अधिकाऱ्यांपर्यंत भ्रष्टाचाराची पाळेमुळे पसरलेली असतात त्यामुळे कारवाई तरी कोणावर करायची हा प्रश्नच असतो. भ्रष्टाचारावर अंकुश ठेवण्यासाठी सरकारचा स्वतंत्र लाचलुचपत प्रतिबंधक विभाग आहे. या विभागाकडून प्रतिवर्षी भ्रष्टचाराची शेकडो प्रकरणे उघडकीस आणली जातात; मात्र त्यांपैकी किती प्रकरणात कारवाई होते ? महाराष्ट्र लाचलुचपत प्रतिबंधक खात्याने ज्या अधिकाऱ्यांना लाच घेताना पुराव्यानिशी पकडले आहे अशा १७३ अधिकाऱ्यांवर प्रशासनाने साधी निलंबनाची कारवाईही केलेली नाही. शासनाच्या २१ विभागांमधील या १७३ अधिकाऱ्यांमध्ये ३० प्रथम श्रेणीचे तर २८ द्वितीय श्रेणीचे आणि अन्य तृतीय श्रेणीचे अधिकारी आहेत. भ्रष्टाचाराच्या प्रकरणात पुराव्यानिशी पकडल्यास आरोपी अधिकाऱ्यांना त्वरित बडतर्फ करणे अपेक्षित असते. उच्च न्यायालय जोपर्यंत निर्णय रद्द करत नाही तोपर्यंत संबंधित अधिकाऱ्याला सेवेत राहता येत नाही; मात्र सद्यस्थिती पाहता एव्हढ्या मोठ्या प्रमाणात अधिकाऱ्यांचे निलंबनच झाले नाही याचा अर्थ या भ्रष्ट अधिकाऱ्यांचे लागेबांधे वरिष्ठ अधिकारी आणि सरकारपर्यंत आहेत हे निश्चित आहे. सरकार आणि वरिष्ठ अधिकारी या भ्रष्ट अधिकाऱ्यांना संरक्षण का पुरवत आहे हे शोधून काढणेही महत्वाचे आहे. जागरूक नागरिक आणि लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे अधिकारी मोठ्या परिश्रमाने जीवावर खेळून या भ्रष्ट अधिकाऱ्यांना पकडतात, त्यांच्याविरोधात पुरावे गोळा करतात आणि वरिष्ठ पातळीवर या अधिकाऱ्यांना अभय दिले जात असेल, तर त्या कारवाईला तरी काय अर्थ आहे ? अशाने भ्रष्टाचाराचे कधीतरी निर्मूलन होईल का ?

आजमितीला भ्रष्टाचार ही एक फार मोठी समस्या बनली आहे. दिल्लीपासून गल्लीपर्यंत सर्वच ठिकाणी भ्रष्टाचाराशिवाय पान हलत नाही. आज सर्वच क्षेत्रात भ्रष्टाचार एव्हढा मुरला आहे कि त्याचे निर्मूलन करणे सरकारपुढील मोठे आव्हान असणार आहे. विकासासाठी आणि जनतेच्या सोयीसुविधांसाठी शासनाकडून विविध योजना आखल्या जातात. त्यासाठी कोट्यवधी रुपयांचा निधी मंजूर केला जातो; मात्र राजकीय क्षेत्रातील भ्रष्टाचारामुळे या शासकीय योजना आणि निधी तळागाळापर्यंत येईपर्यंत त्यातील बराचसा मलिदा राजकीय मंडळींकडून लाटला जातो. माजी पंतप्रधान स्व. राजीव गांधी यांनी देशातील भ्रष्टाचारावर भाष्य करताना म्हटले होते 'सामान्य लोकांच्या योजनांसाठी दिल्लीतून निघालेल्या १०० रुपयांपैकी सामान्य लोकांपर्यंत केवळ १० रुपयेच पोहोचतात.' शासकीय कार्यालये भ्रष्टाचाराची कुरणे आहेत, असे म्हटल्यास अतिशयोक्ती ठरणार नाही. शहरांसारख्या प्रगतशील भागांत शासकीय अखत्यारीतील काही क्षेत्रांत ऑनलाईन अर्ज प्रक्रिया आणि डिजिटलायझेशन यांमुळे सामान्य जनतेचा सरकारी अधिकाऱ्यांशी थेट संपर्क येत नसल्यामुळे भ्रष्टाचारावर काही अंशी अंकुश आला असला, तरी ग्रामीण भागातील अशिक्षित जनतेची भ्रष्ट अधिकाऱ्यांकडून लहान सहान कामांत सर्रासपणे लुबाडणूक सुरु आहे. कर्तव्यभावनेला तिलांजली देऊन जडलेल्या भ्रष्टाचाराच्या सवयीमुळे सरकारी कर्मचारी आणि अधिकारी यांमध्ये काम टाळण्याची वृत्ती निर्माण होत आहे. सामान्य नागरिकांच्या मासिक वेतनातून कररूपाने सरकार दरबारी जाणाऱ्या पैशातून ही सरकारी मंडळी गलेलठ्ठ वेतन घेत असतात. तरीही यांची भूक भागत नाही म्हणून त्याच अन्नदात्याच्या असहायतेचा गैरफायदा घेऊन त्याला लुबाडतात. शिपायापासून वरिष्ठ अधिकाऱ्यांपर्यंत भ्रष्टाचाराची एकसंध साखळी असल्याने खालचा अधिकारी कामाचे पैसे मागतो म्हणून वरच्या अधिकाऱ्याकडे तक्रारही करता येत नाही. सरळमार्गाने काम करून घ्यायचे असेल, तर त्यासाठी सरकार दरबारी अनेकदा चकरा माराव्या लागतात. पुन्हा पुन्हा कामाचे खाडे नकोत म्हणून सामान्य नागरिक अधिकाऱ्याच्या मागणीप्रमाणे पैसे देतो आणि आपला वेळ वाचवतो, अशा प्रकारची ही प्रक्रिया सरकारी कार्यालयांत अविरतपणे सुरु असते. सामान्य नागरिक वेळ आणि कार्यालयाच्या सुट्या वाचवण्यासाठी भ्रष्टाचाराला खतपाणी घालत असतो. अर्थात या भ्रष्ट क्षेत्रामध्येही काही कर्तव्यनिष्ठ आणि कार्यतत्पर अधिकारी असतात; मात्र यांची संख्या तुलनेने कमी असल्याने सरकारी कार्यालयांत भ्रष्टाचार हाच शिष्टाचार बनला आहे. मासिक वेतनाव्यतिरिक्त अधिक पैसे मिळावेत, कमी मालाच्या मोबदल्यात जास्त नफा मिळावा यासाठी सामान्य व्यक्तीला लुबाडणे, त्याची फसवणूक करणे, त्याच्यावर दबाव आणणे, त्याला परावृत्त करणे यांसारखे सर्व प्रकार भ्रष्टाचारामुळे घडतात आणि यामागे दडलेला असतो तो कमालीचा स्वार्थ तो साधण्यासाठी इतरांचे कितीही नुकसान झाले तरी चालेल पण माझा स्वार्थ साधला जायला हवा ही असुरी वृत्ती, झटपट श्रीमंत होण्याची असूया आणि माझे कोणी वाकडे करू शकणार नाही ही मुजोरी. भ्रष्टाचारासाठी दिलेला पैसा हा सामान्य माणसाच्या मेहनतीचा आणि प्रामाणिकपणे काम केल्याचा मोबदला असतो. इच्छा नसतानाही तो इतरांना बहाल करताना त्यामागे त्याचा तळतळाटसुद्धा असतो त्यामुळे भ्रष्टाचाऱ्याच्या तो कितपत पचनी पडणार ? अध्यात्मशास्त्रानुसार वैयक्तिक स्वार्थासाठी गैरमार्गाने इतरांकडून धन लुबाडणे हे फार मोठे पाप असून त्याच्या फळस्वरूपात लुबाडणाऱ्याची या नाहीतर पुढील जन्मात निश्चितपणे कित्येक पटीने हानी होते.



जगन घाणेकर
घाटकोपर, मुंबई
मो.क्र. ९६६४५५९७८०

# भागवत सप्ताह निमित्त अमानी येथे तीन ठिकाणी फराळ वाटप

▸ महासागर प्रतिनिधी ▸

**मालेगांव** - तालुक्यातील अमानी येथील संत मुंगसाजी महाराज संस्थान जवळ चालू असलेल्या भागवत सप्ताह निमित्त दैनंदिन कार्यक्रमात अंतर्गत आज दिनांक २४ एप्रिलला भागवत सप्ताह मधील भजनी मंडळी सह भाविकांना अमानी येथील गजानन गंगाराम गवळी यांच्या वतीने सकाळी एकादशी निमित्त उसळ साबुदाणा वाटप करण्यात आले सप्ताह मध्ये दैनंदिन कार्यक्रमात रोज सकाळी व संध्याकाळी गावातील वेगळे वेगळे अन्नदातेच्यावतीने जेवणाचा कार्यक्रम ठेवण्यात येत असते आज सकाळी



गजानन गवळी यांच्या वतीने तर सायंकाळी पांडुरंग क्षीरसागर यांच्या वतीने उसळ वाटप करण्यात आले असून तसेच अमानी येथील गजानन महाराज संस्थान जवळ दर गुरुवारी आज सायंकाळी दिनकरराव पंडितराव तायडे यांच्या वतीने देखील गावातील भाविकांना उसळ वाटप करण्यात आले आहे अमानी ला भागवत सप्ताह २० ला प्रारंभ झाला असून येणाऱ्या २७ एप्रिल ला सांगता होणार असून महाप्रसादाची वाटप करण्यात येणार आहे आज उसळ ाटप करताना ह.भ.प. ज्ञानोबा महाराज देशमुख यांच्या उपस्थितीत भजनी मंडळी सह गावातील भाविकांनी महिलावर्गांनी फराळाचा लाभ मोठ्या संख्येने घेतला.

# चिमण्यांचेही 'स्वप्नातील घरकुल' साकारतेय; रिसोड तालुक्यात पर्यावरण पूरक उपक्रम

▸ प्रदीप देशमुख ▸

**रिसोड** - जसे माणसांना घरकुलाचे स्वप्न असते, तसेच स्वप्न छोटेसे का होईना, चिमण्यांनाही असते. आणि आज त्या चिमण्यांचे स्वप्न वास्तवात साकारत आहे - कारण रिसोड तालुक्यात विविध सामाजिक संघटना, पोलीस स्टेशन, नगरपालिका व ग्रामपंचायती यांच्या पुढाकाराने पक्ष्यांसाठी घरटी उभारण्याचे स्तुत्य कार्य सुरू झाले आहे.





उन्हाळ्याच्या कडक तडाख्यात अनेक पक्षी तहानलेले राहतात, त्यांना पाणी आणि निवाऱ्याची सोय मिळणे कठीण होते. अशा परिस्थितीत, लोकसहभागातून घरटी उभारून आणि पाण्याची व्यवस्था करून पक्ष्यांच्या संरक्षणासाठी एक आदर्श निर्माण केला जात आहे. ही कल्पना केवळ पर्यावरण संरक्षणापुरती मर्यादित नाही, तर ती मानवी संवेदनशीलतेचा एक उत्कृष्ट नमुना आहे. रिसोड तालुक्यातील अनेक शासकीय कार्यालयांमध्ये - जसे की पोलीस ठाणे, नगरपालिका, ग्रामपंचायती - चिमण्यांसाठी खास घरटी लावण्यात येत आहेत. या घरट्यांमुळे चिमण्यांना अन्न, पाणी आणि सुरक्षित निवारा मिळतोय. ग्रामीण भागात सुद्धा स्थानिक नागरिकांनी आपल्या अंगणात, घराच्या गच्चीवर, झाडांवर अशी घरटी टांगून पक्ष्यांना आश्रय दिला आहे. या उपक्रमात प्रदीप देशमुख, विनोद भाऊ बांगर, बाळू ठाकूर, किसन काळे, योगिता भस्मे (निर्भया पथक) यांनी विशेष पुढाकार घेतला असून, त्यांनी स्वतःहून घरटी वाटून पक्षांना सुरक्षित निवारा उपलब्ध करून दिला आहे. हे फक्त चिमण्यांचे घर नव्हे, तर त्यांच्या भविष्यासाठी सुरक्षित आश्रयस्थान आहे. तसेच, या उपक्रमामुळे एक सामाजिक संदेशही दिला जातोय - जसे शासन माणसांना घरकुल पुरवते, तसेच निसर्गात राहणाऱ्या जीवांनाही निवाऱ्याची गरज आहे. पक्षी, प्राणी हे बोलू शकत नाहीत, त्यांच्या वेदना व्यक्त करू शकत नाहीत, म्हणून आपणच त्यांच्यासाठी पुढाकार घेणे गरजेचे आहे. शासनाने अशा पर्यावरणपूरक योजनांवर अधिक लक्ष देऊन, पाण्याच्या टाक्या, जनावरांसाठी छावण्या आणि पक्ष्यांसाठी अन्न-पाण्याची केंद्रे उभारावीत, असा जनतेचा आवाज आहे. तसेच शासकीय अन्नधान्य योजनां मधूनही पक्ष्यांसाठी थोडं राशन उपलब्ध करून देण्याचा प्रस्ताव देखील सामाजिक कार्यकर्त्यांकडून पुढे आला आहे. आज ही छोटीशी सुरुवात भविष्यात एक मोठा आंदोलनात्मक आणि प्रेरणादायी उपक्रम बनू शकेल, ज्यातून निसर्गाचं संवर्धन, पक्ष्यांचं रक्षण आणि मानवी संवेदनेचा उत्कट अभिव्यक्ती होईल.

# कर्मचाऱ्यांना कुटुंब समजणारे नेतृत्वशील अधिकारी डॉ.पी.एस. ठोंबरे

▸ महासागर प्रतिनिधी ▸

**वाशिम**- जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. पी. एस. ठोंबरे यांनी अल्पावधीतच त्यांच्या कार्यशैलीने सर्वसामान्य कर्मचाऱ्यांपासून वरिष्ठ अधिकाऱ्यांपर्यंत साऱ्यांच्या मनात एक खास स्थान निर्माण केलं आहे. अनेक अधिकारी काम करतात, आदेश देतात, पण डॉ. ठोंबरे यांच्या कार्यपद्धतीत एक वेगळे पण आहे–ते केवळ काम करून घेत नाहीत, तर कर्मचाऱ्यांमध्ये काम करण्याची उमेद आणि आत्मविश्वास निर्माण करतात.



डॉ. ठोंबरे हे केवळ एक प्रशासकीय अधिकारी नाहीत, तर एक संवेदनशील माणूसही आहेत. आपल्या प्रत्येक कर्मचाऱ्याचे दुःख हे आपले वैयक्तिक दुःख समजून ते मदतीसाठी तत्पर असतात. कोणत्याही कर्मचाऱ्याच्या अडचणीत ते स्वतःहून धावून जातात. त्यांनी अनेक वेळा वैयक्तिक उपस्थितीतून किंवा तत्काळ उपाय योजना करून कर्मचारी आणि त्यांच्या कुटुंबियांच्या समस्या सोडवल्या आहेत. त्यांच्या नेतृत्वाखाली आरोग्य विभागात एक सकारात्मक वातावरण तयार झालं आहे. कर्मचारी आता दबावाखाली नाही, तर आत्मियतेने आणि प्रेरणादायी वातावरणात काम करत आहेत. अनेकांनी असे सांगितले आहे की, 'डॉ. ठोंबरे यांच्यासारखा अधिकारी आमच्या आयुष्यात प्रथमच भेटला आहे.'डॉ. ठोंबरे यांचं प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे, ते फक्त कामावर भर देत नाहीत, तर माणसांना जोडतात. त्यांच्या नेतृत्वात कार्यरत आरोग्य केंद्रे, उपकेंद्रे आणि जिल्हा रुग्णालय यामध्ये कार्यक्षमता वाढली असून सेवा देण्याची गुणवत्ता लक्षणीयरीत्या सुधारली आहे. आरोग्य विभागासारख्या तणावपूर्ण व्यवस्थेमध्ये, कर्मचाऱ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण करून, एक संघभावना आणि कुटुंबवत सुसंवाद राखणं ही डॉ. ठोंबरे यांची खरी कौशल्यगुण आहे. 'नेतृत्व म्हणजे फक्त आदेश देणे नाही, तर समोरच्याच्या सुखदुःखात सहभागी होणे'–डॉ. पी. एस. ठोंबरे हे त्याचं सजीव उदाहरण आहेत

# ना. ना. मुंदडा विद्यालयात ड्रोन मेकिंग शिबिराचे आयोजन



▸ महासागर प्रतिनिधी ▸

**मालेगाव** - जग दिवसेंदिवस एकेक शिखरे पार करत आधुनिक युगात पुढे जात आहे तोच आदर्श ठेवून मालेगाव येथील ग्रामीण भागातील मुलांना रोबोट आणि ड्रोन संदर्भात माहिती व्हावी याकरता ना ना मुंदडा विद्यालयात पाच दिवसीय शिबिराचे आयोजन केले आहे.

आधुनिक युगातील मुले मुली नवनवीन गोष्टी शिकत आहेत त्याचबरोबर ते विद्यार्थी स्वतः त्या नवनवीन गोष्टी आत्मसात करीत आहेत ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना याचा लाभ सहसा मिळत नाही ही गरज ओळखून नाना मुंदडा विद्यालयात मागील वर्षे रोबोट बनवण्याची संदर्भात शिबिराच्या आयोजन करण्यात आले होते त्याचा लाभ अनेक मुलींनी मुलांनी घेतला यावर्षी आपल्या ग्रामीण भागातील मुलांकरता ड्रोन मेकिंग शिबिराच्या आयोजन करण्यात आले आहे आधुनिक युगात ड्रोण ला भरपूर महत्व प्राप्त झालेले आहे सैन्यामध्ये देखील करण्यासाठी ड्रोन चा उपयोग सैनिकांतर्फे केला जातो तसेच आधुनिक शेती करताना फवारणी करता सुद्धा ड्रोन चा उपयोग केला जातो त्याच बरोबर लग्न समारंभ किंवा विविध ठिकाणी शूटिंग करता ड्रोन चा उपयोग केला जातो परंतु ते कसे बनते त्याचे कार्य कसे करते याची माहिती कोणालाच नसते ही माहिती व्हावी तसेच मुलांनी स्वतः ड्रोन

बनवावे या हेतूने ना ना मुंदडा विद्यालयात या शिबिराचे आयोजन करण्यात आले आहेब हे शिबिर २७ एप्रिल ते एक मे या पाच दिवसात घेतल्या जाणार असून अकोल्यातील तज्ञ मार्गदर्शक KITS लर्निंग सेंटर चीर्ण्ढंकुमारी काजल राजवैद्य आणि इसरो नासा मधिल वैज्ञानिक तथा समन्वयक म्हणून राहिलेले विजय भट्टड व त्यांची चमू या ठिकाणी येऊन मार्गदर्शन करणार आहेत या शिबिराचा लाभ घेण्याचे आवाहन नाना मुंदडा विद्यालयाचे मुख्याध्यापक दिनेश कुमार उंटवाल यांनी प्रसिद्धी पत्रका द्वारे केले आहे.

# पाकिस्तान प्रणित भ्याड हल्ल्याच्या निषेधार्थ येथील युवकांनी व्यक्त केला संताप




▸ महासागर प्रतिनिधी ▸

**मंगरुळपीर**- पृथ्वीवरील स्वर्ग समजल्या जाणाऱ्या भारतातील काश्मीरात आतंकवाद्यांनी रक्तरंजित होळी खेळत निष्पाप नागरिकांची हत्या केली.

ही केवळ देशातील नागरिकांचीच हत्या नाही तर काश्मिराच्या विकासाच्या दृष्टीने मोठा अडथळा निर्माण झाल्याचे बोलले जात आहे.गेल्या काही वर्षाच्या वातावरणाचा अभ्यास केल्यास, काश्मीर भारताचे अभिन्न अंग असताना भारतीय नागरिकांना काश्मीरमध्ये मुक्त संचार करणे एवढे महागात पडू शकते याची कल्पना सुद्धा केल्या जाऊ शकत नाही. भारताचे प्रधानमंत्री यांनी सुद्धा यावर सडेतोड उत्तर देताना म्हटले की या घटनेचे कल्पनेपेक्षा जास्त गंभीर परिणाम होतील. अशातच देशात जागोजागी या घटनेचा निषेध होत आहे. कट्टर राष्ट्रभक्तीच्या भावनेतून या घटनेचा निषेध मंगरूळपीर शहरातील बस स्टँड परिसर ,छत्रपती शिवाजी चौक या ठिकाणी करण्यात आला.

यामध्ये विविध धर्माच्या युवकांनी मोठ्या प्रमाणात सहभाग घेऊन आपल्या सर्वांच्या मान्यतेपेक्षा देश मोठा असल्याची प्रचिती दिली. पाकिस्तान मुर्दाबाद च्या नाऱ्यासह पाकिस्तानचा ध्वज पेटवत भर चौकात काश्मीर हल्लयात मृत्युमुखी पडलेल्या निष्पाप नागरिकांना श्रद्धांजली देखील दिली.यावेळी शहरातील नागरिक सागर जउळकर, राजीक खान, गौरवकुमार इंगळे,शराकत अली, मुकेश पठाळे, राजू भडांगे,राजकुमार मनवर, बजरंग ठाकूर, निकम, प्रीतम खाडे, दिनेश इंगोले, कासम परसुवाले तसेच परिसरातील इतर नागरिक उपस्थित होते.

# पीकविम्यासाठी स्वाभिमानीचे जिल्हाधिकारी कार्यालयावर ठिय्या आंदोलन; शेतकऱ्यांची मोठी उपस्थिती

▸ महासागर प्रतिनिधी ▸

**वाशिम**- जिल्ह्यातील शेतकऱ्यांना खरीप हंगाम २०२४ चा पीकविमा व अतिवृष्टीच्या नुकसान भरपाईची रक्कम द्यावी यासाठी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे युवक प्रदेशाध्यक्ष दामुअण्णा इंगोले यांच्या नेतृत्वात जिल्ह्यातील हजारो शेतकऱ्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन केले.



यावेळी बोलताना इंगोले यांनी येणाऱ्या ५ मे पर्यंत पिकविमाचा मोबदला न दिल्यास तीव्र आंदोलन करण्यात करण्याचा इशारा दिला असून कंपनी आणि सरकारच्या विरोधात उच्च न्यायालयात याचिका दाखल करणार असल्याची माहिती दिली. दरम्यान खरीप हंगाम २०२४ मध्ये अतिवृष्टी होऊन सोयाबीन, तूर, कपाशी इत्यादी पिकांचे मोठया प्रमाणात नुकसान झाले होते. मात्र या नुकसानी पोटी पिकविमा कंपनीकडून अद्यापही जिल्ह्यातील बहुतांश शेतकऱ्यांना विम्याचा मोबदला देण्यात आला नाही. तसेच सरकारकडून जाहीर झालेली अतिवृष्टीची मदतही अद्याप देण्यात आली नाही. यासाठी वारंवार निवेदन देऊनही शेतकऱ्यांना पैसे देण्यात येत नसल्याने स्वाभिमानी शेतकरी संघटने कडून २४ एप्रिल २०२५ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर एक दिवशीय ठिय्या आंदोलन करण्यात आले. यावेळी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देऊन शेतकऱ्यांच्या मागण्या मांडण्यात आल्या त्यामध्ये वाशिम जिल्ह्यातील सर्व शेतकऱ्यांना खरीप २०२४ चा पीकविमा सरसकट तात्काळ देण्यात यावा, शासनाने जाहीर केलेली अतिवृष्टीच्या नुकसान भरपाईची मदत तात्काळ देण्यात यावी,रब्बी हंगाम २०२३ चा पीकविमा मोजक्याच शेतकऱ्यांना देण्यात आला तो सरसकट सर्व शेतकऱ्यांना देण्यात यावा.

अशी मागणी करण्यात आली. दरम्यान १ मे रोजी पालकमंत्री दत्ता भरणे जिल्ह्यात येणार असून, ४ मे रोजी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे वाशिम जिल्ह्यात आभार सभा घ ेण्यासाठी येणार आहेत. मात्र त्यांनी जिल्ह्यात येण्यापूर्वी शेतकऱ्यांच्या पिकविम्याची रक्कम द्यावी. हे पैसे दिल्यास शेतकरी त्यांचं स्वागत करतील अन्यथा जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या रोषाला दोन्हीही मंत्रांना सामोरे जावे लागेल असा इशारा दामूअण्णा इंगोले यांनी यावेळी बोलताना दिला. जिल्ह्यातील कानाकोपऱ्यातून हजारो शेतकरी या आंदोलनात सहभागी होण्यासाठी आले होते.

# पक्ष्यांसाठी झाडावर लटकवली प्रेमाची पात्रं

▸ महासागर प्रतिनिधी ▸

**कोलार** - वाढत्या उन्हामुळे पाणवठे सुकत चालले असून पक्ष्यांचे हाल सुरू आहेत. याच दरम्यान कोलार येथील काही चिमुकल्यांनी एक आगळावेगळा आणि प्रेरणादायी उपक्रम हाती घेतला आहे. खेळता खेळता त्यांनी परिसरात पडलेल्या रिकाम्या पाण्याच्या बाटल्या गोळा केल्या आणि त्या बाटल्यांचे पुन्हा उपयोग करत झाडांवर पाणी आणि धान्य ठेवण्यासाठी पात्रं तयार केली. ही कल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी वाईल्ड लाईफ कनझर्वेशन टीमचे श्रीकांत डापसे यांनी मदत केली. त्यांनी त्या बाटल्यांचे तोंड कापून पाणी आणि तांदळाने भरलेली पात्र झाडांवर लटकवली. ही पात्र झाडांवर बांधताच पक्ष्यांनी त्याकडे आकर्षित होऊन पाणी पिणे आणि धान्य खाणे सुरू केले.



हे दृश्य पाहून चिमुकल्यांचा आनंद गगनात मावेनासा झाला. पक्ष्यांना मदतीचा हात देण्याचे समाधान त्यांच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसत होते. 'निसर्ग रक्षणात लहान हातांचा मोठा वाटा!' या उपक्रमामुळे परिसरात सकारात्मकतेची लहर पसरली असून गावकरी आणि पालकांनी या चिमुकल्यांचे कौतुक केले आहे.

# अडोळी ग्रामपंचायत येथे राष्ट्रीय पंचायत राज दिन साजरा

▸ महासागर प्रतिनिधी ▸

**वाशीम**- येथून जवळच असलेल्या अडोळी येथील ग्रामपंचायत कार्यालय येथे दि.२४ एप्रिल रोजी सकाळी १०:०० वाजता राष्ट्रीय पंचायत राज दिन साजरा करण्यात आला.



यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी डॉ बाबासाहेब आंबेडकर पदवीधर संघटनेचे अध्यक्ष राजकुमार पडघान होते तर.प्रमुख उपस्थिती म्हणून खंडोबा कंट्रक्शनचे संचालक प्रमोद इढोळे, माजी सरपंच संतोष इंगळे, नारायण इढोळे व ग्रामपंचायत अधिकारी अरविंद पडघन यांची होती. सर्व प्रथम महाराष्ट्र राज्याचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या प्रतिमेला उपस्थित मान्यवरांनी पुष्पहार अर्पण केले. नंतर कार्यक्रमाचे प्रास्ताविक ग्रामपंचायत अधिकारी अरविंद पडघन करतांना सांगितले की, पंचायत राज म्हणजे त्रीस्तरीय रचना या त्रीस्तरीय रचनेद्वारे ग्रामीण भागाचा विकास केल्या जातो. तर कार्यक्रमाचे अध्यक्ष राजकुमार पडघान यांनी आपल्या भाषणात सांगितले की, पंचायत राज १९९३ मध्ये तत्कालीन प्रधानमंत्री राजीव गांधी यांनी पंचायत राज अस्तित्वात आणली तेव्हा पासुन या पंचायत राज द्वारे म्हणजे जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायत या माध्यमातून ग्रामीण भागाचा विकास केल्या जातो. यामुळे महीलांना ५० टक्के आरक्षण, ओबीसी ना २७ टक्के आरक्षण शिवाय आर्थिक विकास , सामाजिक न्याय विकास बंधनकारक आहे.

पुढे राजकुमार पडघान यांनी सांगितले की, पंचायत राज अस्तित्वात आणण्यासाठी देशातील महाराष्ट्र हे पहिले राज्य ठरले आहे.आणि यासाठी यशवंतराव चव्हाण यांनी मोलाची कामगिरी केली आहे. व विशेषतः या पंचायत राज मध्ये काम करण्याची संधी जनपथ काळातील वाशीम पंचायत समितीचे तत्कालीन सभापती माधवराव लोडजी इढोळे यांना देखील मिळाली आहे. नंतर देशाचे प्रधानमंत्री नरेंद्रजी मोदी यांनी ऑनलाईन केलेले भाषण उपस्थितांना ग्रामपंचायत अधिकारी अरविंद पडघन यांनी स्क्रीनवर ऐकवले. यावेळी कार्यक्रमाला गावातील महिला व पुरुष यांची बहूसंख्येने उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन सागर इढोळे यांनी केले तर आभार प्रदर्शन रवि इढोळे यांनी केले. कार्यक्रमाला ग्रामपंचायत कर्मचारी पंढरी इढोळे, दौलत पडघान, सुमेध खंडारे, संदिप इढोळे यांची उपस्थिती होती.

# बाजारासाठी ओठे बांधकाम व दुरुस्तीचे भूमिपूजन

▸ महासागर प्रतिनिधी ▸

**मालेगाव** - जन सुविधा योजने अंतर्गत किन्हीराजा ग्रामपंचायतीच्या वतीने आठवडी बाजारासाठी ओठे बांधकाम व दुरुस्तीच्या कामाचा भूमिपूजन सोहळा उत्साहात पार पडला.



जन सुविधा योजनेच्या निधीतून हे काम हाती घेण्यात आले असून, जिल्हा परिषद अध्यक्ष चंद्रकांत ठाकरे यांनी त्यांच्या कार्यकाळात हा निधी मंजूर करून दिला. या उपक्रमामुळे आठवडी बाजारात येणाऱ्या नागरिकांना चांगल्या सुविधा मिळतील तसेच स्थानिक व्यापार व ग्रामीण विकासाला चालना मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली. कार्यक्रमाला ग्रामपंचायत सरपंच शीतल कुमार जैस्वाल, उपसरपंच रवींद्र भाऊ तायडे, भिका सिंग राठोड, पंजाबरावजा `घुगे, विशवनाथ राव घुगे ,रविभाऊ तायडे, दुर्गाबाई झोंबाडे, लिलाबाई गजानन देवकर, शरीफा बी, मीराबाई पावर, मंगलाबाई आडे,अशोक गोदमले, साहेब खा पठाण, हे सर्व ग्रामपंचायत सदस्य, ग्रामविकास अधिकारी साळुंके, व सर्व ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांची उपस्थिती होती.

# पाणीटंचाईवर मात करण्यासाठी जिल्हाधिकारी यांचे निर्देश

▸ महासागर प्रतिनिधी ▸

**वाशिम** - जिल्ह्यातील वाढत्या पाणा टंचाईच्या समस्येचा तातडीने सामना करण्यासाठी जिल्हाधिकारी बुवनेश्वरी एस. यांनी संबंधित विभागांना काटेकोर उपाय योजना राबविण्याचे निर्देश दिले आहेत. जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित केलेल्या आढावा बैठकीत त्या बोलत होत्या.



या बैठकीस निवासी उपजिल्हाधिकारी विश्वनाथ घुगे, उपविभागीय अधिकारी कैलास देवरे, वैशाली देवकर सर्व तहसीलदार, सर्व गटविकास अधिकारी यांची प्रमुख उपस्थिती होती. जिल्हाधिकारी बुवनेश्वरी एस. यांनी सांगितले की, 'गावा गावांतील टंचाई ग्रस्त भागांची तातडीने यादी तयार करा आणि त्या ठिकाणी नियमितपणे टँकरच्या माध्यमातून पाणी पुरवठा सुनिश्चित करा. कोणत्याही गावात पाणी टंचाईमुळे नागरिकांना त्रास होऊ नये.

याची काळजी घ्या.'तसेच, त्यांनी दीर्घकालीन उपाययोजनांवर भर देताना सांगितले की, 'जलसंधारणाच्या विविध योजना - जसे की बंधारे, जलशुद्धीकरण प्रकल्प, शेततळयांची निर्मिती, पाणलोट क्षेत्र विकास - यांचा प्रभावीपणे अंमलबजावणी करा. त्यामुळे भविष्यातील पाण्याची गरज भागवता येईल.

' पाण्याच्या वापराबाबत जनजागृतीची गरज अधोरेखित करत त्यांनी नागरिकांनाही आवाहन केले की, 'पाण्याचा अपव्यय टाळा, वर्षा पाणीसंचयास प्राधान्य द्या आणि जलसंवर्धनासाठी सामूहिक प्रयत्न करा.' या बैठकीत प्रत्येक तालुक्यातील पाणीटंचाईची सद्यस्थिती, उपाययोजना व आवश्यक गरजा यावर सविस्तर चर्चा झाली. प्रशासनाने ठोस कृती आराखडा तयार करून त्याची अंमलबजावणी त्वरित करण्याचा निर्धार व्यक्त केला.

# पहलगाम येथील दहशतवादी हल्याचा मनसेकडून निषेध

▸ महासागर प्रतिनिधी ▸

**वाशीम** - काश्मीर मधील प्रसिद्ध पर्यटनस्थळ पहलगाम येथे पाकिस्तानी दहशत वाद्यानी केलेल्या भ्याड हल्लयाच्या निषेधार्थ आज दिनांक २३ एप्रिल २०२५ रोजी महाराष्ट्र निर्माण सेनेच्या वतीने वाशिम येथे तीव्र आंदोलन करण्यात आले. या आंदोलना दरम्यान पाकिस्तानचा निषेध करत जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. 'पाकिस्तान मुर्दाबाद', 'दहशत वादाचा नाश व्हावा' अशा घोषणा देत उपस्थित कार्यकर्त्यांनी संतप्त प्रतिक्रिया व्यक्त केली.



या निषेध आंदोलनाचे नेतृत्व महाराष्ट्र निर्माण सेनेचे ज्येष्ठ नेते राजू पाटील किडसे यांनी केले. यावेळी पाकिस्तानचा झेंडा जाळून दहशत वाद्यांना विरोध करण्याचा आणि देशाच्या सुरक्षेसाठी एकसंघ राहण्याचा संदेश देण्यात आला.

या आंदोलनात महाराष्ट्र निर्माण सेनेचे अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी झाले होते. उपस्थित मान्यवरांमध्ये वाहतूक सेना जिल्हाध्यक्ष व वाशिम जिल्हा सचिव गजानन वैरागडे, मंगरूळपीर जिल्हा उपाध्यक्ष नरेंद्र भोयर, वाशिम शहराध्यक्ष शिवा इंगोले, वाशिम शहर उपाध्यक्ष गजानन इंगोले, वाशिम तालुका अध्यक्ष विठ्ठल राठोड, मालेगाव तालुका अध्यक्ष ज्ञानेश्वर गवळी, मालेगाव शहराध्यक्ष सुभाष गाभणे, रिसोड जिल्हा उपाध्यक्ष आतिश इहाळे,

रिसोड तालुका सचिव प्रवीण हाडे, रिसोड तालुका अध्यक्ष योगेश वाळके, शिरपूर शहराध्यक्ष सुनील देशमुख, मालेगाव तालुका उपाध्यक्ष अमोल बाविस्कर, वाहतूक विभागाचे गजानन कढणे, उद्धव जाधव (तिवळी सर्कल अध्यक्ष) आदींचा समावेश होता. हे आंदोलन शिस्तबद्ध पद्धतीने पार पडले असून, प्रशासनाच्या देख रेखीखाली शांततेत निषेध व्यक्त करण्यात आला. मनसेच्या कार्यकर्त्यांनी सरकारकडे मागणी केली की, अशा प्रकारच्या हल्लयांचा कडक बदला घ्यावा आणि देशातील प्रत्येक नागरिकाला सुरक्षितता प्रदान करावी.

RNI No-46973/1986 महासागर वाशिम
मालक,मुद्रक,प्रकाशक श्रीकृष्ण तनमुखदास चांडक यांनी, अरुणोदय प्रेस,कॉटन मार्केट,नागपूर -१८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, महात्मा पहिले मार्केट, पाटणी चौक येथे प्रकाशित केले.
संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चाडक मुख्य कार्यालय फोन -९९२२९७००२३ स्थानिक संपादक विनोद तायडे मो नं -९५६३६४५५५५ (पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील )




# मानवजातीच्या रक्षणासाठी...




विचार करा

**मि**त्रांनो, सध्या तुम्ही एआय म्हणजेच कृत्रीम बुद्धिमत्तेबद्दल बरेच काही ऐकत, वाचत असाल. काळानुरुप हे तंत्रज्ञान अधिकाधिक विकसित होणार आहे. भविष्यात तर मानवासारखा विचार करणारे आणि सगळे काही समजून घेणारे कृत्रिम जनरल इंटेलिजेंस अर्थात एजीआय विकसित होऊ शकते असा तज्ज्ञांचा अंदाज आहे. ही बाब मानवतेसाठी कायमचा धोकादेखील बनू शकते.

गुगलच्या एका नवीन रिसर्च पेपरमध्ये हे सांगण्यात आले आहे. संशोधनात दावा करण्यात आला आहे की, २०३० पर्यंत एजीआय विकसित झाले आणि त्यावर योग्यरित्या नियंत्रण ठेवले नाही तर ते मानवजातीचा कायमचा नाश करू शकते. एजीआयचा समाजावर मोठा परिणाम होऊ शकतो आणि त्यामुळे गंभीर नुकसान होऊ शकते किंवा मानवाच्या अस्तित्वावर संकट देखील येऊ शकते असेही काहींचे मत आहे. म्हणूनच आत्तापासूनच सावधगिरीचे उपाय आणि सुरक्षा धोरणांची माहिती घ्यायला हवी.

येत्या काळातील मुख्य धोके म्हणजे एकतर चुकीच्या लोकांकडून चुकीच्या उद्देशाने एजीआयचा वापर होऊ शकतो. तसेच एजीआयची उद्दिष्टे मानवांच्या उद्दिष्टांशी कदाचित न जुळणारी असू शकतात. त्याचबरोबर प्रणालीतील तांत्रिक किंवा नैतिक अपयशामुळे समाजाला काही त्रास सहन करावा लागू शकतो. पुढे जाऊन यामुळे समाजाच्या रचनेवर काही दुष्परिणाम होण्याचा धोकाही नाकारता येत नाही. हे सर्व धोके लक्षात घेता त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी आतापासूनच तयारी आवश्यक आहे. पुढील पाच ते १० वर्षांत एजीआय अस्तित्वात येऊ शकते. त्यामुळेच ते विकसित आणि नियंत्रित करण्यासाठी संयुक्त राष्ट्रांसारख्या आंतरराष्ट्रीय संघटनेची आवश्यकता असल्याचेही तज्ज्ञ सांगतात. याचे कारण म्हणजे सामान्य एआय फक्त एक विशिष्ट कार्य करण्यासाठी वापरले जाते. चॅटबॉट्स, सर्च इंजिन असा त्याचा आवाका आहे. मात्र आर्टिफिशियल जनरल इंटेलिजेंस हे तंत्रज्ञान मानवांप्रमाणे विचार करण्यास, समजून घेण्यास, शिकण्यास आणि निर्णय घेण्यास सक्षम असेल. म्हणूनच ते कोणत्याही एका कार्यापुरते मर्यादित राहणार नाही तर प्रत्येक क्षेत्रात मानवासारखी क्षमता असल्यामुळे ते अधिक घातक ठरु शकेल.



# भौगोलिक वैशिष्ट्ये जपणारा देश

सफर देशांची

**माँ**टेनेग्रो हा दक्षिणपूर्व युरोपातला देश आहे. मॉंटेनेग्रो म्हणजे 'काळा पर्वत'. अल्बानिया, क्रोएशिया, सर्बिया, बोस्निया हे मॉंटेनेग्रोचे शेजारी देश आहेत. विसाव्या शतकापर्यंत मॉंटेनेग्रो हा युगोस्लाव्हियाचा भाग होता. हा खूपच सुंदर देश आहे. इथे भौगोलिक वैविध्य पहायला मिळतं. उंचच उंच पर्वतरांगा, सोनेरी वाळूने नटलेले समुद्रकिनारे आणि इथली टुमदार शहरं पर्यटकांना आकर्षित करतात. २००६ मध्ये मॉंटेनेग्रो स्वतंत्र देश म्हणून उदयाला आला. यानंतर या देशाने आर्थिक प्रगतीसाठी बरेच प्रयत्न केले.

'पॉडगॉरिका' ही या देशाची राजधानी आहे. 'मॉंटेनेग्रीन' ही इथली अधिकृत भाषा आहे. या देशात बऱ्याच पर्वतरांगा आहेत. तसंच इथला काही भाग सपाटही आहे. 'स्कॅडार' हा या देशातला सर्वात मोठा तलाव तर ड्रिना, लिम आणि तारा या प्रमुख नद्या आहेत. या देशात बराच काळ उन्हाळा असतो. इथे उन्हाळ्यात कोरडं वातावरण असतं.

इथला हिवाळा सौम्य असतो. जंगली डुकरं, अस्वलं, हरणं, कोल्हे, लांडगे, रानमांजरं असे प्राणी इथे आढळतात. काही प्रजातींचे मासे, गोगलगायी आणि किटक फक्त मॉंटेनेग्रोमध्येच आढळतात. इथे विविध प्रकारची झाडंही आहेत. हा प्रदेश पंधराव्या शतकापासून मॉंटेनेग्रो म्हणून ओळखला जातो. या देशात विविध प्रकारचे उद्योग आहेत. स्टीलनिर्मिती, ॲल्युमिनियमशी संबंधित उद्योग, शेतमालावर प्रक्रिया करणं आणि पर्यटन हे इथले प्रमुख उद्योग आहेत. बटाटे, आंबट फळं, धान्यं, ऑलिव्ह ही पिकं इथे घेतली जातात.

# लिंबूपाणी प्या, ऊर्जा मिळवा

**छो**ट्या दोस्तांनो, उन्हाळ्यात खूप तहान लागते. मग तुम्ही थंड सॉफ्टड्रिंकसाठी हट्ट करता. पण त्यामध्ये आरोग्यास हानिकारक ठरणारे अनेक घटक असतात. म्हणूनच जास्त प्रमाणात शीतपेये घेणे टाळा. त्याऐवजी या कडक उन्हात तुम्ही लिंबूपाणी पिऊ शकता. तुम्ही संध्याकाळपर्यंत लिंबू पाणी प्यायले तर उन्हाचा त्रास कमी होतो कारण हे पेय केवळ तहान भागवत नाही तर आरोग्यासाठी अनेक प्रकारे फायदेशीर ठरते. चला तर मग, याविषयी अधिक जाणून घेऊ या.



स्टे फिट

मित्रांनो, लिंबामध्ये व्हिटॅमिन सी, अँटिऑक्सिडंट्स आणि इलेक्ट्रोलाइट्स भरपूर प्रमाणात असतात, जे शरीराला ऊर्जा प्रदान करतात. तुम्ही दिवसभर वेगवेगळ्या प्रकारे घेऊ शकता. जसे की, सकाळी उठल्यानंतर कोमट पाण्यात लिंबू आणि मध मिसळून प्यायल्याने पचनसंस्था सक्रिय होते. नियमित हा नियम पाळला तर शरीरातील विषारी पदार्थ बाहेर पडून चयापचय सुधारण्यास मदत होते. रिकाम्या पोटी लिंबूपाणी पिल्याने वजन कमी होण्यासही मदत होते.

* जेवणापूर्वी लिंबूपाणी प्यायल्यास पाचकस्राव सक्रिय होतो आणि अन्न चांगले पचते.
* व्यायाम केल्यानंतर किंवा उन्हात खेळून आल्यावर लिंबूपाणी पिल्याने शरीरातील इलेक्ट्रोलाइट्सची कमतरता भरून निघते. स्वाभाविकच थकवा दूर होतो. तुम्ही लगेचच ताजेतवाने होता.
* दुपारी लिंबूपाणी पिल्याने शरीर हायड्रेट राहते आणि उष्म घाताचा धोका कमी होतो. म्हणूनच दुपारी घरी आल्यावर थंड पाणी पिण्याऐवजी तुम्ही थंड लिंबूपाणी पिऊ शकता.
* रात्री झोपण्यापूर्वी मात्र लिंबूपाणी पिऊ नका, कारण त्यामुळे आम्लपित्ताचा त्रास होता. त्याचबरोबर एकाच वेळा प्रमाणापेक्षा जास्त लिंबूपाणी पिल्याने दातांवरील संरक्षक कोटिंग खराब होऊ शकते. म्हणून हे पाणी स्ट्रॉमधून पिणे चांगले.





# अंतराळाचे अंतरंग

गंमत जंमत

**मु**लांनो, अंतराळात अनेक रहस्यं दडली आहेत. आपली सूर्यमाला, आकाशातले तारे, धूमकेतू याबद्दल तुम्हालाही कुतूहल असेल. आपला भारतही अंतराळ संशोधन क्षेत्रात प्रगती करतो आहे. अवकाशाबद्दल कितीही जाणून घेतलं तरी कमीच पडेल. म्हणूनच अवकाशाबद्दलची ही रंजक माहिती खास तुमच्यासाठी...

* बुध हा आपल्या सूर्यमालेतला पहिला ग्रह. सूर्याच्या जवळ असल्यामुळे बुध सर्वात उष्ण ग्रह असेल असं आपल्याला वाटतं. पण खरं तर तसं नसतं. कोणत्याही ग्रहावरच्या तापमानावर तिथल्या वातावरणाचा प्रभाव असतो. कार्बन डाय ऑक्साइडचं प्रमाण बरंच जास्त असल्यामुळे शुक्र बुधापेक्षा जास्त उष्ण आहे.
* चीनची भिंत जगातल्या सात आश्चर्यांपैकी एक. ही भिंत चंद्रावरून दिसते असं म्हटलं जातं. पण प्रत्यक्षात कोणतीही मानवनिर्मित वास्तू अंतराळातून दिसत नाही.
* सूर्याचा रंग पिवळा आहे असं आपल्याला वाटतं. पण प्रत्यक्षात तो पांढऱ्या रंगाचा आहे. प्रखरतेमुळे तो आपल्याला पिवळ्या रंगाचा दिसतो.
* शास्त्रज्ञांना अंतराळ, आपली सूर्यमाला याबद्दल सगळी माहिती आहे, असंही आपल्याला वाटत असतं. पण अंतराळातली बरीच रहस्यं अजूनही उघड झालेली नाहीत.




# असा असतो पिन कोड

जाणून घ्या

**मि**त्रांनो, तुम्ही कधी एखाद्याला पत्र लिहिले किंवा पार्सल पाठवले असेल तर पत्त्यासोबत पिन कोड लिहावा लागला असेल. कारण पिन कोडशिवाय पत्ता अपूर्ण मानला जातो. पण पिन कोड म्हणजे काय, कोणत्याही ठिकाणाच्या पत्त्यामागे हे क्रमांक का लिहिलेले असतात आणि ते कसे सुरु झाले, या प्रश्नांची उत्तरे जाणून घ्यायची आहेत का? तर मग हे नक्की वाचा.

**पिनकोड काय आहे?**

पिन कोडचे पूर्ण नाव 'पोस्टल इंडेक्स नंबर' असे आहे. भारतीय टपाल विभागाने देशातील विविध प्रदेश ओळखण्यासाठी हा सहा अंकी कोड तयार केला आहे. पिन कोडचा उद्देश टपाल सेवा जलद, सुव्यवस्थित आणि अचूक बनवणे हा आहे. यामुळे पत्रे, पार्सल आणि इतर टपाल योग्य ठिकाणी पोहोचवण्यास मदत होते.

**पिन कोडची रचना कशी असते?**

भारताचा पिन कोड सहा अंकांनी बनलेला असून प्रत्येक अंक विशिष्ट भौगोलिक क्षेत्राचे प्रतिनिधित्व करतो.

जसे की, पहिला अंक भारताचा झोन दर्शवतो. आपला संपूर्ण देश एकूण नऊ पोस्टल झोनमध्ये विभागलेला आहे. त्यापैकी आठ प्रादेशिक आहेत आणि नववा विभाग आर्मी (आर्मी पोस्टल सर्व्हिस) साठी आहे. यामध्ये

क्रमांक १ उत्तर प्रदेशसाठी असून यामध्ये दिल्ली, हरियाणा, पंजाब, हिमाचल प्रदेश, जम्मू आणि काश्मीर चा समावेश होतो. क्रमांक २ उत्तर प्रदेशसाठी असून त्यात उत्तराखंड, उत्तर प्रदेशचा समावेश होतो. क्रमांक ३ मध्ये देशाचा पश्चिम प्रदेश म्हणजेच राजस्थान, गुजरात समाविष्ट आहेत. क्रमांक ४ मध्ये महाराष्ट्र, गोवा, मध्य प्रदेशचा समावेश होतो. क्रमांक ५ मध्ये दक्षिण प्रदेश अर्थात आंध्र प्रदेश, तेलंगणा, कर्नाटक समाविष्ट होतात. क्रमांक ६ मध्ये केरळ, तामिळनाडूचा समावेश आहे. क्रमांक ७ मध्ये पूर्व प्रदेश म्हणजेच पश्चिम बंगाल, ओडिशा, आसामचा समावेश होतो. क्रमांक ८ मध्ये बिहार आणि झारखंड ही राज्ये येतात तर क्रमांक ९ मध्ये आर्मी पोस्टल सर्व्हिस (एपीओ आणि एफपीओ) चा समावेश होतो.

पिन कोडमधील दुसरा अंक उप-क्षेत्र दर्शवतो. तिसरा अंक जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करतो आणि शेवटचे तीन अंक विशिष्ट पोस्ट ऑफिस दर्शवतात. उदाहरणार्थ पिनकोड ११०००१ असेल तर १-उत्तर विभाग (दिल्ली) १० - दिल्ली उप-प्रदेश आणि ००१-कॅनॉट प्लेस पोस्ट ऑफिस असा याचा पत्ता असतो.

चित्र रंगवा




## ओळखा पाहू

जिज्ञासा

१) अरुणाचल प्रदेशची राजधानी कोणती?
२) 'खासी' ही भारतातल्या कोणत्या राज्याची प्रमुख भाषा आहे.?
३) वॉटर पोलोच्या एका संघात किती खेळाडू असतात?
४) सौरभ चौधरी कोणता खेळ खेळत असे?
५) सिमोना हालेप कोणत्या स्पर्धेतील विजेती कोण?
६) 'विंग्ज ऑफ फायर' हे कोणाचं आत्मचरित्र आहे?
७) मेघालयचं लोकनृत्य कोणतं?
८) दांडिया हा कोणत्या राज्यातला नृत्यप्रकार आहे?
९) २०१९ मधील जी २० देशांची परिषद कुठे आयोजित करण्यात आली होती?
१०) भारताची पहिली बुलेट ट्रेन कोणत्या दोन शहरांदरम्यान धावणार आहे?

उत्तरं : १) इटानगर २) मेघालय ३) तीन ४) नेमबाजी ५) विम्बल्डन स्पर्धा ६) डॉ. एपीजे अब्दुल कलाम ७) लोहो ८) गुजरात ९) जपान १०) मुंबई-अहमदाबाद

ठिपके जुळवा



# उपकरण चार्जिंगला लावताय?

काळजी घ्या

**छो**ट्या मित्रांनो... सुट्टीच्या या काळात वा एरवीदेखील तुम्ही स्मार्टफोन, लॅपटॉप, टॅब्लेट आणि स्मार्टवॉच यासारखी इलेक्ट्रॉनिक उपकरणे चार्जिंगला लावत असाल. याची गरजच असते. परंतु चुकीच्या चार्जिंग सवयींमुळे बॅटरीचे आयुष्य कमी होऊ शकते तसेच सुरक्षिततेला धोका निर्माण होऊ शकतो. म्हणूनच चार्जिंग करताना काही बाबी अवश्य लक्षात ठेवल्या पाहिजेत.

* सगळ्यात पहिली आणि महत्त्वाची बाब म्हणजे नेहमी डिव्हाइससह आलेला चार्जर आणि केबल आणि ती नसेल तर विश्वासार्ह ब्रँडचा प्रमाणित चार्जर वापरा. स्वस्त, ब्रँड नसणारे चार्जर सतत वीज पुरवत नाहीत आणि त्यामुळे बॅटरी खराब होऊ शकते. शॉर्ट सर्किटचाही मोठा धोका असतो.
* आधुनिक उपकरणांना ओव्हरचार्जिंग संरक्षण असते परंतु १००% चार्ज झाल्यानंतरही त्यांना जास्त काळ प्लग इन ठेवणे अजिबात चांगले नाही. रात्रभर चार्जिंग केल्याने उष्णता वाढून बॅटरीवर ताण येऊ शकतो.
* लिथियम बॅटरीसाठी २० ते ८०% चार्ज पातळी सर्वोत्तम असते कारण ही श्रेणी बॅटरीचे आरोग्य राखते आणि तिचे आयुष्य वाढवते.
* उष्णता हा बॅटरीचा सर्वात मोठा शत्रू आहे. म्हणूनच चार्जिंग करताना उपकरण उशीखाली, चादरीत किंवा उन्हात ठेवू नका. तसेच चार्जिंग करताना जड ॲप्स किंवा गेम वापरू नका कारण यामुळेही बॅटरी जास्त गरम होऊ शकते.
* चार्जिंग करताना फोन किंवा लॅपटॉप असामान्यपणे गरम झाला तर ताबडतोब अनप्लग करा. थंड झाल्यावर पुन्हा चार्जिंगला लावा. वारंवार डिव्हाईस गरम होणे हे हार्डवेअर किंवा चार्जरच्या समस्येचे संकेत असू शकते.



* चार्जिंग करताना डिव्हाइसचा जास्त वापर केल्याने उष्णता वाढते आणि चार्जिंगचा वेग कमी होतो. तेव्हा हलका वापर ठीक आहे, पण चार्जिंग सुरू असताना गेमिंग किंवा व्हिडिओ एडिटिंग टाळा.
* चार्जिंग पोर्ट प्लग इन करण्यापूर्वी ते स्वच्छ आणि कोरडे असल्याची खात्री करा. ओलाव्यामुळे शॉर्ट सर्किट होऊ शकते आणि धुळीमुळे चार्जिंग कार्यक्षमतेवर परिणाम होऊ शकतो.

दोस्त हे मस्त

## मधमाश्यांच्या जगात...

मुलांनो, मधमाश्यांमुळे आपल्याला मध मिळतो. तुम्ही बऱ्याच ठिकाणी मधमाश्यांची पोळी बघितली असतील. फुलं असणाऱ्या ठिकाणी मधमाश्या असतातच. बर्फाळ अंटार्क्टिका खंड सोडून सगळीकडे मधमाश्या असतात. राणी मधमाशी एकावेळी जवळपास १५०० अंडी घालते. माणसासाठी अन्न निर्माण करणारा मधमाशी हा एकमेव कीटक आहे.



खादाडी

## पनीर ब्रेड डिस्क




काहीतरी वेगळं करायचं असेल तर पनीर ब्रेड डिस्कचा पर्याय आहे. यासाठी आठ ब्रेड स्लाइस, चार चमचे बटर, दोन चमचे टोमॅटो सॉस, एक चमचा ऑरेगानो, एक चमचा ठेचलेला लसूण, पाव कप कुस्करलेलं पनीर, प्रत्येकी दोन चमचे चिरलेला कांदा, टोमॅटो आणि सिमला मिरची, पाव कप चीझ, चमचाभर मिरपूड, चिरलेली कोथिंबिर आणि मीठ हे साहित्य घ्या. ब्रेडच्या कडा कापून घ्या. आता सगळ्या ब्रेड्स मधला भाग गोल आकारात कापून घ्या. मग एका भांड्यात दोन चमचे बटर, टोमॅटो सॉस,ऑरेगानो आणि लसूण घालून मिक्स करा. आता प्रत्येक ब्रेडला हे मिश्रण लावून घ्या. दुसऱ्या भांड्यात कांदा, टोमॅटो, सिमला मिरची, पनीर, चीझ, कोथिंबिर, मिरपूड आणि मीठ हे घटक घाला. मिसळून घ्या. हे मिश्रण चार गोलाकार चकत्यांवर पसरा. त्यावर दुसरी गोलाकार चकती ठेवा. आता तवा घ्या. त्यावर बटर घाला आणि ब्रेड दोन्ही बाजूंनी भाजून घ्या. सॉससोबत खा.

स्टडी टिप्स

## लेखनाचा सराव करा

अभ्यासाचा खूप ताण असतो. पण मुलांनो, कधीही कोणत्याही परीक्षांना घाबरायचं काहीच कारण नाही. पेपर वेळेत पूर्ण करण्यासाठी लेखनाचा सराव करायला सुरुवात करा. तेव्हा आताच्या निवांत वेळी हा सराव करा. यासाठी चांगल्या बॉलपेनची निवड करा. पेनला चांगली ग्रीप असायला हवी. लेखनाच्या सरावामुळे परीक्षेच्या दिवशी तुमच्या हातांवर ताण येणार नाही.



योगा टाईम

## पोटदुखी पळवण्यासाठी...

मुलांनो, अधूनमधून पोट दुखत असेल. अपचनासारख्या तक्रारी उद्भवत असतील. हा त्रास कमी करण्यासाठी विविध प्रकारची योगासनं करता येतील. जानुशिरासन, उष्ट्रासन, तिर्यक ताडासन, कटिचक्रासन या आसनांमुळे पोटाच्या तक्रारी दूर होतात.



# जिल्ह्यातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मार्गी लावू : पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. २५ :

जिल्ह्याला मुबलक प्रमाणात पाण्याची उपलब्धता आहे. याला काटोल आणि नरखेड तालुक्यातील काही गावे अपवाद आहेत. या तालुक्यात सूमारे आठशे फुटापेक्षा पाणी पातळी अधिक खोल गेली आहे. ज्या गावांमध्ये पिण्याच्या पाण्याची दूर्भिक्षता आहे अशी गावे जिल्हा प्रशासनामार्फत निश्चित केली आहेत. या गावांमध्ये पिण्याच्या पाण्याची उपलब्धता तत्परतेने करुन देण्याचे निर्देश पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी जिल्हा प्रशासनास दिले.



पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी जिल्ह्यातील पाणी टंचाईबाबत जिल्हाधिकारी कार्यालयात आढावा घेतला. या बैठकीस जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर, अतिरिक्त जिल्हाधिकारी तुषार ठोंबरे, निवासी उपजिल्हाधिकारी प्रविण महिरे व उपविभागीय अधिकारी उपस्थित होते.

जिल्ह्यातील पाणी टंचाई अंतर्गत ज्या काही उपाय योजना शासनाने सूचविल्या आहेत त्यावर भर देऊन नाला खोलीकरण व स्त्रोत बळकटीकरण करणे, टँकरग्रस्त गावात जलसंधारणाच्या कामावर भर देणे, अतिरिक्त पाणी नियोजन आराखडा तयार करणे यावर अधिक लक्ष देण्याचे निर्देश पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिले.

## महाराष्ट्रात पहिल्यांदाच आढळला पांढरा बिबट

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. २५ :

ब्लॅक लेपर्ड म्हणजेच काळ्या बिबट्यांची संख्या अलीकडच्या काही वर्षात वाढली आहे. पांढऱ्या बिबट्याची नोंद मात्र अजूनतरी राज्यात झालेली नव्हती. बुधवारी कोकणातील रत्नागिरी येथे बिबट्याचा पांढरा बछडा आढळून आल्याने सगळीकडेच चर्चा झाली. या बछड्याने अद्याप डोळेही उघडलेले नव्हते, पण मादी बिबट त्यांना घेऊन गेली.

महाराष्ट्रातील कोकणात पहिल्यांदाच या बिबट्याचा पांढऱ्या रंगाचा बछडा आढळ्ला आहे. कोकणातील रत्नागिरी जिल्ह्यातील एका गावात काजू लागवडीसाठी झाडे तोडण्याचे काम सुरू होते. झाडे तोडत असताना मजूरांना बिबट्याचे दोन बछडे आढळून आले. त्यातील एक बछडा सामान्य होता, तर दूसरा बछडा मात्र पूर्णपणे पांढऱ्या रंगाचा होता. हे दोन्ही बछडे नुकतेच जन्मलेले असावेत कारण त्यांनी डोळे देखील उघडलेले नव्हते.

# संत्री उत्पादक क्षेत्राचा नदीजोड प्रकल्पात समावेश का नाही?

### अनिल देशमुखांचा सवाल

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. २५ :

विदर्भातील महत्वाकांक्षी प्रकल्प वैनगंगा- नळगंगा नदी जोड प्रकल्पात वरुड, मोर्शी, काटोल, नरखेड तालुक्यांचा समावेश करण्याची मागणी माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांनी मुख्यमंत्र्यांकडे केली आहे.

नागपूर, वर्धा, अमरावती, यवतमाळ, अकोला व बुलढाणा या सहा जिल्हातील एकुण ३,७१,२७७ हेक्टर क्षेत्रास सिंचन उपलब्ध होणार आहे. या योजने अंतर्गत वैनगंगा नदीवरील गोसीखुर्द जलाशयातून पाणी उचलून बुलढाणा जिल्हयातील नळगंगा धरणापर्यत ४२६ किलोमीटर लांबीचा कालवा असणार आहे. या प्रकल्पात विदभार्तील संत्रा पिकाकरिता प्रसिध्द असलेल्या वरुड, मोर्शी, काटोल, नरखेड या तालुक्यांचा समावेश करावा अशी मागणी करणारे पत्र राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे नेते माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांनी केली.



वरुड, मोर्शी, काटोल, नरखेड या भागातील भुजल पातळी ही ८०० फुटापेक्षा खाली गेल्यामुळे या क्षेत्रास डार्क झोन संबोधिल्या जाते. या भागावात पूर्वी मोठया प्रमाणात संत्रा व मोसंबीची लागवड करण्यात येत होती. पाण्याच्या अभावी संत्रा व मोसंबी बागा वाळत असून लागवडीचे क्षेत्रफळ सुध्दा मोठया प्रमाणात कमी झाले आहे. यामुळे वैनगंगा-नळगंगा नदी जोड योजने अंतर्गत या क्षेत्राचा समावेश करुन या क्षेत्रातील भुजलाची पातळी वाढविण्याबाबत प्राधान्याने विचार होणे आवश्यक होता.

परंतु या योजनेत विदर्भातील संत्रा पिकाकरिता प्रसिध्द असलेल्या आणि सिंचनासाठी पाण्याची आवश्यकता असतांना काटोल, नरखेड, वरुड, मोर्शी या तालुक्यांचा समावेश करण्यात आला नाही. यामुळे या भागाचा वैनगंगा-नळगंगा नदी जोड प्रकल्प मध्ये समावेश करावा अशी मागणी अनिल देशमुख यांनी केली आहे.

# हवाई दलाचे महाराष्ट्रातील पहिले संग्रहालय नागपुरात

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. २५ :

नव्या पिढीला भारतीय हवाई दलाचा इतिहास, परंपरा आणि हवाई दलाच्या प्रारंभी पासून आजवर वापरात असलेले विमाने, हेलिकॉप्टर, रडार आणि इतर उपकरणांची माहिती देणारे हवाई दलाचे महाराष्ट्रातील पहिले संग्रहालय नागपुरात सुरू झाले आहे. हे संग्रहालय मंगळवार वगळता आठवडाभर खुले करणार आहे.

नागपुरातील वायुसेनानगर येथे एअर फोर्स म्युझियमचे उदघाटन शुक्रवारी मेंटेनन्स कमांडचे एअर ऑफिसर कमांडिंग-इन-चीफ एअर मार्शल विजय कुमार गर्ग यांच्या हस्ते करण्यात आले. एअरफोर्स म्युझियममध्ये भारतीय लष्करी हवाई वाहतुकीच्या आठवणींचा समृद्ध संग्रह आहे आणि भारतीय हवाई दलाचा इतिहास प्रदर्शित केला आहे. संग्रहालयाच्या प्रवेशद्वारावर एमआय ८ हेलिकॉप्टर, मिग-२१ लढाऊ विमाने आणि पिचोरा क्षेपणास्त्र आहे. हवाई दलाच्या संग्रहालयाचा मुख्य उद्देश हवाई दलाचा इतिहास, उत्क्रांती आणि कर्तृत्वाचे जतन आणि प्रदर्शन करणे आहे. तसेच हवाई दलाचे जवान आणि त्यांच्या योगदानाबद्दल नवीन पिढीला माहिती मिळावी आणि प्रेरणा घेता यावी यासाठी आहे.



## महाराष्ट्रात १२१ ओला शोरूम बंद होणार

■ महासागर प्रतिनिधी,
मुंबई, दि. २५ :

महाराष्ट्रातील इलेक्ट्रिक दुचाकी उत्पादक कंपनी ओलाचे १२१ स्टोअर्स बंद होणार आहेत. महाराष्ट्राच्या वाहतूक विभागाने स्थानिक आरटीओला ते बंद करण्याचे निर्देश दिले आहेत. वाहतूक विभागाने १४६ ओला स्टोअर्सची तपासणी केली होती, त्यापैकी १२१ शोरूम ट्रेड सर्टिफिकेटशिवाय सुरू असून, ती तत्काळ बंद करण्याच्या सूचना आरटीओने केल्या आहेत. यासाठी आतापर्यंत आरटीओकडून १०९ कारणे दाखवा नोटीस बजावल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. दुकानांमध्ये व्यापार प्रमाणपत्र नसल्यामुळे, १९२ वाहने जप्त करण्यात आली आणि कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आल्या.

# मुलाला चांगले गुण देऊ म्हणत विद्यार्थ्याच्या आईवर अत्याचार

■ महासागर प्रतिनिधी,
बुलढाणा, दि. २५ :

मलकापूर मधून एक धक्कादायक घटना समोर आली आहे. विद्यार्थ्याच्या आईवर दोन शिक्षकांनी वारंवार अत्याचार केल्याचे समोर आले आहे. मुलाला चांगले गुण देण्याचे आमिष दाखवत हे कृत्य करणाऱ्या दोघांना पोलिसांनी अटक केली आहे. न्यायालयाने त्यांना १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार मलकापूरच्या एका शाळेतील सहाय्यक शिक्षक समाधान इंगळे आणि सहाय्यक शिक्षक अनिल थाटे यांनी २०२४ ते २०२५ दरम्यान अनेकदा ३४ वर्षीय महिलेवर अत्याचार केले. आम्हाला खूश ठेव तुज्या मुलाचा पहिला नंबर आणू, त्याला चांगले मार्क देऊ, असे आमिष या शिक्षकांनी महिलेला दाखवले होते. असे केले नाही तर तुज्यासह मुलाला जीवे ठार मारू अशी धमकी दिल्याचेही पीडितेने तक्रारीत म्हटले आहे.

पीडित महिला ही मूळ मोताळा तालुक्यातील असून, मुलांच्या शिक्षणासाठी मलकापूर येथे वास्तव्यास आली होती. तिने मलकापूर शहर पोलिस ठाण्यात दिलेल्या तक्रारीनुसार, समाधान इंगळे (वय ४५) आणि अनिल थाटे (वय ४७) या दोन शिक्षकांनी तिच्यावर सप्टेंबर २०२४ पासून एप्रिल २०२५ दरम्यान वेळोवेळी अत्याचार केले. इंगळे हा तिच्या मुलाचा वर्गशिक्षक असून, शैक्षणिक प्रगतीचे आमिष दाखवून दोघांनीही तिला शारीरिक संबंधासाठी भाग पाडले. नकार दिल्यास मुलाला आणि तिला जीवे मारण्याची धमकी दिली जात होती. मानसिकदृष्ट्या खचलेल्या महिलेला अखेर धैर्य करून पोलिसांत धाव घ्यावी लागली. पीडितेच्या तक्रार वरुन मलकापूर पोलिसांनी आरोपी समाधान इंगळे, अनिल थाटे यांच्या विरोधात गुन्हा दाखल केला.

# अल्पवयीन मुलीवर अत्याचार

■ महासागर प्रतिनिधी,
पुणे, दि. २५ :

पुण्यातील खेड तालुक्यातील मांजरेवाडी या गावात एका १७ वर्षीय मुलीवर लैंगिक अत्याचार करून तिची निर्घृण हत्या करण्यात आली आहे. या घटनेने सर्वत्र एकच खळबळ उडाली आहे. नराधमाने या अल्पवयीन मुलीला शेतात नेत तिच्यावर दोनवेळा लैंगिक अत्याचार केले व त्यानंतर तिचा खून केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली आहे. या घटनेनंतर राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांनी पीडित मुलीच्या कुटुंबीयांशी संवाद साधला आहे.

या घटनेची माहिती देताना रूपाली चाकणकर म्हणाल्या, खेड तालुक्यातील अशा घटना घडू नयेत म्हणून सोमवारपासून शाळेतील मुलीसोबत संभाषण करण्याच्या सूचना बिट मार्शल दामिनी पथकाला दिल्या आहेत. त्याचसोबत १७ वर्षीय तरुणीवर हा प्रसंग घडला हा वेदनादायी आहे. आरोपीला अटक केली आहे, पोलिसांनी तपास चांगला केला आहे, असे रूपाली चाकणकर म्हणाल्या. तसेच आरोपीची चार्जशीट तात्काळ दाखल करून गुन्हा फास्ट ट्रॅकवर घेऊन आरोपीला फाशीच्या शिक्षेपर्यंत पोहोचवू, असा विश्वासही चाकणकर यांनी दिला आहे.

पुढे बोलताना त्या म्हणाल्या, समाजात असे नराधम जगूच नये, ही विकृती आहे. त्याच्या विरोधात आपली लढाई आहे. खेड तालुक्यातील अशा घटना घडू नयेत म्हणून सोमवार पासून शाळेतील मुलीसोबत संभाषण करण्याच्या सूचना बिट मार्शल दामिनी पथकाला दिल्या आहे. आरोपी व्यक्ती ही ओळखीची व्यक्ती आहे आणि समाजामध्ये ९० टक्के हे ओळखीच्या लोकांकडून अन्याय अत्याचार होत आहे, त्यामुळे ओळखीच्या लोकांवर सुद्धा विश्वास ठेवू नये.

# पाळीव प्राण्यांच्या अंत्यसंस्कारासाठी स्मशानभूमी राज्य सरकारचा महत्त्वपूर्ण निर्णय

■ महासागर प्रतिनिधी,
मुंबई, दि. २५ :

राज्यातील अनेक नागरिक कुत्रे, मांजरे, गौवंशीय प्राणी यांसारखे पाळीव प्राणी घरात पाळतात. मात्र, या प्राण्यांची वयोमर्यादा कमी असल्याने त्यांच्या मृत्यूनंतर त्यांचे शव खाडी, तलाव, मोकळ्या जागा यांसारख्या ठिकाणी टाकले जाते. यामुळे दुर्गंधी पसरण्याबरोबरच रोगराईचा धोकाही निर्माण होतो. या गंभीर समस्येवर उपाययोजना म्हणून राज्य सरकारच्या नगरविकास विभागाने एक महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. राज्यातील सर्व महापालिका, नगरपरिषदा आणि नगरपंचायतींना त्यांच्या कार्यक्षेत्रातील घनकचरा व्यवस्थापन केंद्राशेजारी पाळीव प्राण्यांच्या अंत्यसंस्कारासाठी जागा राखीव ठेवावी लागणार आहे. यासंदर्भात नगरविकास विभागाने परिपत्रक जारी केले आहे.

हा निर्णय मागील काही वर्षांपासून चर्चेत असलेल्या मागणीच्या पार्श्वभूमीवर घेण्यात आला आहे. २५ जुलै २०२३ रोजी मंत्री प्रताप सरनाईक यांनी विधानसभेत औचित्याच्या मुद्द्याद्वारे पाळीव प्राण्यांच्या अंत्यसंस्कारासाठी स्वतंत्र स्मशानभूमीची मागणी उपस्थित केली होती. काही स्थानिक स्वराज्य संस्थांनी घनकचरा व्यवस्थापन केंद्राशेजारी प्राण्यांच्या अंत्यसंस्कारासाठी जागा उपलब्ध करायला सुरुवात केली आहे. मात्र, मानवी स्मशानभूमीशेजारी अशी व्यवस्था केल्यास धार्मिक आणि सामाजिक तेढ निर्माण होण्याची शक्यता असते. तसेच, अंत्यसंस्कारावेळी योग्य खबरदारी न घेतल्यास दुर्गंधी आणि रोगराई पसरण्याचा धोका असतो. त्यामुळे घनकचरा व्यवस्थापन केंद्राशेजारीच जागा राखीव ठेवण्याचा सरकारचा निर्णय स्वागतार्ह मानला जात आहे.

या निर्णयानुसार, सर्व महापालिका, नगरपरिषदा आणि नगरपंचायतींना पाळीव प्राण्यांच्या अंत्यसंस्कारासाठी राखीव जागेला संरक्षक भिंत आणि सुरक्षा व्यवस्था उभारावी लागणार आहे. अंत्यसंस्कारा वेळी दुर्गंधी आणि रोगराई पसरणार नाही, याची काळजी घेण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. विशेष म्हणजे, या सुविधेसाठी स्थानिक स्वराज्य संस्थांना ठराविक शुल्क आकारण्याची मुभा देण्यात आली आहे, ज्यामुळे या व्यवस्थेचा खर्च भागवता येईल.

## दोन गटात तुफान दगडफेकीमुळे नागरिक जखमी

■ महासागर प्रतिनिधी, बीड, दि. २५ :

बीड जिल्ह्यातील आष्टी या गावात दोन गट आपसात भिडल्या मुळे तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. या दरम्यान गावातील सुमारे २०० ते ३०० तरुणांनी रस्त्यावर एकमेकांच्या दिशेने जोरदार दगडफेक केली. तर काहींनी हातात लाकडी दांडे आणि शस्त्र घेऊन दहशत माजवण्याचा प्रयत्न केला. या सर्व घटनांचे व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत. या दगडफेकीत काहीजण जखमी झाले असल्याची माहिती देखील मिळत आहे. दरम्यान सध्या गावात तणावपूर्ण शांतता असल्याची माहिती सूत्रांच्या वतीने देण्यात आली आहे.

बीड जिल्ह्यात गुन्हेगारीच्या घटना वारंवार समोर येत असतात. त्यातच संतोष हत्या प्रकरण आणि खोक्या प्रकरण ताजे असतानाच आता बीड जिल्ह्यातील आष्टी गावात दोन गट परस्परांशी भिडले असल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे महाराष्ट्रात बीड ची ओळख आता गुन्हेगारी जिल्हा म्हणून होताना दिसत आहे.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार आष्टीच्या खडकत गावामध्ये एका चौकात झेंडा लावण्या वरून हा वाद सुरू झाला. हा वाद अति टोकाला पोहोचल्यानंतर दोन गटामध्ये मोठ्या प्रमाणात दगडफेक देखील झाली. दोन्ही बाजूने झालेल्या दगडफेकीत गावातील नागरिक जखमी झाले आहेत. त्यामुळे मोठ्या प्रमाणात तणाव निर्माण झाला होता. अखेर पोलिस घटनास्थळी दाखल झाले आणि त्यांनी वाद मिटवण्याचा प्रयत्न केला. सध्या या गावात मोठ्या प्रमाणात पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला असून गावात तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# आदिल शाहच्या कुटुंबाला एकनाथ शिंदेंकडून घर

### पर्यटकांना वाचवताना झाली होती हत्या

■ महासागर प्रतिनिधी,
मुंबई, दि. २५ :

पहलगाम येथे झालेल्या हल्ल्यावेळी आदिल शाह यांचा पर्यटकांना वाचवताना मृत्यू झाला होता. अतिरेक्यांनी आदिल शाह यांची गोळ्या झाडून हत्या केली होती. आता आदिल शाहच्या कुटुंबाला महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे घर बांधून देणार असल्याची माहिती समोर आली आहे. एकनाथ शिंदे यांनी आदिल शाह यांच्या कुटुंबीयांना व्हिडिओ कॉलद्वारे संवाद साधला आहे.

एकनाथ शिंदे यांनी व्हिडिओ कॉलद्वारे आदिल शाह यांच्या बंधूशी संवाद साधला. यावेळी एकनाथ शिंदे यांनी कुटुंबीयांची विचारपूस केली तसेच कुटुंबीयांनी शिंदेंचे आभार मानले. यावेळी आदिल शाह यांच्या भावाने हल्ल्यावेळी नेमके काय घडले याची माहिती एकनाथ शिंदे यांना दिली. आदिल शाह हा घोडा सवारी करण्यासाठी तिथे गेला असताना दुपारी २ च्या सुमारास हल्ला झाला. आम्ही त्याला संपर्क करण्याचा प्रयत्न करत होतो परंतु कॉल लागत नव्हता, अशी माहिती आदिल शाह यांच्या भावाने एकनाथ शिंदे यांना दिली.

पुढे त्यांनी सांगितले की. संध्याकाळपर्यंत आम्ही त्याची वाट बघत बसलो. नंतर ५ वाजता मी इथल्या स्थानिक पोलिस ठाण्यात गेलो व तिथे हरवला असल्याची तक्रार दाखल करून घ्यायला सांगितली. तसेच मी पोलिसांना मला पहलगामला जाण्याची परवानगी मागितली. त्यांनी घरी जाण्यास सांगितले. आम्ही तपास करतो आणि तुम्हाला कळवतो असे पोलिसांनी सांगितले. त्यानंतर मी पहलगाम येथे काही ओळखीच्या लोकांना आदिलचा फोटो पाठवला आणि काही माहिती मिळाली तर कळवण्यास सांगितले.

जेव्हा मृतदेह श्रीनगरला आणण्यात आले तेव्हा आम्ही सगळे तिकडे गेलो. तेव्हा तिथे एक महिला रडताना दिसली. त्यांच्या वडिलांची हत्या झाली होती. मी त्यांना शांत राहण्यास सांगितले, माझा पण भाऊ मारला गेला आहे.

# पहलगाम दहशतवादी हल्लयातील पीडितांसाठी मदत एलआयसीकडून विमा दाव्यांचा जलद निपटारा

■ महासागर प्रतिनिधी,
पुणे, दि. २५ :

भारतीय जीवन विमा महामंडळाने (एलआयसी) पहलगाम दहशतवादी हल्ल्यातील पीडितांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत देण्यासाठी त्यांच्या दाव्याच्या निपटारा जलद करण्याची घोषणा केली. २२ एप्रिल रोजी पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यात निष्पाप नागरिकांच्या मृत्युबद्दल एलआयसी ऑफ इंडियाने तीव्र दुःख व्यक्त केले आहे.

एलआयसी ऑफ इंडिया बाधितांना मदत करण्यास वचनबद्ध आहे आणि त्यांचे दावे त्वरित निकाली काढण्यासाठी वचनबद्ध आहे, अशी माहिती एलआयसीने दिली आहे. दहशतवादी हल्ल्यात निष्पाप नागरिकांच्या मृत्यूबद्दल तीव्र दुःख व्यक्त करताना, मुख्य कार्यकारी अधिकारी आणि व्यवस्थापकीय संचालक सिद्धार्थ मोहंती म्हणाले की, एलआयसीने दावेदारांच्या अडचणी कमी करण्यासाठी आम्ही सवलती देण्याचा निर्णय घेतला आहे.

मृत्यू प्रमाणपत्राऐवजी, दहशतवादी हल्ल्यामुळे पॉलिसीधारकाच्या मृत्यूचा सरकारी नोंदींमधील कोणताही पुरावा किंवा केंद्र किंवा राज्य सरकारांनी दिलेला कोणताही भरपाई मृत्यूचा पुरावा म्हणून स्वीकारला जाईल. दहशतवादी हल्ल्यात मयत झालेल्या कुटुंबीयांच्या पाठीशी आम्ही ठामपणे उभे असल्याचे देखील त्यांनी सांगितले आहे.

दावेदारांपर्यंत पोहोचण्यासाठी आणि पीडित कुटुंबांना दावे जलदगतीने निकाली काढण्यासाठी सर्व प्रयत्न केले जातील असे त्यांनी सांगितले आहे.अधिक मदतीसाठी दावेदार जवळच्या एलआयसी शाखा/विभाग/ग्राहक झोनशी संपर्क साधू शकतात. दावेदार एलआयसीच्या कॉल सेंटरवर देखील कॉल करू शकतात.

## कुणाल कामराला उच्च न्यायालयाचा दिलासा

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २५ :

मुंबई उच्च न्यायालयाने स्टँडअप कॉमेडियन कुणाल कामराला मोठा दिलासा आहे. न्यायालयाने कुणाल कामराने त्याच्यावरील गुन्हा रद्द करण्यासंबंधी दाखल केलेली याचिका सुनावणीसाठी दाखल करून घेतली आहे. तसेच ही याचिका प्रलंबित असेपर्यंत त्याला अटक न करण्याचेही आदेश दिलेत. कोर्टाच्या या आदेशामुळे कुणाल कामराला अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या मुद्यावर मोठा दिलासा मिळाला आहे.

कुणाल कामराने एका स्टँडअप कॉमेडी शोमध्ये एक विडंबन केले होते. त्यात त्याने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा नामोल्लेख टाळत त्यांना 'गद्दार' म्हणून हिनवले होते. या प्रकरणी त्याच्याविरुद्ध मुंबईतील खार पोलिस ठाण्यात एफआयआर दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणात मुंबई पोलिसांनी त्याला अनेकदा समन्स पाठवले.

# काँग्रेस पक्ष मच्छिमारांच्या समस्या सोडवण्यास कटीबद्ध : हर्षवर्धन सपकाळ

■ महासागर प्रतिनिधी,
मुंबई, दि. २५ :

महाराष्ट्रात पारंपरिक मासेमारी करणाऱ्यांना शासनाच्या जाचक धोरणांमुळे विविध समस्यांना सामारे जावे लागत आहे. मासेमारीमध्ये अनेक ठेकेदार व भांडवलदार शिरल्याने कोळी बांधवांवर अन्याय होत आहे. काँग्रेस पक्षाने सातत्याने या समाज घटकाला न्याय देण्याचा प्रयत्न केला आहे. यापुढेही काँग्रेस पक्ष मच्छिमार समाजाच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहून या समाजाला भेडसावणाऱ्या समस्या सोडवण्यास कटीबद्ध असून नवी मुंबई विमानतळबाधित मच्छिमारांना नुकसान भरपाई मिळवून देण्यासाठी पाठपुरावा करणार, असे आश्वासन महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी दिले आहे.

काँग्रेसचे मुख्यालय टिळक भवन येथे महाराष्ट्र मच्छिमार काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांची बैठक झाली. त्यावेळी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष बोलत होते. ते पुढे म्हणाले की, आपल्या समस्या सरकारकडे मांडण्यासाठी सर्वप्रथम आपली संघटना बळकट करा, जे प्रश्न आहेत त्यासाठी संघर्ष करावा लागेल त्यासाठी काँग्रेस पक्ष तुमच्या पाठीशी उभा असेल. धरणक्षेत्रातील मासेमारी, तलावातील मासेमारी, नद्यातील मासेमारी संदर्भातील प्रश्न असतील किंवा नवी मुंबई विमानतळामुळे मच्छिमारांवर संकट आले आहे त्यासंदर्भात योग्य ती पावले उचलून सरकारकडे त्यासाठी पाठपुरावा करू. आता करो वा मरो ची परिस्थिती आहे. भाजपा सरकारची मच्छिमारांसंदभार्तील धोरणे मारक आहेत. कोळीबांधवांना न्याय देण्यासाठी काँग्रेस पक्ष म्हणून सर्व ताकद उभी करू, असेही हर्षवर्धन सपकाळ म्हणाले.



भाजपा सरकारने मासेमारीला कृषीचा दर्जा दिला असला तरी त्यातून फारकाही फायदा होणार नाही, ही योजनाच फसवी आहे. मच्छिमारांना बोटीसाठी लागणाऱ्या डिझेलवर सलवत मिळावी, भांडवलदार, ठेकेदार यांचा पारंपरिक मासेमारी कारणाऱ्यांना त्रास होत आहे. खर्च व उत्पन्न याचा ताळमेळ लागत नाही. शासनाने नुकताच काढलेला जीआर या कोळी बांधवांसाठी अन्यायकारक आहे तो रद्द व्हावा. प्रकल्पग्रस्तांचा दाखला मिळावा, भाजपा सरकारने बंद केलेल्या सवलती पुन्हा लागू कराव्यात यासह विविध प्रश्न या बैठकीत मांडण्यात आले. या बैठकीला प्रदेश काँग्रेसचे उपाध्यक्ष संघटन व प्रशासन ॲड. गणेश पाटील, फिशरमन काँग्रेसचे अध्यक्ष मार्तंड नाखवा, ऑल इंडिया फिशरमन काँग्रेसचे उपाध्यक्ष रामदास संधे, विभागीय अध्यक्ष प्रकाश नगरे, कोकण विभागीय अध्यक्ष उल्हास वाटकरे, मुख्य संयोजक मिल्टन यांच्यासह फिशरमन काँग्रेसचे सदस्य उपस्थित होते.

# एसटी महामंडळासाठी नवीन बस संजीवनी

### परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी व्यक्त केला विश्वास

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. २५ :

आर्थिक कोंडीत सापडलेल्या एसटी महामंडळाला ऊर्जित अवस्थेत नेण्यासाठी नवीन बसेस संजीवनीचे काम करेल, असा विश्वास परिवहन मंत्री तथा एस टी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी व्यक्त केला. परिवहन मंत्र्यांनी शुक्रवारी मंत्रालयातील नवीन दालनात प्रवेश करत महाराष्ट्र एसटी कर्मचारी काँग्रेसचे सरचिटणीस श्रीरंग बरगे यांच्याशी अनौपचारिक चर्चा करत कामगारांच्या मुद्यांवरही चर्चा केली.



याप्रसंगी परिवहन आयुक्त विवेक भिमनवार, परिवहन सहसचिव किरण होळकर, एसटी महामंडळाचे वित्तीय सल्लागार व मुख्य लेखाधिकारी गिरीश देशमुख व इतर अधिकारी उपस्थित होते. करोनाच्या कठीन काळापासून आर्थिक अडचणीमुळे एसटीच्या ताफ्यात नवीन बसेस दाखल झाल्या नाहीत. त्यामुळे जुन्या बसेस नव्या करून त्याद्वारे प्रवासी वाहतूक करण्याचा एसटीचा केविलवाना प्रयोग आता थांबवण्यात आला पाहिजे, असे बरगे यांनी परिवहन मंत्र्यांना सांगितले.

दरम्यान दरवर्षी ५ हजार याप्रमाणे येत्या ५ वर्षात २५ हजार बसेस एसटीच्या ताफ्यात दाखल करण्याचे आमचे नियोजन असून यंदा किमान ८ हजार बसेस तफ्यात दाखल होतील, असा विश्वास मंत्री सरनाईक यांनी यावेळी महाराष्ट्र एसटी कर्मचारी काँग्रेसच्या शिष्टमंडळाशी बोलतांना व्यक्त केला. सध्या २ हजार ६४० नवीन लालपरी बसेस एसटीच्या ताफ्यात दाखल होण्याची प्रक्रिया सुरू आहे. त्यापैकी १ हजार २०० बसेस एसटीच्या ताफ्यात आतापर्यंत दाखल झाल्या. या बरोबरच नव्याने घेतल्या जाणाऱ्या ३ हजार बसेसची निविदा प्रक्रिया अंतिम टप्प्यात आली असून या बसेस देखील दिवाळी नंतर एसटीच्या ताफ्यात दाखल होण्यास सुरुवात होईल, असेही परिवहनमंत्रयांनी यावेळी बोलतांना शिष्टमंडळाला सांगितल्याचे बरगे म्हणाले.

यावर्षी एसटी महामंडळाकडून आणखी ५ हजार बसेस खरेदी करण्याची निविदा प्रक्रिया सुरू करण्यात येत आहेत. त्यामुळे एक वर्षांमध्ये एसटीच्या ताब्यात सुमारे८ हजार नवीन बसेस दाखल होतील, असे प्रतिपादन मंत्री सरनाईक यांनी यावेळी संघटनेच्या शिष्टमंडळाकडे केले.

एसटी कर्मचाऱ्यांच्या वेतनातून कपात केलेली पीएफची रक्कम पीएफ ट्रस्टकडे का भरण्यात आली नाही. त्या मुळे गुंतवणुकी वरील व्याज बुडत आहे असा प्रश्न सुद्धा वित्तीय सल्लागार व मुख्य लेखाधिकारी गिरीश देशमुख यांना विचारून सदरची माहिती तत्काळ देण्याच्या सूचनाही सरनाईक यांनी दिल्या. या शिवाय प्रत्येक महिन्याला वेळेवर वेतन देण्यासाठी स्वतः पुढाकार घेऊ असे आश्वासनही सरनाईक यांनी यावेळी शिष्टमंडळाशी बोलतांना दिल्याचेही बरगे यांनी सांगितले.